महाराष्ट्राचे

# शिल्पकार

# बॅ. राजाभाऊ खोब्रागडे



RAJA BADSAL

35

व्ही. डी. मेश्राम

महाराष्ट्र ...त्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार - समता-संग्रामाचे सेनानी

# बॅ. राजाभाऊ खोब्रागडे

व्ही. डी. मेश्राम

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : ऑगस्ट २००३
महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. १५

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४

© प्रकाशकाधिन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : ३५ रु.

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणत: शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेअंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील "बॅ. राजाभाऊ खोब्रागडे" हा पंधरावा चरित्रग्रंथ आहे.

महाराष्ट्राच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान असूनही ज्या महनीय व्यक्तींवर फारसे लेखन झालेले नाही त्यांच्यावर प्राधान्य क्रमाने ग्रंथ लिहून घेऊन प्रसिद्ध करण्याचे मंडळाचे धोरण आहे. याच धोरणाचा एक भाग म्हणून आम्ही हा चरित्रग्रंथ प्रकाशित करीत आहोत.

एका ऐश्वर्य संपन्न दलित कुटुंबात बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांचा जन्म झाला. इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी पाठविण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या १४ विद्यार्थ्यांची निवड केली त्यांत राजाभाऊंचे नाव होते. पण या यादीत एका जास्तीच्या हुशार, मागासवर्गीय विद्यार्थ्याचा समावेश व्हावा म्हणून राजाभाऊंच्या वडिलांनी बाबासाहेबांच्या संमतीने राजाभाऊंना स्वखर्चाने इंग्लंडला पाठविले.

नोव्हेंबर १९४९ मध्ये बॅ. राजाभाऊ लिंकन-इन-लंडनमधून बॅरिस्टर ॲट लॉची पदवी संपादन करून भारतात परतले. बाबासाहेब स्वत: ज्या ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष होते त्या राजकीय संघटनेचे सरचिटणीस पद राजाभाऊंना देऊन बाबासाहेबांनी आपला राजकीय मानसपुत्र म्हणून राजाभाऊंची अप्रत्यक्षपणे निवड केली. १४ नोव्हेंबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी बौद्ध धर्म स्वीकारून आपल्या उपस्थितीत ज्या पाच लाख लोकांना धम्माची दीक्षा दिली त्यात राजाभाऊंचाही समावेश होता. १९६४ साली राजाभाऊंनी या देशातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांसाठी देशव्यापी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. पुढे राजाभाऊ राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. तब्बल १८ वर्षे

ते या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. १९७० साली राजाभाऊ राज्यसभेचे उपसभापती म्हणून निवडले गेले. राजाभाऊंनी संपूर्ण हयात दलितांच्या समस्येसाठी संघर्ष करण्यात घालविली.

श्री. व्ही. डी. मेश्राम यांनी बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची उकल अतिशय जिव्हाळ्याने, तन्मयतेने व हळुवारपणे या ग्रंथात केलेली आहे.

''राजाभाऊ या देशातील समतावादी लढ्यातील बाबासाहेबांच्या नंतरचे फार मोठे सेनानी होते. या लढ्याची आयुधे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कधीच खाली ठेवली नाहीत. सिद्धांताशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. चांदीचा चमचा घेऊन जी व्यक्ती जन्मास आली, त्या राजाभाऊंचे निर्वाण झाले तेव्हा त्यांचा एक छदामही बँक बॅलन्स नव्हता. ही घटना त्याग व समर्पणाच्या भावनेने काम करणाऱ्या या देशातील असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणार आहे.'' असे या चरित्रग्रंथात श्री. व्ही. डी. मेश्राम यांनी नमूद केले आहे. ''महाराष्ट्राचे शिल्पकार'' या चरित्रग्रंथमालेअंतर्गत हा चरित्रग्रंथ प्रकाशित करण्यात मंडळाचाही हाच प्रमुख हेतु आहे.

मुंबई
दिनांक : १८ ऑगस्ट २००३

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

भारतात सामाजिक संगर उभा करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा साऱ्या देशात संचार सुरू असताना त्यांचे लक्ष विदर्भाच्या भूमीकडे गेले. सारा देश त्यांची कर्मभूमी असली तरी त्यांची विशेष नजर नागपूरकडे होती. त्यास एक वेगळे कारण होते. बौद्धकालिन नागवंशीयांची ऐतिहासिक भूमी म्हणून बाबासाहेब नागपूर व विदर्भाकडे पाहात होते. त्यांचे अधिकांश सामाजिक, धार्मिक व राजकीय लढे याच देशातील मध्यवर्ती ठिकाणी वसलेल्या नागनगरीतून सुरु झाले. चंद्रपूर जिल्ह्यातील खोब्रागडे या धनसंपन्न कुटुंबाकडे त्यांचे लक्ष गेले. सामाजिक लढ्यासाठी ताठ बाण्याचे कार्यकर्ते व अनुयायांची त्यांना गरज होती. शिवाय तन, मन, धन, आपले सर्वस्व या लढ्यात अर्पण करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या शोधात बाबासाहेब होते. दलित समाजात त्या काळात सधन अशी अगदी मोजकी कुटुंबे होती. यात चंद्रपूरचे खोब्रागडे कुटुंब सुप्रसिद्ध होते.

## कौटुंबिक पार्श्वभूमी

बाबासाहेबांनी सामाजिक विषमतेविरुद्ध लढा पुकारला असताना या विषमतेच्या खाईतून बाहेर निघून आपली उन्नती साधण्यासाठी दलित समाज धडपड करू लागला. खेड्यापाड्यांमधल्या बहिष्कृत दलित समाजात प्रामुख्याने महार ही जात होती. तो समाज पोटापाण्याचे मार्ग शोधून ताठ मानेने जगण्याकरिता शहरांकडे धाव घेऊ लागला. त्यात एक होते भिवाजी खोब्रागडे. भिवाजी सध्याच्या पोंभूर्णा तहसिलमध्ये असलेल्या देवाडा या गावचे होते. पण मुळचे सध्याच्या गडचिरोली जिल्ह्याचे होते. त्यावेळेस चांदा जिल्हा विस्ताराने फार मोठा होता. चंद्रपूरच्या पूर्व दिशेला गडचिरोली जिल्ह्यात खोब्रागडी नामक मोठी नदी आहे. या नदीच्या किनाऱ्यावर निवास करणारे खोब्रागडे असा प्रघात पडला. असे हे खोब्रागडे कुटुंबाचे मूळ शोधता येईल. भिवाजींनी आपले कुटुंब घेऊन चांदा शहर गाठले. भिवाजी ही सामाजिक जाणिवेची व्यक्ती होती. गाव सोडताना दारिद्र्य व अज्ञानाच्या अंध:कारात फसलेल्या आपल्या देवाडा गावच्या परिसरातील समाजबांधवांना गाव सोडण्याचा संदेश देण्यास भिवाजी विसरले नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही दलितांना आपल्या उन्नतीसाठी खेडी सोडण्याचे आवाहन केले होते. आपले कुटुंब, आपला समाज उन्नत करण्याची ही धडपड होती. भिवाजीचे आपल्या कुटुंबासमवेत चंद्रपुरात पदार्पण झाल्यानंतर त्यांनी जिल्हा मध्यवर्ती कारागृहाच्या

मागे असलेल्या दादमहाल वार्डात आपले वास्तव्य केले. त्यांच्या पत्नीचे नाव पैकाबाई होते. खोब्रागडे कुटुंबातील ही अत्यंत कर्तबगार महिला होती. भिवाजींनी चांद्यात पदार्पण केले तेव्हा त्यांना दोन पुत्र होते. पत्रुजी व गोविंदराव ही त्या मुलांची नावे. शहरात स्वकष्टाने व्यापार-उदीम करण्याची संधी मिळाल्याबरोबर भिवाजीने फळांचा धंदा सुरु केला. पेरुचे बगीचे, आंब्यांनी बहरलेल्या अमराया, चिंचेची झाडे, खरबूज-टरबुजांच्या वाड्या, असा फळे विकण्याचा धंदा भिवाजीने सुरु केला. या धंद्यात हळूहळू त्यांनी जम बसविला. या दरम्यान त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना शाळेत टाकले. सुमारे एक शतकाआधीचा हा काळ होता. रंजल्या-गांजलेल्या, दिनदुबळ्या समाजघटकांवर तेव्हा वारकरी संप्रदाय तसेच संतांच्या शिकवणुकीचा पगडा होता. धर्माने या समाजघटकांना बहिष्कृत केले होते. परंतु संत तळागाळातील समाजामधून उदयास आल्यामुळे या लोकांना ते आपले वाटायचे. म्हणून हा समाज नामदेव-तुकारामाच्या दिंड्या काढायचा. कुठे तरी अध्यात्माचा आधार असावा म्हणून दिंड्यांमध्ये देहभान हरवून नाचायचा. स्वत:च्या धर्माच्या मंदिरांमध्ये मज्जाव असणे ही एक अजब, माणुसकीला पायदळी तुडविणारी समाजव्यवस्था या देशात होती. संतांनी मात्र दलित-पददलितांच्या खांद्यावर दिंडीची पताका दिली. भिवाजीच्या घरात तिसऱ्या मुलाने प्रवेश केला. देवाजी हे त्यांचे नाव. हेच राजाभाऊंचे वडील होत. देवाजी अवघे दोन वर्षांचे असताना वडील भिवाजीचे अकाली निधन झाले. पत्रुजी, गोविंदराव व देवाजी पितृछायेपासून वंचित झाले. चांदा शहरात व दूरवर पसरलेल्या दलित समाजास धंदा-व्यापार करायची व स्वाभिमानाने जगण्याची प्रेरणा देणाऱ्या भिवाजीचा अंत झाला. येथील दलित समाजाचा एक आधारस्तंभ ढासळला.

आपल्या डोळ्यासमोर तीनही मुलांचे अधांतरी भविष्य पाहून मातोश्री पैकाबाईने म्हणजे राजाभाऊंच्या आजीने पतीच्या निधनाचे सारे दु:ख पिऊन टाकले व ज्या हिमतीने व जिद्दीने भिवाजीने बहरलेला संसार उभा केला होता, त्यात यत्किंचितही फरक येऊ न देता पैकाबाईने आपल्या समर्थ खांद्यांवर ही जबाबदारी घेतली. एका दलित महिलेने एक शतकाआधी व्यापार-उदिमाचे पाऊल टाकणे व त्यात यश संपादन करणे हे भारतातल्या दलित समाजातील पहिले उदाहरण असावे. पैकाबाई मेहनती, धोरणी व कर्तृत्ववान होती. पतीने स्वकष्टाने उभारलेल्या धंद्यात पैकाबाईने खंड पडू दिला नाही. उलट धंद्यात तिच्या सीमा विस्तारल्या. तिने मुलांचे शिक्षण नियमित सुरु ठेवले. या विस्तारलेल्या व्यापारात लक्ष देणे व आपला धाकटा भाऊ देवाजीची देखभाल करणे यासाठी दोघांही भावांना आपले शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागले. देवाजीने खूप शिकावे, मोठे व्हावे अशी या भावांची मनोमन इच्छा

होती. देवाजी शाळेत जाऊ लागले. या दरम्यान पैकाबाईने दोघा भावांची लग्ने उरकली. खोब्रागडे कुटुंबाचा विस्तार होऊ लागला. आईने आपल्या मुलांना वडिलांचे छत्र हरपल्याची किंचितही जाणीव होऊ दिली नाही. त्या काळात इंग्रजांचे राज्य असल्यामुळे इंग्रज भाषेला फार महत्त्व होते. देवाजींनी शिक्षण घेत असताना इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळविले. ते अस्खलित इंग्रजी बोलायचे. इयत्ता १०वीत असताना देवाजीचे लग्न चांद्यातल्या नगीनाबाग या वार्डमधील शेंडे परिवारातील इंदिराबाईशी झाले. याच इंदिराबाई राजाभाऊंच्या आई होत. देवाजी १० वी पास झाले. व शिक्षणाला पूर्णविराम दिला. त्या काळात ११ वी मॅट्रीक होती. १० वी पास हे त्या काळात मोठे शिक्षण समजले जात असे. तीनही मुलांना पैकाबाईने व्यापार-उदिमात पाऊल टाकण्यास सहमती दिली. त्या काळात चांदा शहरात राजाभाऊंचे एक नातेवाईक तुकाराम रंगारी यांची सूट स्पेशॅलिस्ट म्हणून दूरपर्यंत कीर्ती होती. इंग्रज लोकांचे सूट व इतर कपडे शिवण्यात टेलरिंग मास्टर रंगारी वाकब्गार होते. पत्रुजी व गोविंदराव यांनी रंगारीच्या मदतीने टेलरिंगचा व्यवसाय सुरु केला. देवाजींनी कोळशाच्या खाणीत टाईम किपरची नोकरी धरली.

## नवीन धंद्यात पदार्पण

देवाजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभारलेल्या समतेच्या लढ्याची जाण असलेले होते. जातीभेद-अस्पृश्यतेचे चटके स्वयं बाबासाहेबांना फार वाईट तऱ्हेने सहन करावे लागले. चंद्रपूर जिल्ह्यासारख्या दूरच्या माळरानाच्या भागात अस्पृश्यतेची कशी दाहकता असेल याची कल्पना न केलेली बरी. देवाजींनी आपल्या वडील बंधूंच्या सोबत या सर्व प्रतिकुल परिस्थितीचा मुकाबला करीत करीत नवीन धंद्यांमध्ये पदार्पण केले. तिघाही भावांनी मिळून लाकडाच्या धंद्यात प्रवेश केला. चांदा जिल्ह्याचे जंगल आजही अत्यंत समृद्ध व विख्यात आहे. लाकडाच्या व्यवसायात खोब्रागडे बंधूंनी हळूहळू भक्कम पाय रोवले. त्यांनी बल्लारपूर येथे मोठी जागा घेऊन या व्यवसायाचा व्याप वाढविला. चांदा ते सिरोंचापर्यंत हजारो मजुरांना देवाजी व त्यांच्या वडीलबंधूंनी लाकूड कटाईच्या कामात लावले. त्यांनी हिंगणघाटच्या खास कारागिरांना बोलावून या व्यवसायात एक कसब निर्माण केले. बल्लारपूरात हिंगणघाट मोहल्ला वसलेला आहे. खोब्रागडे कुटुंबाची ही देण होय. चंद्रपूर जिल्ह्यात सर्वप्रथम आरामशीन आणून सॉ मिल चालविण्याचा धंदा याच कुटुंबाने केला. संपूर्ण देशभरातून मोठमोठे लाकडाचे व्यापारी चांद्याला येत असत. विदर्भात व दूरपर्यंत लाकडाचे व्यापारी म्हणून खोब्रागडे बंधू प्रसिद्धीस आले. त्यांनी आंध्रप्रदेशातील राजमहेंद्री येथे लाकडाचा डेपो सुरु करून परप्रांतात आपला उद्योग वाढविण्याचा मान मिळविला. राजमहेंद्री येथील राजाचा राजवाडा त्यांनी भाड्याने

घेऊन आपल्या परमप्रिय आई पैकाबाईच्या हस्ते तेथील डेपोचे उद्घाटन केले. राजमहेंद्रीच्या राजवाड्यासारखी अगदी हुबेहुब इमारत देवाजीने चांद्याच्या मेन रोडवर उभी केली. खोब्रागडे कुटुंबाने एकीकडे लाकडाच्या व्यवसायात शिखर गाठीत असतांना कापूस व रुईच्या व्यवसायातही पाऊल टाकले. चांदा ही कापसाची मोठी बाजारपेठ होती. चांदा हे दक्षिण-उत्तरेच्या रेलमार्गावरील प्रमुख ठिकाण आहे. देवाजींनी कापसाच्या व्यवसायात मजबूत पाय रोवले. या व्यवसायात त्यांनी अमाप पैसा मिळविला.

एका दलित माणसाचे व्यवसायात पदार्पण होणे, त्यात त्यांनी मजबूत पाय रोवणे व विविध व्यवसायांची क्षितिजे विस्तारित करणे हे त्या काळातील दुर्लभ उदाहरण होय. होलसेल सुताच्या व्यवसायापासून तर सोने-चांदीचा व्यवसाय, शेत जमिनींच्या खरेदी-विक्रीचा व्यवसाय, या सर्व विविध धंद्यांमध्ये खोब्रागडे कुटुंबाने यशस्वी पाय रोवणे हा एक चमत्कार होता. चांदा जिल्ह्यातील दलित समाज खोब्रागडे कुटुंबाकडे कुतूहल, आदर व अपेक्षेने पाहू लागला. देवाजी व त्यांच्या बंधुंनी लाखो-करोडो रुपये खोऱ्याने कमावले. या कुटुंबाने फोर्ड कंपनीची मोटार १९३० मध्ये सर्वप्रथम चांद्यात आणली. आई पैकाबाईचा वरदहस्त व तिघाही भावांचे परिश्रम यामुळे या कुटुंबाने ऐश्वर्याची चरमसीमा गाठली. चांदा जिल्ह्यात सर्वच समाजस्तरावर एक धनसंपन्न कुटुंब म्हणून खोब्रागडे कुटुंबाकडे सारा समाज पाहू लागला. तोंडात चांदीचा चमचा घेऊन राजाभाऊ जन्मले त्याची ही पार्श्वभूमी होय.

## राजाभाऊंचा जन्म व बालपण

पैकाबाईंची लहान सून, देवाजीबापूंची धर्मपत्नी इंदिराबाईस डोहाळे लागले. सासूचा आनंद गगनात मावेना. रिती-रिवाजाप्रमाणे इंदिराबाई पहिल्या बाळंतपणासाठी नगीनाबागला आपल्या माहेरी गेल्या. हे ठिकाण चंद्रपूरच्या जटपुरागेटच्या बाहेर लागूनच आहे. हेच ते ठिकाण जेथे दलितांचा राजा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मानसपुत्र, राजाभाऊ यांचा २५ सप्टेंबर १९२५ रोजी जन्म झाला. राजाभाऊ सव्वा महिन्याचे असताना या बाळास माहेरून स्वगृही दादमहाल वार्डात रितीरिवाजानुसार आणण्याचा कार्यक्रम ठरला. राजाभाऊंच्या घरात यावेळेस सारे ऐश्वर्य लोळण घेत होते. दोन मोटारगाड्या घरी होत्या. घोड्यांची बग्गी होती. सारी साधने व अमाप पैसा घरात असताना पैकाबाईने आपल्या लाडक्या नातवास आणण्याचा एक आगळावेगळा कार्यक्रम आखला. आजीने बांबूचे टोपले घेतले. फुले-हारांनी, सोने-चांदीने ते सजविण्यात आले. आणि बँडबाजा लावून सजविलेले ते टोपले डोक्यावर

घेऊन आजी आपल्या चिमुकल्या नातवास आणण्यासाठी नगीनाबाग वार्डाकडे निघाली. रिवाजाप्रमाणे पाहुण्यांचा आदर-सत्कार, खान-पान आटोपल्यानंतर दलितांच्या बाळराजाला, सव्वा महिन्यांच्या राजाभाऊला विधीपूर्वक त्या सजविलेल्या, मढविलेल्या टोपलीत ठेवण्यात आले. पैका आजीने ती टोपली डोक्यावर घेतली. समोर बँड व मागे आप्तेष्ट, मित्र-परिवारातील लोक अशी जंगी मिरवणूक वाजत-गाजत दादमहालकडे निघाली. अत्यंत मनोवेधक असा हा प्रसंग होता. सारे चंद्रपूरवासी या बाल मिरवणुकीकडे कुतुहल व कौतुकाने पाहू लागले. राजाभाऊ बाळराजाच्या आयुष्याची ही अशी आगळी वेगळी, जगावेगळी सुरवात होती. राजाभाऊंची आई इंदिराबाई कृष्णच माझ्या पोटी जन्मास आला असे म्हणायची. देवाजीबापूंना एकूण आठ अपत्ये होती. राजाभाऊ हे ज्येष्ठपुत्र होत. भाऊराव हे त्यांचे घरातील नाव होते. सामाजिक विषमतेविरुद्ध लढा देणाऱ्या लढवय्या कुटुंबात राजाभाऊंचा जन्म झाला. त्यांचे वडील देवाजीबापू कर्तबगार पुरुष होते. त्यांचा ताठ मानेने, स्वाभिमानाने जगण्याचा बाणा होता. यासाठीच त्यांनी आपली सांपत्तिक स्थिती सुदृढ केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याचा सत्याग्रह पुकारला. या देशातील समतेच्या लढ्याची ही सुरवात होती. मानवी स्वातंत्र्याचा हा लढा होता. महाडच्या या यशस्वी सत्याग्रहानंतर बाबासाहेबांचे लक्ष विदर्भातील अमरावतीच्या प्रसिद्ध अंबादेवी मंदिराकडे गेले. या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेशबंदी होती. ही बंदी उठावी यासाठी बाबासाहेबांनी लढ्याचे रणशिंग फुंकले. १३ नोव्हेंबर १९२६ ला बाबासाहेबांनी अंबादेवीच्या सत्याग्रहाचे नेतृत्व केले. हा लढा सतत तीन महिने सुरू होता. या लढ्यात सहभागी होण्यासाठी देवाजीबापू खोब्रागडे यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींचा एक जत्था चांद्याहून अमरावतीला गेला होता. तेथील इंद्रभुवन थिएटरमध्ये देवाजींनी बाबासाहेबांचे भाषण ऐकले व ते बाबासाहेबांचे कायमचे अनुयायी झाले. एवढेच नव्हे तर ते समतेच्या लढ्यातील बाबासाहेबांचे एक निष्ठावान सहकारी झाले. देवाजी या लढ्यातील एक शिपाई म्हणून चांद्यास परतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर देवाजींचे स्फूर्तिस्थान बनले. या सामाजिक वातावरणाचा राजाभाऊंच्या बालमनावर परिणाम होणे स्वाभाविक होते. सन १९३२ ला महात्मा गांधींनी पुण्याच्या येरवडा तुरुंगात प्राणांतिक उपोषण सुरू केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्या स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडावा यासाठी हे उपोषण होते. साऱ्या देशात 'आंबेडकर करे पुकार'चे नारे दुमदुमू लागले. चांदा जिल्ह्यातही याचे लोण पोहचले. या जिल्ह्यात देवाजींच्या नेतृत्वात हा नारा बुलंद होऊ लागला. राजाभाऊ या ऐतिहासिक घडामोडी घडत असताना अवघ्या ६-७ वर्षांचे होते. ''डॉ. आंबेडकर करे पुकार''चा नारा राजाभाऊंच्या बालहृदयावर

तेव्हापासूनच कोरला गेला. १३ ऑक्टोबर १९३५ ला डॉ. आंबेडकरांनी येवले येथील जाहीर सभेत धर्मांतर करण्याची घोषणा केली. येवल्यात दलितांचे फार मोठे अधिवेशन आयोजित करण्यात आलेले होते. या अधिवेशनात भाग घेण्यासाठी चांद्याहून देवाजीबापूंच्या नेतृत्वात अनेक कार्यकर्ते गेले होते. त्यात संभाजी रंगारी, ज. गो. संत गुरुजी, ॲड. रामचंद्र कांबळे इत्यादी प्रमुख होते. "मी हिंदू धर्मात जन्मलो; पण या धर्मात कदापी मरणार नाही." ही क्रांतीकारी घोषणा बाबासाहेबांनी या अधिवेशनात केली. समतेच्या लढ्याचा कानमंत्र घेऊन आपल्या सहकाऱ्यांसोबत देवाजीबापू येवल्याहून चांद्याला परतले. या सर्व ऐतिहासिक घटनांचा परिणाम राजाभाऊंच्या मनावर होऊ लागला. ऑगस्ट १९३७ ला डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली व प्रांतीय निवडणुका लढविल्या. या पक्षाचे निवडणूक चिन्ह पंजा हे होते. देवाजीबापू चंद्रपूर-ब्रह्मपुरी या द्विमतदार संघातून निवडणुकीत उतरले व प्रचंड मतांनी विजयी झाले. समतेचा लढा, समाजकारण, राजकारण घडत असताना राजाभाऊंचे वय बारा-तेरा वर्षांचे होते, मिडल् स्कूलला ते शिकत होते. याच कालखंडात एक निंदनीय घटना घडली, ज्या घटनेचा परिणाम राजाभाऊंच्या मनावर झाला. द्विमतदार संघाच्या निवडणुकीत देवाजीबापू विजयी होण्याची चिन्हे दिसू लागल्यावर बल्लारपूर येथील काही जातीयवादी लोकांनी त्यांच्या लाकडी डेपोला आग लावली. लाखो रुपयांचे लाकूड त्यात भस्मसात झाले. लाकडांची उसळलेली आग व राख पाहावयास खोब्रागडे कुटुंब बल्लारपूरला गेले. सोबत बारा वर्षांचा राजाभाऊही होता. राजाभाऊंच्या मनावर या खूनशी घटनेचा काय परिणाम झाला असेल याची सहज कल्पना करता येईल. राजाभाऊंनी नंतरच्या आयुष्यात जातीय समाजव्यवस्थेविरुद्ध जे दंड थोपटले त्याची बीजे निश्चितच या घटनेमध्ये आहेत.

## बाबासाहेबांचे प्रथम दर्शन

सन १९४१ ला येथील शासकीय ज्युबिली हायस्कूल, (सध्याचे कर्मवीर दादासाहेब कन्नमवार जिल्हापरिषद हायस्कूल) मधून राजाभाऊ मॅट्रीकची परिक्षा उत्तीर्ण झाले. राजाभाऊंनी प्रथम बाबासाहेबांना सन १९४३ ला वयाच्या १८ व्या वर्षी चंद्रपूरच्या रेल्वे स्टेशनवर पाहिले होते. बाबासाहेबांची व्हाईसरॉयच्या मंत्रीमंडळात मजूरमंत्री म्हणून नियुक्ती झाली होती. हैद्राबादचे सुप्रसिद्ध दलित नेते, अखिल भारतीय समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. सुबय्या यांनी हैद्राबाद येथे बाबासाहेबांच्या जाहीर सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. देवाजीबापू या सत्कार समारंभास उपस्थित होते. १३ सप्टेंबर १९४३ ला बाबासाहेबांचा या शहरात भव्य सत्कार करण्यात आला. बाबासाहेब परत हैद्राबादहून दिल्लीला जाणार

होते. या मार्गावर चंद्रपूर येत असल्यामुळे देवाजीबापूंनी बाबासाहेबांचे चंद्रपूर रेल्वे स्थानकावर स्वागत करण्याचे ठरविले. व त्यांनी बाबासाहेबांची हैद्राबादलाच सहमती घेऊन तसा कार्यक्रम आखला. १५ सप्टेंबर १९४३ ला चंद्रपूरच्या रेल्वे स्थानकावर बाबासाहेबांचे भव्य स्वागत करण्यात आले. स्टेशनवर अलोट गर्दी उसळली. चंद्रपूरातील दलित समाज रेल्वे स्टेशनवर बाबासाहेबांचे स्वागत करण्याकरिता मोठ्या संख्येने जमा झालेला होता. "डॉ. आंबेडकर करे पुकार"च्या नाऱ्यांनी सारा परिसर दुमदुमून गेला. १८ वर्षांचे तरुण राजाभाऊ बाबासाहेबांचे स्वागत करण्याकरिता हातात पुष्पमाला घेऊन रेल्वे स्थानकावर उभे होते. गाडी हैद्राबादहून चंद्रपूरच्या रेल्वे स्थानकावर पोहचली. बाबासाहेब थोड्यावेळासाठी स्थानकावर उतरले. राजाभाऊंनी बाबासाहेबांचे पुष्पहाराने स्वागत करून अभिवादन केले. बाबासाहेबांशी राजाभाऊंची झालेली ही पहिली भेट होय. राजाभाऊंचा बाबासाहेबांचे दर्शन घेण्याचा तो पहिलाच अविस्मरणीय असा प्रसंग होता. ज्या पददलितांच्या, दिनदुबळ्यांच्या उद्धारकर्त्याचे नाव राजाभाऊंच्या मुखी अगदी बालपणापासून बसले होते, त्या महान व्यक्तीच्या समोर राजाभाऊ हाराने स्वागत करताना उभे होते. आपणही बाबासाहेबांसारखे बॅरिस्टर व्हावे ही उत्स्फूर्त भावना अशा प्रसंगी कुणाच्या मनात येणार नाही? राजाभाऊंनी आपले महाविद्यालयीन शिक्षण नागपूरच्या मॉरीस कॉलेजमधून घेतले. तिथून ते सन १९४३ ला इंटर आर्ट्स झाले. सन १९४५ ला त्यांनी नागपूर विद्यापीठातून बी. ए. ची पदवी प्राप्त केली. राजाभाऊ विद्यार्थी असतानाच सामाजिक लढ्यात उतरले. विदर्भ व नागपूर तेव्हा मध्यप्रांतात होते. नागपूर ही मध्यप्रांताची राजधानी होती. राजाभाऊंची मध्यप्रांताच्या शेड्युल्ड कास्ट स्टुडंट्स फेडरेशनच्या सरचिटणीसपदी नियुक्ती झाली. विद्यार्थी दशेत असताना राजाभाऊंनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संघटना बांधण्याकरिता जीवापाड परिश्रम घेतले ते कुठे पायी तर कुठे सायकलीने विद्यार्थ्यांच्या संघटन बांधणीसाठी फिरले. त्यावेळेस वाहतुकीची साधने कमी होती.

राजाभाऊ बालवयात खूप खोडकर होते. त्यांच्या बालवयातील मजेदार घटना आजही त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती सांगत असतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९५६ ला धम्मदीक्षा देण्यापूर्वी खोब्रागडे कुटुंबात खूप पूजाअर्चा होत असे. राजाभाऊंच्या आई इंदीराबाई धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. घरात धार्मिक वातावरण होते. उपास-तापास करणे, देवास नैवेद्य चढवणे इत्यादी प्रकार घरात चालत असत. अशावेळेस बालवय असलेले राजाभाऊ पूजा करण्याचा बहाणा करून आईसोबत बसत असत. व देवाला नैवेद्य चढवल्याबरोबर तो खाऊन टाकीत असत. आईने देवघरात दिवा लावला की, राजाभाऊ त्या दिव्यावरच पाट टाकून त्यावर बसायचे

व माझी पूजा करा असे निष्पाप चेहऱ्याने म्हणायचे. पूजेसाठी केळीची पाने आणली तर ती राजाभाऊ बाहेर फेकून द्यायचे. राजाभाऊंचा हा खोडकरपणा त्यांच्या कुटुंबातील लोकांना कुतुहलाचा विषय वाटला तरी आई इंदिराबाई व वडील देवाजीबापू यांना आपल्या बाळराजाच्या हातून आयुष्यात काहीतरी अद्वितीय घडणार याची पूर्ण खात्री होती.

चंद्रपूरच्या गोलबाजारात रामभरोसे या नावाचे हॉटेल होते. राजाभाऊ ९-१० वर्षाचे असतांना आपले धाकटे बंधू श्रीहरीपंत यांच्यासोबत बाजारात फिरण्याकरिता गेले असताना राजाभाऊंची या हॉटेलमध्ये जाऊन काही खाण्याची इच्छा झाली. सन १९३५-३६ चा तो काळ होता. समाजात त्या काळात अस्पृश्यता-जातीभेदाचे थैमान सुरू होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जातीभेदाविरुद्धचा लढा हळूहळू मूळ धरू लागलेला होता. चंद्रपुरातही या लढ्याचे, दलितांना संघटित करण्याचे लोण पोहचले होते. या लढ्याचे नेतृत्व देवाजीबापू यांच्याकडे होते. बाबासाहेबांच्या समतावादी लढ्याची चर्चा खोब्रागडे कुटुंबात होणे स्वाभाविक होते. राजाभाऊ व त्यांचे सारे बंधू हे ऐकत असत. या लढ्यामुळे खोब्रागडे कुटुंबात नवचैतन्याची ज्योत प्रज्वलित झालेली होती. या साऱ्या वातावरणाचा प्रभाव या कुटूंबावर पडला होता. राजाभाऊ आपल्या भावासोबत त्या हॉटेलमध्ये प्रवेश करीत असताना हॉटेलमालकाने त्यांना (हॉटेलमध्ये) प्रवेश करण्यास मज्जाव केला. त्या काळात अस्पृश्यांना हॉटेल्समध्ये विटाळ होतो म्हणून प्रवेशबंदी होती. हॉटेल मालकाने राजाभाऊ व त्यांच्या बंधूंना रोखताच राजाभाऊंनी त्याला रोखायचे कारण विचारले. हॉटेल मालक ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हता. त्याला धंद्याची चिंता नव्हती. विटाळाची जास्त काळजी होती. तो मालक मुळीच ऐकत नाही हे लक्षात आल्यानंतर राजाभाऊ व त्यांच्या बंधूंनी त्या हॉटेलमालकास बदडले. राजाभाऊंच्या आयुष्यातील अगदी बालवयात घडलेली ही घटना आहे. राजाभाऊंचे सारे क्रुटुंबच लढाऊ होते. सामाजिक विषमतेविरुद्ध राजाभाऊंचे सारे कुटुंब तन, मन, धनाने उतरले होते. राजाभाऊंच्या बालवयातील लहान लहान घटना त्याच्या बालमनाला आकार देऊ लागल्या. राजाभाऊंनी पुढील आयुष्यात समतेचा जो प्रखर संग्राम उभा केला, त्याचा पाया अगदी बालवयातच रोवला गेलेला होता.

प्रकरण २

# बॅरिस्टर राजाभाऊ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतातील ब्रिटीश सरकारमध्ये मजूरमंत्री असताना त्यांनी सन १९४६ साली हुशार अशा दलित विद्यार्थ्यांच्या परदेश शिक्षणाची एक योजना आखली. बाबासाहेबांचा या योजनेमागे दुहेरी हेतू होता. शिक्षणाद्वारे दलितांचे सामाजिक व आर्थिक उत्थान व्हावे व दुसरा त्यांनी उभारलेल्या समतेच्या लढ्यासाठी बुद्धिमान कार्यकर्त्यांची निकड. शिका, संघटीत व्हा, चळवळ करा हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. त्यांचा हा उदात्त हेतू सफल झाला. तत्कालिन व्हाईसरायने बाबासाहेबांची ही योजना मान्य करून चौदा दलित विद्यार्थ्यांना परदेश शिक्षणासाठी इंग्लंडला पाठविण्याची सोय केली.

इंग्लंडला उच्च शिक्षणासाठी पाठविण्याकरिता बाबासाहेबांनी ज्या चौदा विद्यार्थ्यांची यादी तयार केली त्यात राजाभाऊंचे एक नाव होते. देवाजीबापूंनी आपल्या बुद्धिमान ज्येष्ठपुत्रास परदेश शिक्षणासाठी विलायतेस पाठविण्याचा निर्णय घेतला. पण स्वखर्चाने. आपली ही इच्छा त्यांनी बाबासाहेबांशी संपर्क साधून व्यक्त केली. देवाजीबापूंचा यामागे एक वेगळा दृष्टिकोण होता. पुन्हा एक जास्तीचा हुशार मागासवर्गीय विद्यार्थी या यादीत समाविष्ट करता येईल, त्याला परदेश शिक्षणाची संधी प्राप्त होऊ शकेल, हा तो दृष्टिकोण होता. देवाजीबापूंचा हा मनोदय बाबासाहेबांनी कायमचा टिपून घेतला. संपत्तीचा आपल्या बांधवांसाठी अशाप्रकारे सदुपयोग करण्याचे हे आगळेवेगळे उदाहरण होय. राजाभाऊ बार-अॅट-लॉ ची पदवी प्राप्त करण्याकरिता विलायतेस गेले. खोब्रागडे कुटुंबातील या ज्येष्ठ पुत्राकडे बाबासाहेबांचे पूर्ण लक्ष होते. धनसंपन्न खोब्रागडे कुटुंबास दलित चळवळीत ओढणे, उच्चविद्याविभूषित होऊन राजाभाऊ मायदेशी परतल्यानंतर त्यांच्या खांद्यावर या देशातील दलित आंदोलनाची जबाबदारी देणे ही बाबासाहेबांची इच्छा होती. सन नोव्हेंबर १९४९ ला राजाभाऊ लिंकन्स-इन-लंडन मधून बॅरिस्टर-अॅट-लॉ ची पदवी प्राप्त करून भारतात परतले.

या दरम्यान देवजीबापूंनी आपल्या उच्चविद्याविभूषित पुत्राकरिता एक वेगळे स्वप्न रंगविले होते. कुटुंबातील कोणत्याही कर्त्या पुरुषाचे हे कर्तव्य असते. देवाजीबापूंचे ते कौटुंबिक स्वप्न होते. त्यांनी आपल्या लाडक्या मुलासाठी चंद्रपूरच्या गांधीमार्गावर एक छानसे घर उभे केले. राजाभाऊ परदेशातून परतल्यावर त्यांनी या नवीन घरात प्रवेश केला. राजाभाऊंच्या कुटुंबातील व्यक्तींनी याक्षणी अनेक स्वप्ने उराशी बाळगली असतील. परंतु नियतीला ते मंजूर नसावे. राजाभाऊंचा त्यानंतरचा जीवनसंग्राम या साऱ्या कौटुंबिक आशाआकांक्षांना तिलांजली देणारा ठरला.

सुरवातीस राजाभाऊंनी चंद्रपूरच्या जिल्हा व सत्रन्यायालयात वकिलीचा व्यवसाय सुरु केला. त्याकाळात बोटावर मोजण्याजोगे वकील होते. त्यातल्यात्यात विदेशातून बॅरिस्टर-ॲट-लॉ ची पदवी प्राप्त करणाऱ्या वकिलास तर आणखी जास्त महत्त्व येणे स्वाभाविक होते. चंद्रपूरच्या जिल्हा न्यायालयातील बॅरिस्टर राजाभाऊ हे एकमेव होते. राजाभाऊंच्या मनात आले असते तर या व्यवसायात त्यांनी खोऱ्याने पैसा कमविला असता. पण सामाजिक आंदोलनाचा पिंड असलेल्या राजाभाऊंचे मन या व्यवसायात रमणे शक्य नव्हते. पिढ्यान्पिढ्या अज्ञान, दारिद्र्य अमानुषतेच्या अंध:कारात खितपत पडलेल्या या देशातील दलित समाजाशी राजाभाऊ आणि त्यांच्या कुटुंबाची वचनबद्धता होती. याचे बाळकडू त्यांना लहानपणीच मिळाले होते. व या वचनाच्या पूर्ततेची सुरवात राजाभाऊंनी विद्यार्थी दशेपासूनच केली होती. बाबासाहेबांनी देवाजीबापूंना एक वेगळी मागणी केली. ही मागणी जगावेगळी होती. आपल्या ज्येष्ठ पुत्रास माझ्या झोळीत टाका असे बाबासाहेब देवाजी बापूंना म्हणाले. देवाजीबापू ही मागणी कशी नाकारणार? त्यांनी तात्काळ ही मागणी मान्य केली.

राजाभाऊंनी आपल्या चंद्रपूर या जन्मभूमीतून सार्वजनिक जीवनास सुरुवात केली. सन १९५२ ते ५५ पर्यंत चंद्रपूर नगरपालिकेचे ते उपाध्यक्ष होते. येथील गोलबाजारात अनेक दलित इसमांची दुकाने आजही आहेत. राजाभाऊंनी नगरपालिकेचे उपाध्यक्ष असतांना दलितांसाठी पन्नास वर्षांपूर्वी दुकानांची ही व्यवस्था करून दिली होती. ही दलित कुटुंबे आजही या धंद्यांवर ताठ मानेने जीवन यापन करीत आहेत. या अर्धशतकात त्यांच्या कुटुंबातील अनेक मुले-मुली शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात पुढे गेलेली आहेत.

## नवीन जबाबदारी

सन १९५५ मध्ये बाबासाहेबांनी राजाभाऊंच्या खांद्यावर एक जबाबदारी टाकली. बाबासाहेब स्वत: ज्या ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे अध्यक्ष

होते, त्या राजकीय संघटनेचे सरचिटणीसपद त्यांनी राजाभाऊंना दिले. या पदासाठी अनेक दलित पुढारी बाबू हरिदास आवळे, पी. एन. राजभोज इत्यादि दावेदार होते. परंतु भविष्याचा वेध घेऊन बाबासाहेबांनी राजाभाऊंची निवड केली. बाबासाहेबांनी राजाभाऊंना ते बॅरिस्टर होऊन आले असताना भंडाऱ्याच्या निवडणुकीत जवळून पाहिले होते. सार्वत्रिक निवडणुकीत बाबासाहेब भंडारा या लोकसभा निर्वाचन क्षेत्रामधून उमेदवार म्हणून उभे होते. बाबासाहेबांनी निवडणूक प्रचाराची जबाबदारी राजाभाऊंकडे सोपविली. राजाभाऊंची कार बाबासाहेबांच्या निवडणूक प्रचारासाठी रात्रंदिवस धावत होती. बाबासाहेब निवडणुकीत विजयी व्हावेत ही राजाभाऊंची एकच जिद्द व ध्यास होता. अशाच एका मध्यरात्रीनंतर राजाभाऊ निवडणूक प्रचार दौऱ्यातून पवनीच्या शासकीय विश्रामगृहात आले. त्यावेळेस विश्रामगृह पक्षकार्यकर्त्यांनी खच्चून भरले होते. बाबासाहेबही याच विश्रामगृहात होते. आराम करीत असलेल्या कार्यकर्त्यांना झोपेतून न उठवता विश्रामगृहाबाहेर राजाभाऊंनी हातात असलेली वर्तमानपत्रे जमिनीवर बिछवली व त्यावर त्यांनी आपले अंग टाकले. गर्भश्रीमंतीत जन्मास आलेले राजाभाऊ कार्यकर्त्यांना त्रास न देता जमिनीवर वर्तमानपत्रे टाकून झोपतात हा प्रसंग पाहून कार्यकर्त्यांच्या मनातील राजाभाऊंबद्दलचा आदर द्विगुणीत झाला. बाबासाहेबांना दलितांच्या लढ्यासाठी असाच नेता हवा होता. म्हणून राजाभाऊंपेक्षा ज्येष्ठ असलेल्या नेत्यांना सोडून बाबासाहेबांनी पक्षाच्या सरचिटणीसपदी राजाभाऊंची निवड केली. राजकीय क्षेत्रातील ही फार मोठी जबाबदारी होती. राजाभाऊंना हे पद देऊन बाबासाहेबांनी आपला राजकीय मानसपुत्र म्हणून अप्रत्यक्षरित्या घोषित केले. अगदी तरुण वयात राजाभाऊंच्या कर्तृत्वाला एक नवीन देशव्यापी आयाम मिळाला. राजकीय संघटनेच्या बांधणीसाठी संपूर्ण देशात राजाभाऊंचे भ्रमण सुरू झाले. समाजातील विषमतामूलक तत्त्वांविरुद्ध त्यांनी भक्कम असे व्यासपीठ उभे केले. देशभर दौरे काढून त्यांनी असंख्य दलित कार्यकर्त्यांची शिस्तबद्ध फौज उभी केली. एक कुशल संघटक म्हणून पक्षात त्यांनी अढळ असे स्थान प्राप्त केले. बाबासाहेबांनी ज्या ज्या राजकीय, सामाजिक संघटना बांधल्या त्यांचा उद्देश सामाजिक अन्यायाविरुद्ध लढाई व दलितांचे उत्थान हा होता. या यज्ञकुंडात राजाभाऊंनी तन, मन, धनाने स्वत:ला झोकून दिले. त्यांचे निवासस्थान कार्यकर्त्यांचे आश्रयस्थान होते. राजाभाऊंचा संपूर्ण देशात संचार होत असताना त्यांचे आपल्या जन्मभूमीत नावापुरते वास्तव्य असायचे. त्यांच्या कुटुंबातील प्रत्येक जण राजाभाऊंच्या गैरहजेरीत कार्यकर्त्यांची बडदास्त राखायचा. राष्ट्रीय स्तरावर राजाभाऊंची भटकंती असताना संघटन बांधणीच्या माध्यमातून देशातील दलितांच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्याची संधी राजाभाऊंना मिळाली.

समतेचा लढा पुढे रेटीत असताना बाबासाहेबांच्या मनात काही और होते. धर्मांतर करणे हा त्यांचा पक्का निर्धार होता. त्यासाठी त्यांनी राजाभाऊंना दिल्लीस तातडीने बोलावून घेतले. सन १९५६ च्या ऑगस्ट महिन्यात बाबासाहेबांनी राजाभाऊंसोबत दिल्लीतील आपल्या निवासस्थानी अत्यंत महत्त्वपूर्ण वाटाघाटी केल्या. दिल्लीहून परतताना राजाभाऊ वर्धा येथे थांबले. तेथील पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, "बाबासाहेब येत्या ऑक्टोबर महिन्यात हिंदू धर्म सोडणार हे निश्चित आहे." राजाभाऊंची ही मुलाखत खूप गाजली. त्यांनी बाबासाहेबांचा विश्वास संपादन केला होता. त्याचे हे बोलके उदाहरण होय. सन १४ ऑक्टोबर १९५६ ला बाबासाहेबांनी बौद्ध धम्म स्विकारला व उपस्थित असलेल्या सुमारे पाच लाख लोकांना धम्माची दीक्षा दिली. या ऐतिहासिक धम्मचक्रप्रवर्तनाच्या प्रसंगी दीक्षा ग्रहण करणाऱ्यांमध्ये राजाभाऊ एक होते. या धम्मदीक्षेच्या सोहळ्याची जबाबदारी राजाभाऊंनी आपल्या समर्थ खांद्यांवर घेतली. लगेच तिसऱ्या दिवशी १६ ऑक्टोबर १९५६ ला राजाभाऊंनी आपल्या जन्मभूमीत चंद्रपूर येथे धम्मदीक्षा समारोहाचे आयोजन केले. बाबासाहेब या समारोहासाठी आवर्जून उपस्थित राहिले व सुमारे अडीच लाख लोकांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला. चंद्रपूर येथील दीक्षाभूमी आज नागपूर नंतरची दुसऱ्या क्रमांकाची ऐतिहासिक भूमी झालेली आहे.

राजाभाऊंना बाबासाहेबांच्या प्रकृतीची फार चिंता होती. अगदी निकटचा संपर्क असल्यामुळे बाबासाहेबांचे स्वास्थ्य ठीक नसल्याचे त्यांनी अचूकपणे हेरले. याबाबत एका मुलाखतीत राजाभाऊ म्हणाले, "सामाजिक कार्याचा व्याप लक्षात घेता त्यांची (बाबासाहेबांची) प्रकृति केव्हा बिघडेल हे सांगता येत नाही. म्हणून त्यांच्या सेवेत असणाऱ्या लोकांना त्यांच्या स्वास्थ्याविषयी मोठी काळजी घ्यावी लागते." अखेर ६ डिसेंबर १९५६ ला बाबासाहेबांचे परिनिर्वाण झाले.

भारताच्या सांसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेकरिता बलवान असा विरोधी पक्ष असावा अशी बाबासाहेबांची व त्यांचे राजकीय मानसपुत्र राजाभाऊंची मनोमन इच्छा होती. त्यासाठी बाबासाहेबांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची घटना लिहून ठेवली. परंतु बाबासाहेबांचे अकाली परिनिर्वाण झाल्याने संपूर्ण जबाबदारी राजाभाऊंकडे आली. एका प्रबळ विरोधी पक्षाच्या निर्मितीकरिता राजाभाऊंनी जोरदार हालचाली सुरू केल्या. बाबासाहेबांच्या परिनिर्वाणानंतर अध्यक्षपद रिक्त झाले. राजकारण व समाजकारणावर दुरोगामी परिणाम करणारी ही रिक्त जागा भरण्यासाठी अहमदनगर येथे पक्षाच्या केंद्रीय कार्यकारी मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली. संपूर्ण देशातील आंबेडकरांच्या अनुयायांचे लक्ष या बैठकीकडे लागले. या बैठकीत राजाभाऊंना अध्यक्षपदावर स्थानापन्न करण्याचा सर्व नेत्यांनी

एकमुखी निर्णय घेतला. जी खूर्ची आजवर बाबासाहेब सांभाळायचे त्यावर आपल्याला बसावे लागणार हा विचार राजाभाऊंच्या मनात आल्यावर त्यांचे अंत:करण गलबलून गेले. ऐतिहासिक असा हा प्रसंग होता. अध्यक्षपदाच्या त्या खूर्चीवर जाऊन बसण्याची त्यांची हिंमत होईना. त्यास कारणही तसेच होते. हृदयात साठवून ठेवलेल्या बाबासाहेबांच्या आठवणी व खांद्यावर आलेली नवीन जबाबदारी, अशा क्षणी राजाभाऊंची मानसिक स्थिती काय असेल? बैठकीत उपस्थित असलेल्या सर्व नेत्यांनी राजाभाऊंची ही मानसिक अवस्था हेरली. व राजाभाऊंचा हात धरून साश्रू नयनांनी उपस्थित सर्वांनी त्यांना अध्यक्षपदाच्या खूर्चीवर बसविले. बाबासाहेबांच्या पश्चात राजाभाऊंच्या खांद्यावर ही जबाबदारी कशी आली. हे दर्शविणारा हा प्रसंग आहे.

## नवीन राजकीय पक्ष

राजाभाऊंनी सन १९५७ ला नागपूर येथे ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनच्या सर्व नेत्यांना व कार्यकर्त्यांना निमंत्रित केले. बाबासाहेबांनी लिहून ठेवलेल्या राजकीय पक्षाच्या घटनेन्वये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची संस्थापना करणे व पूर्वीचा पक्ष विसर्जित करणे हा राजाभाऊंचा या बैठकीमागे संकल्प होता. या बैठकीत सर्व नेत्यांनी सर्वानुमते राजाभाऊंवर पुनश्च विश्वास टाकून त्यांच्याकडे नवीन पक्षाची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली. शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे विसर्जन होऊन त्याऐवजी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा पक्ष स्थापन करण्यात आला. राजाभाऊ या पक्षाचे सरचिटणीस झाले. घटनेनुसार पक्ष चालविण्याकरिता एक अध्यक्षीय मंडळ (Presidium) स्थापन करण्यात आले. राजाभाऊ त्यात एक सदस्य होते. प्रेसिडियमचे सदस्य व पक्षाचे अखिल भारतीय सरचिटणीस ही दुहेरी जबाबदारी राजाभाऊंकडे सोपविण्यात आली. याच ठिकाणी पक्षाने आयोजिलेल्या एका परिषदेत राजाभाऊ घोषणा करताना म्हणाले, "दलितांच्या कल्याणाकरिता परमश्रद्धेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जीवनाच्या अंतापर्यंत युद्ध छेडले. हे युद्ध त्यांच्या परिनिर्वाणानंतर निरर्थक ठरेल की काय ही चिंता त्यांना होती. आम्ही या विशाल अधिवेशनात क्रियात्मक रूप देऊन बाबासाहेबांच्या इच्छांची पूर्ती करीत आहोत."

## भूमिहीनांचा सत्याग्रह

सन १९६४ला राजाभाऊंनी या देशातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या भूमिहीन शेतमजुरांसाठी देशव्यापी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. कसेल त्याची जमीन पण नसेल त्याचे काय? ही या लढ्याची साधी घोषणा होती. या बॅनरखाली देशातील सारे भूमिहीन शेतमजूर एकवटले. या राष्ट्रव्यापी सत्याग्रहामुळे तुरुंगाची जागा कमी

पडू लागली. राजाभाऊंनी या लढ्यात आपली व आपल्या पक्षाची सारी शक्ती पणास लावली. खेड्यापाड्यात त्यांनी प्रचार करून तेथील मरगळलेल्या, तेजोहीन झालेल्या ग्रामीण जनतेत नवचैतन्य निर्माण केले. एक एक भूमिहीन मिळून संपूर्ण देशातून राजाभाऊंनी लक्षावधी भूमिहीनांना सत्याग्रहाच्या रणक्षेत्रात उभे केले. राजाभाऊंनी नाशिक येथे हजारो सत्याग्रहींसोबत सत्याग्रह करून स्वत:ला अटक करून घेतली. लालबहादूर शास्त्री सरकार या सत्याग्रहासमोर नमले व वाटाघाटी करून भूमिहीनांना जमिनी देण्याचा निर्णय घेतला. कुठेच हिंसाचार न घडता हा देशव्यापी लढा यशस्वी झाला. या देशव्यापी लढ्यातून राजाभाऊंच्या संघटन कुशल नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले. भूमिहीनांच्या या लढ्याची सांगता अमरावतीत विजयोत्सवाच्या रुपाने झाली. राजाभाऊंच्या कणखर नेतृत्वात सुरू झालेल्या या लढ्याची सांगताही त्यांच्या नेतृत्वात झाली. या लढ्याची दखल जगातील वृत्तपत्रांनी घेतली. रिपब्लिकन पक्षाला या आंदोलनामुळे एक नवा आयाम मिळाला. भारतीय शेतकऱ्यांच्या दैनावस्थेवर राजाभाऊंनी खूप चिंतन केले. लहान कास्तकारांचे जीवनमान उंचावले पाहिजे, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत झाली पाहिजे असे त्यांचे मत होते. त्यासाठी त्यांनी तुरुंगवासही भोगला. शेतजमीन कायद्यात आमुलाग्र बदल करण्याची त्यांची मागणी होती. ज्या कास्तकाराकडे २५ एकरापेक्षा जास्त जमीन आहे ती सरकारने ताब्यात घ्यावी व भूमिहीन शेतमजुरांना ती वाटप करावी अशी राजाभाऊंची आग्रही भूमिका होती. ग्रामीण भागातील आर्थिक विषमता लवकरात लवकर नष्ट करावी व त्यासाठी शेतमजुरांना किमान वेतन कायदा लागू करावा असेही त्यांचे मत होते.

याच कालखंडात सन १९६५ ला राजाभाऊंना अमेरिकन सरकारचे तेथील निग्रोंच्या प्रश्नांचा अभ्यास करण्याकरिता निमंत्रण आले. या तीन महिन्यांच्या वास्तव्यात राजाभाऊंनी निग्रो बांधवांच्या जीवनपद्धतीचा अगदी जवळून अभ्यास केला. तेथे त्यांनी निग्रोंचे उद्धारकर्ते मार्टीन लुथर किंग (ज्युनिअर) यांची भेट घेतली. भारतातील विषम समाजरचनेविरुद्ध दंड थोपटणाऱ्या राजाभाऊंना अमेरिकेतील निग्रोंच्या जीवनाचा अभ्यास करण्याची संधी मिळणे हा योगायोग होता. या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा घेतला.

## राजाभाऊंची संसदीय कारकीर्द

राजाभाऊ पहिल्यांदा राज्यसभेवर निवडून गेल्यानंतर २३ मार्च १९५८ ला नागपूरच्या चिटणीस पार्कवर त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना राजाभाऊ म्हणाले, 'मुकुटधारी शिरावर फार मोठी जबाबदारी येते.

व ती जबाबदारी इमानदारीने, हिंमतीने व आपल्या सर्वांच्या सहकार्याने मी पार पाडेन. बाबासाहेबांच्या जागेवर राज्यसभेत मी जात आहे. बाबांच्या अमर्याद विद्वत्तेचा लक्षांश देखील माझ्यात नाही. हे मी आपणासमोर कबूल करतो. बाबांच्या परिनिर्वाणानंतर निर्माण झालेली पोकळी भरून काढण्यासाठी एकटे शिवराज, एकटे गायकवाड वा कांबळेच नाही. ही जाणीव होती. म्हणून आम्ही संयुक्त नेतृत्वाचा स्विकार करून अकरा जणांचे प्रेसिडियम निर्माण केले व ते आज काम करित आहे. व तसेच परस्पर सहकार्याने काम करित राहील याची मी आपणास खात्री देतो. त्यासाठी बाबांनी निर्माण केलेली अभेद्य संघटना आपल्या पाठीशी आहे. व त्यामुळेच आपल्यासमोर असलेले कठीण प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. त्यांची सोडवणूक करण्यासाठी अभेद्य, बलशाली संघटन उभे करणे व संघर्षरत असणे हाच एकमेव पर्याय आहे. दलित-बौद्धांवरील अत्याचारांचा उल्लेख करून राजाभाऊ म्हणाले, 'यासाठी आपणास कणखर असा लढा उभारावा लागेल. आमचे प्रश्न एकरुपी नाहीत तर बहुरुपी आहेत. नुसती पोटाला भाकर मिळविणेच नाही तर भाकर मानाने खाणे, आर्थिक उद्धार करणे, समानतेचा अधिकार मिळविणे इत्यादि असंख्य प्रश्न सोडवायचे आहेत. हजारो वर्षांपासून आम्ही त्रास सहन करीत आहोत. निर्वासितांची व्यवस्था करण्याकरिता शासन त्यांना जमिन देते. पण लक्षावधी एकर जमीन तशीच पडित असून शासन ती भूमिहीनांना देत नाही. याकरिता आपणास लढा उभारावा लागेल.'' दलितांच्या दयनीय स्थितीबद्दल या सत्कार-समारंभात बोलताना राजाभाऊ म्हणाले, 'देशात महागाई वाढत आहे. आपल्याला आपलाच नाही तर देशातील सर्व गरीब जनतेच्या, बहुजन समाजाच्या प्रश्नांची सोडवणूक करावयाची आहे. देशात भांडवलशाही फोफावू लागली आहे. मुंदडासारखी भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर येऊ लागली आहेत. केंद्रिय सरकारने नुकताच सादर केलेला अर्थसंकल्प भांडवलशाहीला फायद्याचा आहे. गोरगरीबांचे त्यात मुळीच कल्याण नाही.'' भाषिक प्रश्नांचा उहापोह करतांना राजाभाऊ म्हणाले, ''दक्षिणेत स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची राष्ट्रघातकी चळवळ सुरु असल्याची नेहरू सरकारची तक्रार आहे. आज ना उद्या भाषिक प्रश्नांना गंभीर स्वरूप येणे अटळ आहे. उत्तरेचे व दक्षिणेचे भांडण जुंपेल व त्यामुळे राष्ट्राच्या एकसंघतेवर विपरित परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. उत्तरेचे प्रांत विशालकाय आहेत. दक्षिणेची राज्ये छोटी छोटी आहेत. मुंबईचे महाद्विभाषिक ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. ही सर्व स्फोटक परिस्थिती केव्हा भारताच्या चिंधड्या उडवेल याचा नेम नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या म्हणण्याप्रमाणे भाषिक प्रांतरचना झाल्याशिवाय हे संकट टळू शकत नाही.'' शेवटी बोलतांना राजाभाऊ म्हणाले,

"आपल्या पोटापाण्याच्या प्रश्नांपेक्षा भारतीय स्वातंत्र्याच्या रक्षणाचा प्रश्न फार मोठा आहे. हा प्रश्न सोडवितांना देशाला फार मोठ्या संकटाशी तोंड द्यावे लागणार आहे. माझे सहकारी व आपण सारे मिळून संघटितरित्या या राष्ट्रीय प्रश्नांना तोंड देण्यात सहयोग करू शकतो. आपण सर्व गोरगरिबांचे, दीनदुबळ्यांचे कल्याण करण्याकरिता झटू या."

राजाभाऊ निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल त्यांच्या जन्मभूमीत चंद्रपूर येथे अफाट जनसमुदायाच्या साक्षीने जाहीर सत्कार करण्यात आला. देशातील दलित चळवळीचे अग्रणी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे एक अत्यंत विश्वासू सहकारी खासदार कर्मवीर दादासाहेब गायकवाड या सत्कार सोहळ्यात खासकरून उपस्थित होते. याप्रसंगी राजाभाऊंचा गौरव करतांना ते म्हणाले, "ह्या राजाची निवड कुणी केली ती बाबांनी. बाबासाहेब हे एक रत्नपारखी होते. रत्नांची पारख फक्त रत्नपारखीच करू शकतो. राजाभाऊ कर्तबगार आहेत, म्हणूनच बाबासाहेबांनी त्यांची निवड केली. उत्कृष्ट कोण असा जर मला प्रश्न टाकण्यात आला तर मी सांगेन राजाभाऊ... आम्ही सर्वच माणसे बाबासाहेबांच्या जवळ वावरत असतांना आम्हा सर्वांमधून बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांनाच त्यांनी आपला सरचिटणीस निवडले. आमच्यातील इतर कोणाहीपेक्षा आज त्यांचा दर्जा उच्च व बहुमानाचा आहे." याप्रसंगी राजाभाऊंचे अत्यंत हृदयस्पर्शी भाषण झाले. ते म्हणाले, 'जनता आता जागृत झालेली आहे. जे माझे मित्र आमदार, खासदार आहेत, त्यांच्या व जनतेच्या सहकार्याने मागासवर्गीयांची गाऱ्हाणी मांडून त्यांच्यावरील संकटे दूर करण्याचा प्रयत्न करू.' त्याकाळात वर्धेहून 'सिद्धार्थ' नामक पाक्षिक निघायचे. सुप्रसिद्ध विद्वान डॉ. भदन्त आनंद कौसल्यायन हे या पाक्षिकाचे मार्गदर्शक होते. तेव्हा त्यांचे वास्तव्य वर्धेलाच असायचे. राजाभाऊंचा गौरव करतांना त्यांनी लिहिले, "समाजसेवेविषयी बॅरिस्टरसाहेबांना नैसर्गिक आवड आहे. समाजसेवेची कामे करण्यातच त्यांचा बराच वेळ जातो. ते अविश्रांत काम करीत असतात. लोकहिताची त्यांना मनापासून तळमळ असल्यामुळे त्यांच्या वागणुकीत तीव्र आस्था दिसून येते. त्यांचे व्यक्तिमत्त्व आकर्षक आहे. स्वत:चे म्हणणे स्पष्ट व सुसंस्कृतरित्या मांडण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे."

राजाभाऊ १९६६ला पुन्हा राज्यसभेवर निवडून आले. एकूण तीन टर्म्स म्हणजे तब्बल अठरा वर्षे ते या वरिष्ठ सभागृहाचे सदस्य होते. संसदेत व संसदेबाहेर एक पट्टीचा वक्ता म्हणून त्यांची ख्याती होती. राज्यसभेतील राजाभाऊंची कारकीर्द अत्यंत प्रभावी व अविस्मरणीय ठरली. एक अभ्यासू संसदपटू म्हणून सदन त्यांना आदराने पहायचे. आजही त्यांच्या राज्यसभेतील भाषणांचे स्मरण केले जाते. बौद्धांचे

प्रश्न, दलित, आदिवासींचा होत असलेला अमानूष छळ इत्यादी प्रश्नांना राजाभाऊंनी राज्यसभेत अत्यंत प्रभावीपणे वाचा फोडली. इंग्रजी भाषेवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी लक्ष्मी बँकेच्या अफरातफरीचे प्रकरण राज्यसभेत मांडून या बँकेतील भ्रष्टाचाराची लक्तरे सभागृहात टांगली. या प्रकरणात धनदांडगे लोक गुंतले होते. समस्त देशवासियांचे लक्ष या प्रकरणामुळे राजाभाऊंकडे गेले. लोकांचा पैसा या बँकेत फसला होता. राजाभाऊंनी हे प्रकरण धसास लावून लोकांना त्यांचा पैसा मिळवून दिला. संसदेत पहिल्यांदाच स्थापन झालेल्या कमिटी फॉर शेड्युल्ड कास्ट ॲण्ड ट्राईब्जमध्ये राजाभाऊंची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. संसदेच्या पब्लिक अकाऊंट्स कमिटीवर ते बरीच वर्षे सदस्य होते. रेल्वेच्या सांसदिय समितीवरही त्यांनी काम केले.

## राज्यसभेचे उपसभापती

सन १९७०ला राजाभाऊ राज्यसभेचे उपसभापती म्हणून निवडले गेले. ज्या सभागृहाचे सभापती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन्, व्ही. व्ही. गिरी होते, त्या सभागृहाचे उपसभापतीपद भुषविण्याचा सन्मान राजाभाऊंना मिळाला. पदावर असेपर्यंत राजाभाऊंनी या वरिष्ठ सभागृहाची गरिमा अत्यंत खुबीदारपणे कायम राखली. आपल्या सांसदीय जीवनाच्या कालखंडात त्यांनी सभागृहाला हास्यकल्लोळात नेण्याचेही कसब दाखविले. राजकारणात राजनारायण ही व्यक्ती एक अजब वल्ली होती. प्रख्यात समाजवादी असलेले राजनारायण राजाभाऊंसोबत अनेक वर्षे राज्यसभेत होते. त्यांचा तापट व लहरी स्वभाव समस्त देशवासियांना परिचित होता. त्यांची राजाभाऊंशी चांगली मैत्री होती. राज्यसभेत एकदा एक मजेदार घटना घडली. उपसभापती राजाभाऊ आपल्या चेंबरमध्ये बसले होते. राजनारायण यांचा सभागृहात एका मुद्द्यावर वाद झाला असतांना त्यांनी सभापतींच्या आसनाकडे धाव घेतली. राजाभाऊंच्या चिटणीसांनी त्यांना चेंबरमध्ये या साऱ्या प्रकाराची माहिती देताच राजाभाऊ त्वरित सभागृहात प्रवेशले व राजनारायण यांचा हात धरून त्यांना सन्मानाने आपल्या जागेवर बसविले. सभागृहातील सारी तणावाची स्थिती क्षणात राजाभाऊंनी आपल्या काबूत आणली. प्रसंग असा होता की, एका महत्त्वाच्या विषयावर संबंधित मंत्री सभागृहाला माहिती देत होते. राजनारायण ती माहिती चुकीची असल्याचे सांगताना म्हणाले, ''इसमें जरूर कुछ राज छुपा हुवाँ है.'' राजाभाऊ म्हणाले, ''इसमें राज छिपा है की नहीं यह मालूम नही. लेकिन राजनारायण में जरूर राज छुपा हुवाँ है.'' राजाभाऊंची ही टिपणी ऐकून सारे सभागृह हास्यकल्लोळात बुडून गेले.

दिल्लीच्या विठ्ठलभाई सभागृहात राजाभाऊंचा राज्यसभेचे उपसभापती झाल्याबद्दल भव्य सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व भारताचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण या सत्कार समारंभाचे मुख्य पाहुणे होते. राजाभाऊंचा गौरव करतांना ते म्हणाले, "राज्यसभेत व संसदेत तुमच्यावर असलेल्या जबाबदारीपेक्षा संसदेबाहेर तुमच्या पक्षाचे धुरीणत्व सांभाळण्याची व दिन-दलितांच्या उद्धाराची धुरा वाहण्याची जबाबदारी जास्त महत्त्वाची आहे व ती यशस्वीपणे सांभाळण्यासाठी तुम्हाला दीर्घायु आणि आरोग्यसंपदा लाभो अशी आमची कामना आहे." याप्रसंगी राजाभाऊ अत्यंत भावपूर्ण बोलले. ते म्हणाले, "मी राज्यसभेत असलो वा नसलो, संसदेत राहिलो न राहिलो तरी संसदेबाहेरील कार्य त्यापेक्षा जास्त मानतो. मानत राहीन आणि तुमच्या सर्वांच्या शुभेच्छा पाठीशी असतांना दलितांच्या सेवेत मी आपले सर्वस्व पणाला लावीन."

राजाभाऊंना हा बहुमान मिळाल्याबद्दल त्यांच्या जन्मभूमीत त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. चंद्रपूरच्या सर्किट हाऊसपासून तर गांधीमार्गावरील त्यांच्या निवासस्थानापर्यंत कार्यकर्त्यांची व त्यांच्या चाहत्यांची प्रचंड गर्दी उसळली. त्यांच्या परिवारातील लोकांनी अंतरीच्या भारावलेल्या अवस्थेत कुटुंबातील आपल्या लाडक्या ज्येष्ठ सदस्याचे स्वागत केले. राजाभाऊंच्या मातोश्रींनी डोळ्यात आनंदाश्रू आणून प्रवेशद्वारावर स्वागत केले व आशीर्वाद दिला. आपल्या लाडक्या मुलाचा हा सन्मान पाहण्यास देवाजी बापू या क्षणी हवे होते. राजाभाऊ दिवाणखान्यात बसले. मित्रपरिवार व कार्यकर्ते राजाभाऊंवर अभिनंदनाचा वर्षाव करू लागले. त्यांच्या एका जवळच्या मित्राने या प्रसंगी छेडले, 'राजाभाऊ आपले तर जीवनच बदलून गेले आहे.' यावर राजाभाऊ उत्तरले, 'अहो, कसला आला बदल. यापूर्वी मी महिन्याचे पंचवीस दिवस बाहेर घालवायचा; आजही तोच क्रम आहे. फरक एवढाच की, आतापर्यंत मी आगगाडीने प्रवास करीत होतो. आता हा प्रवास विमानाने होईल.' 'इंडिया टू डे' या प्रख्यात इंग्रजी नियतकालिकाने राजाभाऊ राज्यसभेचे उपसभापती झाल्याबद्दल एका शब्दात गौरव केला. या साप्ताहिकाने लिहिले, Bar. B. D. Khobragade is a seasoned politician. एका राष्ट्रीय स्तराच्या दर्जेदार नियतकालिकाने लिहिलेले हे शब्द आहेत. महाराष्ट्रातील एक खंदे स्वातंत्र्य-सेनानी तुळशीदास जाधव ह्याच सुमारास चंद्रपूरला आले असतांना त्यांची येथील टाऊन हॉलमध्ये जाहीर सभा झाली. या सभेत जाधवांनी राजाभाऊंचा अत्यंत गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला. ते म्हणाले, "आज राज्यसभेच्या उपसभापतीच्या खुर्चीवर एक दलित बॅरिस्टर बसतो. याचा अभिमान साऱ्या सभागृहाला व देशवासियांना आहे." राजाभाऊंचा पिंड विरोधी पक्ष नेत्याचा होता. उपसभापतीपदाच्या

निवडणुकीत त्यांचे राज्यसभेतील मित्र गौरी मुरहारी हे प्रतिस्पर्धी होते. आम्ही त्यावेळेस दिल्लीत राजाभाऊंच्या निवासस्थानी होतो. राजाभाऊ गौरी मुरहारी यांना म्हणाले, "मुरहारीजी, मैं विरोधी पक्ष की ओरसे चुनाव में हूँ. आपको एतराज ना हो तो मैं चुनाव लडूँगा."

राज्यसभेचे उपसभापती असतांना त्यांची उत्तरप्रदेशातील फतेहगढ येथील पत्र परिषद खूप गाजली. नक्षलवादावर ते म्हणाले, "या हिंसाचाराची रोकथाम करावयाची असेल तर समाजातील पददलित व आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या वर्गाची प्रगती होणे नितांत आवश्यक आहे." नक्षलवाद आर्थिक परिस्थितीशी निगडित असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यांच्या जन्मभूमीच्या सीमेवर आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश व महाराष्ट्रात हा वाद फोफावला. या पार्श्वभूमीवर राजाभाऊंची ही मुलाखत अत्यंत स्फोटक ठरली. याच पत्रपरिषदेत त्यांनी माजी संस्थानिकांचे तनखे बंद करा अशी मागणी केली. जरूर पडल्यास याकरिता त्यांनी राज्यघटनेत दुरुस्तीचेही समर्थन केले. आर्थिक स्थितीचा मुद्दा उपस्थित झाल्यामुळे राजाभाऊंच्या एका महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल लिहिणे जरूरीचे आहे. भारतीय संविधानातील अनुसूचित जाती व जमातींच्या राखीव जागांचे ते समर्थक होते. परंतु त्याचबरोबर या देशातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्यांना मग ते ब्राह्मण असोत, त्यांच्यासाठीही नोकऱ्या व इतरत्र राखीव जागांची तरतूद करा असे त्यांचे मत होते. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या घोषणापत्रातूनही त्यांनी ही मागणी लोकांच्या समोर ठेवली.

राजाभाऊंनी संपूर्ण हयात दलितांच्या समस्यांसाठी संघर्ष करण्यात घालविली. दलितांवरील अन्याय, अत्याचारांच्या वार्ता त्यांच्या कानावर आल्या की, त्यांचे अंत:करण विदिर्ण होत असे. कधी कधी या खातर ते अत्यंत टोकाची भूमिकी घेत असत. अखिल भारतीय संप्रदायवादी समितीच्या दिल्लीत आयोजिलेल्या मेळाव्यात राजाभाऊ गरजले, 'दलितांवरील अनन्वित अत्याचार, अत्यंत निर्दयपणे त्यांचे खून होणे, त्यांना मिळत असलेली अमानुष वागणूक व भारतीय समाजाचे त्यांच्याकडे असलेले दुर्लक्ष एक दिवस भारतीय अस्पृश्यांना अन्य मार्ग अनुसरण्यास भाग पाडतील. आज देशातील अस्पृश्यांचा संयम ढळलेला आहे. अत्याचारांमुळे त्यांच्या मनावरील ताबा सुटलेला आहे. हा प्रश्न सुंयक्त राष्ट्रसंघाकडे का नेऊ नये?" असा प्रश्न त्यांनी या मेळाव्यात केला. नागपूरच्या एका युवक मेळाव्यात तरुणांना मार्गदर्शन करतांना राजाभाऊ म्हणाले, "वर्गकलहाचा लढा लढत असतांना युवकांनी देशाला घातक ठरेल असे कार्य करू नये." पुरोगामी विरुद्ध प्रतिगामी असे युद्ध सुरू झाल्याचाही इशारा त्यांनी याप्रसंगी दिला.

केंद्र व राज्यात एकपक्षीयच सरकार हवे असे म्हणणे असंवैधानिक असल्याचे राजाभाऊंचे मत होते. भारताच्या राज्यघटनेचे स्वरूप लक्षात घेतल्यास केंद्रात व राज्यात विभिन्न सरकारे असावीत हा अर्थ घटनाकारांना अभिप्रेत होता. असे त्यांचे म्हणणे होते. राष्ट्रीय एकात्मता परिषदेचे राजाभाऊ सदस्य होते. पंतप्रधान श्रीमती गांधी परिषदेच्या अध्यक्षा होत्या. राजाभाऊंनी या परिषदेच्या माध्यमातून अत्यंत मोलाची कामगिरी बजावली. श्रीमती गांधी राजाभाऊंचा एक राष्ट्रीय नेते म्हणून सन्मान करीत असत.

## राजाभाऊंची वैचारिक बैठक

राजाभाऊंनी संसदेत व संसदेबाहेर वेळोवेळी विविध विषयांवर चिंतनशील व मौलिक विचार मांडलेले आहेत. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तराची ही मते असून जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रास स्पर्श करणारी आहेत. त्यांच्या या मौलिक विचारांचे चिंतन आजही केले जाते. एक मुरब्बी असा संसदपटू म्हणून त्यांची ख्याती होती. हे निर्विवाद आहे. संसदेत व संसदेबाहेर त्यांनी जी जी मते मांडली, त्या सर्वांचे सार लक्षात घेतल्यास, बहुजनांचा दलित-पीडितांचा हुंकार त्यांच्या प्रत्येक शब्दात दडला असल्याची जाणीव झाल्याशिवाय राहत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशात उभ्या केलेल्या समतेच्या लढ्याचा अन्वयार्थ राजाभाऊंनी अगदी वेचक शब्दांमध्ये लावला. बाबासाहेबांच्या जयंतीदिनी सन १९६९ला नागपूरच्या आकाशवाणीवरून भाषण देतांना राजाभाऊ म्हणाले, 'केवळ मंदिर-प्रवेशाने किंवा सामाजिक चळवळीने अस्पृश्यांचा उत्कर्ष होईल अशी बाबासाहेबांची भ्रामक कल्पना नव्हती. हजारो वर्षांपासून निर्जिव बनलेल्या समाजात चैतन्य निर्माण करण्याचा तो एक लढा होता.'

बांगला देशचे शिल्पकार मुजिबर रहमान यांना स्वतंत्र बांगला देशच्या निर्मितीसाठी श्रीमती गांधींनी सक्रिय सहाय्य केले असतांना राजाभाऊ पहिली व्यक्ती, ज्यांनी स्वतंत्र बांगला देशच्या लढ्याला जाहीर पाठींबा दिला. ते म्हणाले, 'स्वतंत्र बांगला देशचे अस्तित्व अटळ आहे.' पाकिस्तानच्या सैन्याची भारताच्या सीमेवर जमवाजमव सुरू असल्याचे ते म्हणाले व देशवासियांना सावधगिरीचा इशारा दिला. पाकिस्तानचे लष्करशहा जनरल याह्याखान यांच्या आक्रमणाचा बिमोड करण्यासाठी आपण सर्व शक्ती पणास लावली पाहिजे असेही आव्हान त्यांनी केले.

राजाभाऊंनी 'पंचायत राज'बद्दलची आपली मते स्पष्टपणे मांडलेली आहेत. त्यांचे असे मत होते की, पंचायत राजच्या निर्मितीमुळे सत्तेचे विकेंद्रिकरण जरी

होणार असले तरी खेड्यापाड्यांमध्ये राहणाऱ्या दलित व आदिवासी बांधवांवरील अत्याचार वाढतील. कारण खेडेविभागातील सवर्ण समाज धनसंपन्न आहे व राजकारणावर त्यांचा पगडा आहे. संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'पंचायत राज' संकल्पनेला विरोध केला होता, ही आठवणसुद्धा त्यांनी करून दिली.

राज्य विधानसभा व लोकसभेतील अनुसूचित जाती व जमातींच्या राखीव जागांबाबतही राजाभाऊंचे स्पष्ट व पारदर्शी मत होते. तेव्हाचे केंद्रिय समाजकल्याणमंत्री पी. गोविंद मेनन यांनी लोकसभेत घोषणा करतांना म्हटलं होतं की, 'अनुसूचित जाती व जमातीच्या राजकीय आरक्षणाचा कालखंड पुढे वाढविण्यात येणार नाही.' राजाभाऊ राज्यसभेत गोविंद मेनन यांच्या वक्तव्यासंबंधी आपले मत मांडतांना म्हणाले, 'अनुसूचित जाती जमातींना दिल्या गेलेल्या राजकीय राखीव जागांमुळे खरा उद्देश सफल होऊ शकला नाही. हे आतापर्यंतच्या अनुभवांवरून सिद्ध झालेले आहे. राखीव जागा असूनसुद्धा सध्याच्या मतदानपद्धतीमुळे राज्याच्या विधान सभा व लोकसभेत अनुसूचित जाती व जमातीचे खरे प्रतिनिधित्व उमटू शकले नाही. राखीव जागांमुळे जाती-जमातीचे काही प्रतिनिधी अवश्य निवडून येतात. पण ज्यांचे ते प्रतिनिधित्व करतात त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यास ते असमर्थ आहेत. या जाती-जमाती अल्पसंख्य व निर्धन असून निवडणुकीत या उमेदवारांना सधन अशा सवर्ण हिंदूंवर अवलंबून रहावे लागते. म्हणून जरी दलित-आदिवासींची सवर्णांकडून छळवणूक होत असली तरी विधीमंडळे व संसदेत जाती-जमातींच्या प्रतिनिधींची त्यांच्याविरुद्ध बोलण्याची हिंमत होत नाही. आपला मुद्दा अधिक स्पष्ट करतांना राजाभाऊ म्हणाले, 'राखीव जागांमुळे प्रभावी प्रतिनिधीत्व प्राप्त होऊ शकत नाही व त्या त्या जाती जमातीच्या हितांचे संरक्षणही होऊ शकत नाही. अनुसूचित जाती-जमातींचे खऱ्या अर्थाने प्रभावी प्रतिनिधित्व पाहिजे असेल तर सध्याच्या निवडणूक प्रणालित बदल करणे आवश्यक आहे.' सध्याची निवडणूक प्रणाली सदोष असल्याचे त्यांचे म्हणणे होते. राजाभाऊंना विद्यमान निवडणूक प्रणालीऐवजी प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाची पद्धती हवी होती. या तत्त्वांवर आधारलेली मतदानपद्धतीच फक्त अनुसूचित जाती-जमातींच्या लोकसभा व राज्यविधानसभांमधील प्रभावी प्रतिनिधित्वाची खात्री देऊ शकते, असे त्यांचे ठाम मत होते. निवडणूक प्रणालित बदल व्हावा व प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाची पद्धती देशाला लागू व्हावी याकरिता राजाभाऊंनी आपल्या पक्षाच्या निवडणूक जाहीरनाम्यात या मागणीचा अंतर्भाव केला. त्यासाठी मोर्चे, सत्याग्रह व जेलभरो आंदोलनही केले.

राजाभाऊंची धर्मनिरपेक्ष तत्त्वांवर फार श्रद्धा होती. माजी राष्ट्रपती डॉ. झाकीर हुसेन यांना राज्यसभेत श्रद्धांजली अर्पण करतांना ते म्हणाले, "भिन्न भिन्न सामाजिक

शक्ती, अनेक संप्रदाय, विविध धर्म असल्यावरही डॉ. झाकीर हुसेन यांनी नेहमीच धर्मनिरपेक्ष शक्ती बळकट करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे भारताच्या सर्वोच्च अशा राष्ट्रपतीदावर विराजमान होणे म्हणजे धर्म निरपेक्ष शक्तींचा विजय होय.'' मुंबईच्या घाटकोपर येथील एका सत्कार समारंभात राजाभाऊ म्हणाले, 'भारत वेगवेगळ्या भाषा, धर्म, पंथ असलेले राष्ट्र असल्यामुळे येथे बावन्नकशी राष्ट्रीय एकात्मता निर्माण व्हावयास हवी. पण दुर्दैवाने अशी एकात्मता युद्धकाळ सोडल्यास इतर वेळेला दिसत नाही. प्रांत, भाषा, धर्म, पंथ यामुळे अनेक फुटीर प्रवृत्ती डोके वर काढीत आहेत. यास आळा घालावयाचा असेल व प्रखर राष्ट्रनिष्ठा निर्माण करावयाची असेल तर फेडरेल स्वरूपाची घटना मजबूत होणे आवश्यक आहे.'

सन १९७०ला 'एक राष्ट्र : एक जनता' या मर्मभेदी विषयावर राजाभाऊंचे भाषण नागपूरच्या आकाशवाणीने प्रसारित केले. आकाशवाणीच्या या भाषणात देशातील वाढत असलेल्या प्रतिक्रियावादी शक्तीवर कडाडून हल्ला करतांना राजाभाऊ म्हणाले, ''भारत हे हिंदू राष्ट्र आहे. अशा विचारसरणीचा पुरस्कार काही प्रतिक्रियावादी संघटना करीत आहेत. ही विचारसरणी राष्ट्रीय एकात्मतेस अत्यंत घातक आहे. अशा घातक प्रवृत्तींना आपण वेळीच आळा घातला पाहिजे. भारतात विविध धर्म-पंथाचे लोक राहतात. हिंदू नागरिकांप्रमाणे इतरांनाही आपल्या नागरीक हक्कांचा उपभोग घेण्याचा अधिकार आहे. त्याकरिता आपण राज्यघटनेत धर्मातीत तत्त्वांचा अवलंब केलेला आहे. या देशात विभिन्न धर्मिय लोक वास्तव्य करीत असल्यामुळे परस्परांबद्दल प्रेम, आदर, बंधुभाव निर्माण होईल, असे सहजीवन प्रत्येकाने जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे.'' स्वतंत्र भारतात राष्ट्रीय ऐक्य व भावनात्मक एकात्मता निर्माण होण्याची निकड असल्याचे सांगून राजाभाऊ म्हणाले, 'त्यासाठी आपण आपल्या संकूचित व कोत्या भावनांना तिलांजली देऊन राष्ट्रीय प्रवाहाबरोबर जाण्याची मानसिक तयारी ठेवली पाहिजे. आपला देश आज क्रांतीच्या उंबरठ्यावर उभा आहे. सामाजिक न्याय व आर्थिक समानता लोकशाहीच्या मार्गाने प्रस्थापित करून समता व बंधुभाव या चिरंतन तत्त्वांवर आधारलेला धर्मनिरपेक्ष एकजिनसी भारतीय समाज आपल्याला निर्माण करावयाचा आहे.

## छोटी राज्ये व राजाभाऊ

सध्या देशात सर्वत्र लहान लहान राज्यांची मागणी जोर धरू लागली आहे. अलिकडे केंद्रिय सरकारने छत्तीसगड, उत्तराचल, झारखंड राज्यांच्या निर्मितीकरिता मंजूरी दिली. विदर्भ, तेलंगणा इत्यादी छोट्या छोट्या राज्यांच्या मागण्यांसाठी लोक

रस्त्यावर येऊ लागले आहेत. राजाभाऊंनी या आधीच लहान राज्यांविषयी आपली मते मांडलेली आहेत. लहान राज्यांच्या निर्मितीकरिता द्वितीय राज्यपुनर्रचना आयोग नेमावा अशी राजाभाऊंनी मागणी केली होती.

राज्यसभेत व बाहेर राजाभाऊंनी सडेतोड, खणखणीत असे मौलिक विचार व्यक्त केलेले आहेत. त्यांनी वटहुकुमांच्या सर्रास वापरावर कोरडे ओढले. अत्यंत दुर्मिळ व नाजूक प्रसंग सोडल्यास सरकारने वाटेल तेव्हा वटहुकुमाचा आश्रय घेणे अनिष्ट असल्याचे त्यांचे म्हणणे होते. संसदेचे अधिवेशन नसतांना राष्ट्रपतींनी सन १९७१ला एकंदर तेरा वटहुकूम काढले होते. विरोधी पक्षीय नेत्यांनी याबाबत आक्षेप घेतले होते. विरोधी पक्षियांच्या या आक्षेपाबद्दल सभागृहात आपले मत व्यक्त करतांना राजाभाऊ म्हणाले, "सरकारने विरोधकांच्या भावनांची योग्य बूज राखली पाहिजे. अत्यंत आवश्यक व तातडीच्या प्रसंगाव्यतिरिक्त सरकार यापुढे वटहुकुमांचा आश्रय घेणार नाही अशी मी आशा बाळगतो. आणीबाणीच्या अथवा असामान्य स्थितीत सरकारचा वटहुकूम काढण्याचा अधिकार नाकारता येणार नाही. वटहुकुमांना संसदेकडून मान्यता मिळविण्यासाठी सरकार जे प्रयत्न करेल ते संवैधानिक आहेत."

पाकिस्तानने भारतावर आक्रमण केले त्या कालखंडात राजाभाऊ राज्यसभेच्या उपसभापतीपदावर होते. सभागृहात बोलतांना राजाभाऊ म्हणाले, "मी या सन्मान्य सभागृहाचा उपसभापती झाल्यानंतर गेल्या दोन वर्षांपासून अतिमहत्त्वाच्या विषयांवर मत व्यक्त करण्याबाबत स्वत:वर बंधन घातलेले आहे. परंतु पाकिस्तानच्या आक्रमणामुळे मला मत व्यक्त करणे भाग पडत आहे. अशा आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय रिपब्लिकन पक्ष व सरकार भारतीय जनतेच्या पाठीशी सर्वशक्तीनिशी खंबीरपणे उभे राहील. या गंभीर प्रसंगावर सभागृहात सर्वच राजकीय पक्षांनी आपली मते मांडली. महान भारत देशाच्या राजकीय नेत्यांनी जी मते व्यक्त केलीत त्यांच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे."

'काही सन्मान्य सभासदांनी मते व्यक्त करतांना सभागृहात म्हटले आहे की, चालून आलेल्या या संधीचा फायदा उचलून पाकिस्तानला योग्य धडा शिकविला पाहिजे. १९६५ साली पाकिस्तानने आपल्या देशावर आक्रमण केल्यानंतर आपण त्या देशाला चांगलाच धडा शिकविला होता. याची मी सभागृहाला आठवण करून देऊ इच्छितो. पाकिस्तान तो धडा कदाचित विसरला असेल. पाकिस्तानने भारतावर पुन्हा आक्रमण केलेले आहे. आणि सीमेवर लढत असलेले आपले जवान, पाकिस्तान कधी विसरणार नाही असा धडा शिकवतील यात मुळीच संशय नाही.

सभापती महोदय, आम्ही बांगला देशाच्या मुक्तिलढ्याला सहाय्य केल्यामुळे पाक लष्कराने बांगला देशास सोडून भारताकडे आपली नजर वळविली आहे. आम्ही या आक्रमणास धैर्याने तोंड देऊ व सीमेवर लढत असलेली आपली सेना पाकिस्तानी आक्रमणाचा बिमोड करेल हे नि:संशय.''

'मला सभागृहाचा जास्त वेळ घ्यावयाचा नाही. मला येथे एकच मत मांडावयाचे आहे व ते म्हणजे बांगला देशाच्या मान्यतेबाबत आपण फार उशीर केलेला आहे. म्हणून केवळ बांगला देशाच्या प्रश्नावर आक्रमण ओढवेल असे असल्यास सरकारने बांगला देशास तात्काळ व बिनाविलंब मान्यता दिली पाहिजे. भारतीय रिपब्लिकन पक्ष ज्या गोरगरीब व शोषित वर्गाचे प्रतिनिधित्व करतो, त्या वतीने मी बिनशर्त व निर्धारपूर्वक पाठिंबा व्यक्त करतो. मला येथे एका मुद्द्याचा उल्लेख करावयाचा आहे. ज्या वर्गाचे आम्ही प्रतिनिधित्व करीत आहोत, तो वर्ग गरीब असल्याने सोने अथवा पैसे देऊ शकणार नाही. पण या सभागृहास, सरकारला व पंतप्रधानांना मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, स्वातंत्र्य, एकता व एकात्मतेच्या रक्षणासाठी ही गरीब जनता वाटेल तो त्याग करावयास व मातृभूमीच्या रक्षणासाठी रक्ताचा शेवटचा थेंब सांडावयास तयार आहे.'

'१९६२-१९६५च्या आक्रमणाच्या काळात शोषित व गोरगरीब जनतेने स्वातंत्र्य व एकात्मतेसाठी जो त्याग केला व अतुलनीय पराक्रम गाजविला त्या प्रसंगाची आठवण मी या सभागृहास करून देऊ इच्छित नाही. इतिहासाची पाने आपण जर पडताळल्यास तो मग छत्रपती शिवाजी महाराजांचा कालखंड असो अथवा स्वातंत्र्य रक्षणाचा प्रसंग असो, या देशातील दलित, शोषित जनतेने देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अथवा स्वातंत्र्य रक्षणार्थ बलिदान केलेले आहे. म्हणून आजच्या आणीबाणीच्या गंभीर प्रसंगी देशाची एकता, एकात्मता व स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी कोणताही त्याग करावयास माझा पक्ष सरकार व जनतेच्या पाठीशी उभा राहील.'

राजाभाऊंनी बांगला देश अस्तित्वात आल्यानंतर लगेच एका पत्रकाद्वारे वंगबंधू शेख मुजीब रहमान यांची ताबडतोब मुक्तता करण्याबाबत प्रयत्न झाले पाहिजेत अशी मागणी केली. पत्रकात राजाभाऊंनी म्हटले की, बांगला देश पूर्णपणे मुक्त होऊन एक स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून जन्मास आलेले आहे. यापुढे बांगला देशवासी स्वातंत्र्याच्या मुक्त वातावरणात श्वास घेऊ शकतील. गेल्या आठ महिन्यांपासून बांगला बंधूंनी निर्दयी पाक फौजेशी त्याग, अनंत हाल-अपेष्टा सहन करित जो लढा दिला त्याचे फळ म्हणजे स्वतंत्र बांगला देश होय. निर्धार व अदम्य धैर्य यामधून हे नवीन राष्ट्र जन्मास आलेले आहे. समाजवाद व धर्मातीतता या

आधारावर शांती, प्रगती व भरभराटीकडे वाटचाल करणाऱ्या या नवीन राष्ट्रास माझ्याकडून शुभेच्छा व्यक्त करतो. आमच्या सेनेने जो अतुल पराक्रम गाजवला त्याबाबत प्रत्येक भारतीयास अभिमान आहे. आमच्या शूर फौजेच्या सहाय्याने बांगला देश निर्माण होऊन जगाच्या पाठीवर एक नवीन राष्ट्र अस्तित्वात आले.' असे राजाभाऊंनी पत्रकात म्हटले.

## विदेशात भ्रमण

उपसभापती असताना राजाभाऊंनी आपल्या विदेश दौऱ्यात जर्मन प्रजासत्ताकला भेट दिली. या देशात भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून राजाभाऊंचे प्रचंड स्वागत झाले. जर्मन पीपल्स चेंबर्सच्या इमारतीत या देशाच्या राष्ट्रीय नेत्यांच्या समवेत चर्चा करतांना राजाभाऊ म्हणाले, "जर्मनी व भारत या दोन्ही देशांच्या दरम्यान सांसदीय संबंध दृढ होणे ही काळाची गरज आहे. हा सलोखा प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने सांसदिय शिष्टमंडळाच्या अशा भेटी सतत सुरू राहतील" असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. आपल्या या दौऱ्यात राजाभाऊंनी जर्मन प्रजासत्ताकच्या व्यापार मंडळांच्या भेटी घेतल्या. तेथील लोकांशी सुसंवाद साधला, सरकारी प्रतिनिधींच्या मुलाखती घेतल्या व जर्मन प्रजासत्ताकांच्या समाजवादी समाजरचनेची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली.

राजाभाऊंचा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर गाढ अभ्यास होता. वेळोवेळी त्यांनी राष्ट्राशी निगडित असलेल्या व जनसामान्यांच्या ज्वलंत समस्यांबाबत आपली परखड मते मांडली. विदर्भामधील यवतमाळच्या एका वार्तापरिषदेत ते म्हणाले, "पाकिस्तानच्या युद्धखोर नीतीस लगाम घालण्याच्या दृष्टीने भारत-रशिया करार अत्यंत उपयुक्त ठरलेला असून चीन सध्या अंतर्गत बंडाळीमध्ये फसलेला आहे. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचे दडपण, रशिया, चीन सरहद्दीच्या कुरापती इत्यादीमुळे चीन पाकिस्तानच्या बाजूने लढण्याची मुळीच शक्यता नाही."

जुळी मुंबई व प्रादेशिक असंतुलन यावरही राजाभाऊंनी कोरडे ओढले. "जुळ्या मुंबईच्या रचनेत शक्ती खर्च करण्यापेक्षा महाराष्ट्राच्या अविकसित भागाकडे अधिक लक्ष देऊन तेथे नवीन उद्योगधंदे सुरु करावेत."

पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नांच्या उत्तरात ते म्हणाले की, "महाराष्ट्रात प्रादेशिक असंतुलन खूप वाढलेले आहे. यात केवळ विदर्भाचीच कुचंबणा होत नसून कोंकणवरही अन्याय होत आहे." परभणीच्या एका जाहीर सभेत राजाभाऊ म्हणाले, 'गिरणीत राबणाऱ्या कामगारांप्रमाणेच शेतात कष्ट उपसणाऱ्या शेतमजूरांनाही

बोनस देण्याची तरतूद असावी. सधन शेतकऱ्यांनी आपल्या शेती-उत्पादनामधील नफ्याचा वाटा शेतमजूराला दिला पाहिजे.'

चंद्रपूर येथील सरदार पटेल महाविद्यालयात आयोजित वाणिज्य अभ्यासमंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलतांना राजाभाऊंनी भारताच्या अर्थनियोजनावर टीका केली. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसमोर बोलतांना ते म्हणाले, "नियोजन केवळ नियोजनासाठी नसते. त्यामागे काही सामाजिक उद्दिष्टे असतात. गेल्या काही वर्षात भारताच्या अर्थनियोजनास असफलता प्राप्त झाल्याची कबुली द्यावी लागेल. भारताच्या नव्वद टक्के खेड्यांमध्ये श्रमिक व शेतमालक यांच्यात विषमतेची अभेद्य भिंत उभी झालेली आहे. हरित क्रांतीच्या प्रयोगामुळे खेड्यांमध्ये नवीन श्रीमंत जमीन मालकांची जात निर्माण होऊन खेड्यातील शेतमजुरांची त्यांच्याकडून राजकीय व सामाजिक कोंडी करण्यात येते. हे चित्र म्हणजे आमच्या अर्थनियोजनाच्या असफलतेचे द्योतक आहे. विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना मदत करावी असे भारत सरकार नेहमीच सांगत आलेले आहे. परंतु भारताच्या अर्थनियोजनाचा लाभ येथील अविकसित गटांना न मिळता भांडवलदार व जमीनदारांना मिळालेला आहे. नियोजनाचा उपयोग नवसमाजरचनेसाठी व्हावा असे वातावरण संपूर्ण देशात निर्माण झाले पाहिजे असे ते म्हणाले.

## बांगला देश : पाकिस्तानबद्दल राजाभाऊ

स्वतंत्र बांगला देशाची निर्मिती झाल्यानंतर राज्यसभेचे उपसभापती असलेले राजाभाऊ यांनी सर्वप्रथम पंतप्रधान श्रीमती गांधींचे अभिनंदन केले. या अभिनंदनाच्या पत्रात राजाभाऊ म्हणाले, 'पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी बांगला देशाला दिलेली मान्यता अगदी योग्य वेळेस उचललेले स्वागतार्ह पाऊल आहे. बांगला वासियांनी आपल्या मातृभूमीच्या मुक्ततेसाठी क्रांतीकारी लढा उभारला होता." जगातील इतर राष्ट्रांच्या रांगेत बांगला देश सन्मानाचे व महत्त्वाचे स्थान पटकावेल. अशी आशा व्यक्त करतांना राजाभाऊंनी श्रीमती इंदिरा गांधींच्या धैर्य व निर्भीडपणाची स्तूती केली. बंगलोर येथे आयोजिलेल्या रिपब्लिकन पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनात राजाभाऊंनी बांगला देशाच्या अभिनंदनाचा ठराव पारित करून घेतला. स्वातंत्र्ययोद्धा वंगबंधू मुजिब रहमान यांची पाकिस्तानच्या तुरुंगातून त्वरित सुटका करण्यासाठी अमेरिका व जगातील स्वातंत्र्यप्रेमी लोकांनी पाकिस्तानवर दडपण आणावे असेही ठरावात नमूद करण्यात आले.

मध्यप्रदेशातील भिलाईच्या गुरुघासीदास नगर येथे आयोजिलेल्या पक्षाच्या अधिवेशनात राजाभाऊ म्हणाले, "भारत-पाक युद्धात आपल्याला प्राप्त झालेला

विजय समस्त भारतीय जनतेचा विजय असून जवानांच्या अतूल पराक्रमाने विजयश्री खेचून आणलेली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेव्हा जेव्हा अशी संकटे आली, तेव्हा तेव्हा भारताची जनता एकदिलाने व खंबीरपणे एकत्र आलेली आहे. भारत-पाक युद्धात भारताला जो विजय प्राप्त झाला तो भारताच्या या जनशक्तीत शोधला पाहिजे.'' 'गरीबी-हटाव' कार्यक्रमाबाबत राजाभाऊ म्हणाले, ''याची अंमलबजावणी करण्यासाठी सत्ताधारी पक्षाकडे ठोस असा कार्यक्रम नाही. देशात आजही पदवीधर, डॉक्टर्स, इंजिनिअर्स बेकार असल्यानंतर गरीबीहटाव घोषणेचा फोलपणा सिद्ध होतो.''

राजाभाऊ शेतजमीनीचे राष्ट्रीयीकरण व्हावे या मताचे होते. भारतीय शेतकऱ्यांचे दारिद्र्य दूर करण्याची ही गुरुकिल्ली असे ते म्हणत. बड्या जमिनदारांपासून शेतकऱ्यांना वाचवायचे असेल तर जमिनीच्या राष्ट्रीयीकरणाशिवाय मार्ग नाही असे त्यांचे मत होते. ग्रामीण क्षेत्रातील उद्योगांना चालना देणे,. शहरी मालमत्तेवर मर्यादा आणणे, शहरीविभागातील झोपडपट्ट्यांचा प्रश्न युद्धपातळीवर सोडविणे याबाबत राजाभाऊंची भूमिका स्पष्ट व निसंदिग्ध होती. देशातील गोरगरीब, दिनदुबळ्यांचे उत्थान कसे होईल हा एकच ध्यास त्यांना लागून होता.

विद्यमान निवडणुकप्रणाली सदोष आहे म्हणून त्यात बदल करावा ही राजाभाऊंची भूमिका होती. प्रचलित निवडणूक प्रणालित दलित व मागासवर्गियांना योग्य प्रतिनिधित्व मिळत नाही असे त्यांचे ठाम मत होते. या प्रणालीऐवजी देशाने प्रमाणबद्ध प्रतिनिधित्वाची पद्धती स्विकारावी; जेणेकरून या देशातील सर्व समाजघटकांना योग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल असे त्यांचे मत होते.

सन १९७३-७४ची घटना आहे. चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती तहसिलमध्ये पिरली या नावाचे एक छोटेसे खेडे आहे. सर्व समाजबांधव गुण्यागोविंदाने राहणाऱ्या या खेड्याला कुणाची नजर लागली कुणास ठाऊक! या खेड्यामधील दलित समाज ज्या सार्वजनिक विहिरीवरचे पाणी भरायचा, त्या विहिरीत कुणीतरी जातीयवादी इसमाने विष्ठा टाकल्याचा प्रकार घडला. तेथील काही दलित कार्यकर्ते चंद्रपूरला राजाभाऊंच्या भेटीसाठी आले. परंतु ते दौऱ्यावर असल्यामुळे माझी त्यांच्याशी भेट झाली. तेव्हा राजाभाऊंच्या निवासस्थानाला लागूनच पक्षाचे कार्यालय होते. मी त्यांना घडलेल्या घृणास्पद घटनेबद्दल भद्रावतीच्या पोलीस स्टेशनला ताबडतोब एफआयआर नोंदविण्याचा सल्ला दिला. राजाभाऊ रात्री दौऱ्यावरून परतले. मी दुसऱ्या दिवशी सकाळी पिरलीच्या घटनेबद्दल त्यांना माहिती दिली. घटना ऐकून राजाभाऊ संतापले. मी लगेच पिरलीस गेलो व लोकांच्या भेटीगाठी घेऊन

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषणाकरिता बसण्यासाठी अनुमती घेतली. राजाभाऊंनी या आंदोलनासाठी होकार दिला. तशा आशयाचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिले व पिरलीच्या लोकांसोबत मी प्राणांतिक उपोषणासाठी बसलो. जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांनी या उपोषणास पाठिंबा दिला. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन समस्या लवकर निकालात काढण्याचा सल्ला दिला. राजाभाऊंचीही या नेत्यांनी भेट घेतली. स्वातंत्र्याप्राप्तीनंतरच्या पंचवीस वर्षांनंतरही असे मानवतेस काळीमा फासणारे प्रकार घडतात ही चीड त्यांनी व्यक्त केली. उपोषणाच्या सहाव्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांनी हालचाली सुरू केल्या व त्वरित पिरलीच्या जातीयवादी लोकांना पकडून आणण्याचे आदेश दिले. एकूण अठ्ठावीस सवर्णांना पकडून आणण्यात आले. सहाव्या दिवशी माझ्या उपोषणाची समाप्ती झाली. उपोषण सुटताच मी राजाभाऊंची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. माझ्यासोबत लुलाराम फुलझेले, हरिदास जांभूळकर इत्यादि दलित कार्यकर्ते होते. माझ्या पाठीवरून हात फिरवित राजाभाऊ म्हणाले, 'हा मानवीमूल्यांचा विजय आहे.'

राजाभाऊंच्या मार्गदर्शनात आम्ही खाण कामगारांची संघटना बांधली. विदर्भ खाण कामगार संघाचे ते अध्यक्ष होते. सन ७०-७१चा तो काळ होता. चंद्रपूर जिल्ह्यातील खाणींमध्ये मी संघटन बांधणीच्या कार्यास सुरूवात केली. या कालखंडात कोळशाच्या खाणींचे राष्ट्रीयीकरण झाले नव्हते. खाणी खाजगी मालकांच्या ताब्यात होत्या. चंद्रपूरपासून पश्चिमेस सुमारे वीस कि.मी. अंतरावर घुग्घुस येथे कोळशाची खाण आहे. तेव्हा श्री. सिंग नामक तरूण याठिकाणी मॅनेजर होते. कामगारांच्या समस्यांचे एक निवेदन घेऊन आम्ही त्यांच्या कार्यालयावर गेलो. सोदारी मल्लेश, मारोतराव साठे, गंगाराम उमरे, निळकंठ चिवंडे, सुखदेव पाझारे इत्यादि कामगार कार्यकर्ते माझ्यासोबत होते. मॅनेजर सिंग यांच्याशी चर्चा सुरू झाल्यावर पाहता पाहता चर्चेने उग्र रूप धारण केले. खाण कामगारांना आवश्यक सोयी उपलब्ध नाहीत या मुद्द्यावर वाद सुरू झाला. सिंग हे शीख तरूण होते. या उग्र चर्चेचे रूपान्तर शेवटी त्या मॅनेजराच्या रिव्हॉल्वर काढण्यात झाले. कार्यकर्त्यांनी ताठ मानेने आपल्या मागण्या लावून धरल्या. नंतर आम्ही कार्यालयातून बाहेर पडलो. कार्यालयाच्या चोहोबाजूने कामगारांचा जमाव जमला होता. खाणीच्या परिसरातील वातावरण संतप्त झाले होते. मॅनेजरने कामगारांवर रिव्हॉल्वर काढल्याची वार्ता पसरली. आम्ही निषेध सभा घेण्याचा निर्णय घेतला. राजाभाऊ तेव्हा चंद्रपूरलाच होते. मी चंद्रपूरला ताबडतोब रवाना झालो. तेव्हा कच्चे रस्ते होते. फक्त एक खाजगी बस चालायची. ट्रेनची वेळ गैरसोयीची होती. मी रात्री

चंद्रपूरला पोहोचलो व सकाळीच राजाभाऊंची भेट घेऊन घडलेला प्रकार सांगितला. राजाभाऊंनी घुघ्घुसच्या निषेधसभेत हजर राहण्याचे मान्य केले. खाणीच्या प्रशासनाने राजाभाऊंशी चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनी त्यास नकार दिला व सरळ निषेधसभेत उपस्थित झाले. खाण कामगारांची पिळवणूक व मॅनेजरच्या दहशतवादी धोरणावर त्यांनी कडाडून हल्ला चढविला व कामगारांवरील जुलूम न थांबल्यास उग्र आंदोलन उभारावे लागेल, असा इशारा दिला. नंतर प्रशासनाने नमते घेतले व आमची संघटनेची कामे सुरळित सुरू झाली. येथील विधानपरिषदेचे आमदार दिवंगत वासुदेवराव भृगुवार यांची रेल्वे स्टेशनवर राजाभाऊंशी भेट झाली. मी त्यांना सोडायला रेल्वे स्टेशनवर आलो होतो. घुघ्घुसच्या संतप्त घटनेबद्दल भृगुवारांनी विचारणा केली. त्यावर राजाभाऊ म्हणाले, "कामकरी-कष्टकऱ्यांसाठी अजून खूप लढाई लढायची आहे."

## भ्रष्टाचाराची किड : राजाभाऊंचा इशारा

भ्रष्टाचारावर राजाभाऊंनी खूप घणाघाती घाव घातले. एवढ्या अवाढव्य राष्ट्रात थोडाबहूत भ्रष्टाचार चालणार असे एक वक्तव्य भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केले होते. आज अर्धशतकानंतर या विषवल्लीने अक्राळविक्राळ स्वरूप धारण केले आहे. सन १९५९ला राजाभाऊंनी राज्यसभेत मुंदडा प्रकरण उचलून लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनच्या व्यवहारांची लक्तरे टांगली होती. त्यांनी उचललेले मुंदडा प्रकरण त्यावेळेस संपूर्ण देशभर गाजले. वृत्तपत्रांनी या प्रकरणाला व्यापक प्रसिद्धी दिली होती. मुंदडा प्रकरण राज्यसभेत मांडतांना राजाभाऊ म्हणाले, "आजकाल आपण सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे वाढवीत आहोत व त्याकरिता आपणाला अनेक अधिकारी नियुक्त करावे लागतील. म्हणून जनतेच्या हितार्थ आपणाला नेक आणि प्रामाणिक अधिकाऱ्यांची नितांत आवश्यकता आहे. हे अधिकारी प्रत्यक्ष मोठमोठ्या अधिकाऱ्यांच्या व उद्योगपतींच्या संपर्कात येतील. म्हणून अशा अधिकाऱ्यांच्या मदतीची फार आवश्यकता आहे. केंद्रिय लोकसेवा आयोगाने स्वतंत्र व नि:पक्षपणे मुंदडा प्रकरणाची तपासणी करून संबंधित अधिकाऱ्यांना शासन करावयास पाहिजे होते. पण या आयोगाने तसे मुळीच केलेले दिसत नाही. फक्त या आयोगाचे एक सदस्य श्री. पिल्ले यांनीच मात्र कुणाचीही भिडमूर्वत न बाळगता नि:पक्ष अहवाल लिहून जनतेची सेवा केलेली आहे. त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानणे मी माझे कर्तव्य समजतो."

बॅ. अ. र. अंतुले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांची एक परिषद मुंबईच्या ओबेरॉय शेरेटन या आलिशान हॉटेलमध्ये

आयोजित केली होती. पत्रकार म्हणून मलाही या परिषदेत उपस्थित राहण्याचा योग आला. तेव्हा मी साप्ताहिक 'प्रजासत्ताक'चा कार्यकारी संपादक होतो. योगायोगाने तेव्हा राजाभाऊ मुंबईतच होते. रेल्वेच्या सांसदिय समितीचे सदस्य म्हणून त्यांचा मुंबईचा दौरा होता. रेल्वेच्या विश्रामगृहात ते मुक्कामाला असल्याचे कळल्यावर मी त्यांना भेटावयास गेलो. सम्मेलन तेव्हा संपले होते. व मी परतीच्या प्रवासाला लागलो होतो. चंद्रपूरला केव्हा परतणार असे राजाभाऊंनी मला विचारले. आजच संध्याकाळच्या गाडीने निघायचे आहे असे मी म्हणालो. त्याच क्षणी त्यांनी रेल्वेच्या संबंधित अधिकाऱ्यास विश्रामगृहात बोलावून एका बर्थची व्यवस्था करा असे निर्देश दिले. अंतुले सरकारने महाराष्ट्रातील सर्व पत्रकारांना रेल्वेचे पहिल्या वर्गाचे जाण्यायोगाचे भाडे दिले होते. राजाभाऊंसोबत दुसऱ्या डब्यात मी चंद्रपूरकरिता निघालो. वाटेत इगतपुरी रेल्वेस्टेशनवर राजाभाऊ उतरले व मी ज्या बोगीत होतो, तेथे येऊन मला शोधू लागले. मला वरचा बर्थ मिळाला होता. मी पटकन् खाली उतरलो. व भांबावलेल्या स्थितीत राजाभाऊंसमोर उभा राहिलो. माझ्या जेवणाबाबत त्यांनी विचारपूस केली व रेल अटेडन्टला जेवणाची ऑर्डर दिली. इगतपूरीहून गाडी पुढे सरकली. अटेन्डंट जेवण घेवून आला. जेवण घेतले. पण मनात खूप विचार यायला लागला. एका महान नेत्याचे सानिध्य मला लाभले हा तो विचार होता.

श्री. नरेन्द्र तिडके महाराष्ट्राचे कामगार मंत्री असतानाची ही घटना आहे. राजाभाऊंना श्री तिडके यांच्याकडून एका कार्यकर्त्यांचे काम करवून घ्यावयाचे होते. श्री. तिडके यांचा दौऱ्याचा कार्यक्रम आल्याचे मी त्यांना सांगितले. त्यांनी मंत्र्यांची वेळ घेण्याचे मला निर्देश दिले. श्री. तिडके यांना राजाभाऊ भेटण्यासाठी येत असल्याचे सांगितल्याबरोबर त्यांनी व्यस्त कार्यक्रम बाजूला सारून भेटीची वेळ दिली. तेव्हा रिपब्लिकन - कॉंग्रेस युतीचे सरकार महाराष्ट्रात होते. राजाभाऊ श्री. तिडके यांना भेटण्यासाठी सर्किटहाऊस ला निघाले. मी व तो कार्यकर्ता सोबत होतो. राजाभाऊ विश्रामगृहात पोहचताच श्री. तिडकेंनी त्यांना पायऱ्यांजवळ जाऊन सन्मानाने आत घेतले व राजकीय गप्पांना सुरुवात झाली. गप्पांचे रुपांतर गंभीर चर्चेत झाले व राजाभाऊंनी सरळ सरळ आरोप करताना म्हटले की आपले 'युतीचे सरकार असूनही काही उपयोग नाही. तळागाळातल्या लोकांची कामे होत नाहीत. आपल्या सोबत राहण्याचा आम्हास विचार करावा लागेल.'' श्री. तिडके राजकारणातले सौजन्यमूर्ती होते. राजाभाऊंचे ते फक्त ऐकत राहिले. त्यावेळची ती राजाभाऊंची आग्रही भूमिका आजही माझ्या स्मरणात आहे.

सन ७१-७२ ला चंद्रपुरात आम्हा रावण दहन बंद चे आंदोलन उभे केले. तेव्हा सातारकर नामक जिल्हाधिकारी होते. या आंदोलनामुळे शहरात खूप तणाव

निर्माण झाला. जिल्हाधिकाऱ्यांनी परिस्थिती पाहून शहरातील कार्यकर्त्यांची एक बैठक बोलविली. राजाभाऊ चंद्रपुरातच असल्याची माहिती मिळाल्यावर त्यांनाही निमंत्रित करण्यात आले. या बैठकीत खूप खडाजंगी उडाली. जिल्हाधिकाऱ्यांनी राजाभाऊंना बैठकीत मार्गदर्शन करण्याची विनंती केली. राजाभाऊ उभे झाले व गरजले, ''या देशाचा खरा इतिहास बुद्धी पुरस्सरपणे दाबण्याचा प्रयत्न होत आहे. शांतता एकतर्फी होऊच शकत नाही. आम्ही बुद्धांचे उपासक शांतताप्रिय आहोत. ज्यांना शांतता हवी त्यांनी कट-कारस्थानाचा खोटा इतिहास झिडकारला पाहिजे.' राजाभाऊंचे हे खणखणीत शब्द ऐकून जिल्हाधिकाऱ्यांसहित सारे सभागृह सुन्न झाले.

## राजाभाऊ व कार्यकर्ते

राजाभाऊंनी अनेक कार्यकर्त्यांना लहानाचे मोठे केले. त्यातले एक उपासराव घागरगुंडे होते. घुघ्युसच्या एका कामगारांच्या सभेत मार्गदर्शन करून परतत असताना राजाभाऊंना जनसंघाचे काही नेते भेटले व म्हणाले, राजाभाऊ तुम्ही एक चांगला कार्यकर्ता आम्हाला दिला. राजाभाऊ उसळून म्हणाले, 'आम्ही तो कार्यकर्ता तयार करून तुमच्याकडे पाठविला आहे. जरा नीट सांभाळा.' राजाभाऊंचे हे शब्द ऐकून मी हतबुद्ध झालो. नंतर त्या कार्यकर्त्याचे अकाली निधन झाले. जनसंघाचे लोक त्याच्या मृत्युप्रसंगी नव्हते. दुसरीकडे त्याच्या प्रेतयात्रेत समाजबांधव जावयास तयार नव्हते. हा नाजूक प्रसंग राजाभाऊंनी हेरला. व मला बोलावून घागरगुंडेच्या अन्त्ययात्रेत कार्यकर्त्यासोबत सहभागी होण्याचे निर्देश दिले. राजाभाऊंच्या स्वभावातले असे सुडबुद्धीचा लवलेश नसलेले, द्वेष अथा मत्सर नसलेले अनेक प्रसंग सांगता येतील. असाच एक कार्यकर्ता लक्ष्मणराव खोब्रागडे राजाभाऊंच्या तालमीत मोठा झाला. तेव्हाच्या रिपब्लिकन-काँग्रेस युतीच्या काळात त्यांनी सरळ सरळ काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांना तातडीने नागपूरला जायचे होते. राजाभाऊंची कार जात असल्याचे कळल्यावर त्यांनी फोन केला. राजाभाऊंनी त्यांना घ्यायला आपली गाडी त्याच्या दारावर उभी केली. मनाची अशी सहृदयता राजकारणात क्वचित पहावयास मिळते.

राजाभाऊंनी राजकारणात उदात्त प्रमेये जोपासली. बाबासाहेबांच्या सामाजिक व धम्मचळवळीचे नागपूर जसे मुख्य केंद्र होते. तसेच राजाभाऊंच्याही राजकारणाचे हे प्रमुख केंद्रस्थान होते. नागपूरच्या राजकारणात राजाभाऊंचा खूप दबदबा होता. अनेकदा येथील महानगरपालिकेचे महापौरपद, उप महापौरपद रिपब्लिकन पक्षाने भुषविले. रिपब्लिकन पक्षाच्या चळवळीत आजही एक सुदर्शन (भंगी) समाजाचे

नेते कार्यरत आहेत. श्री. रामरतन जानोकर हे त्यांचे नाव आहे. सन १९७५ च्या कालखंडात ते नागपूर महानगरपालिकेत रिपब्लिकन पक्षाचे नगरसेवक होते. नागपूरच्या महापौरपदावर सुदर्शन समाजाचा नेता बसला पाहिजे हे राजाभाऊंचे स्वप्न होते. त्यांच्या या निर्णयाचे पक्ष कार्यकर्त्यांनी मनापासून स्वागत केले. व श्री. रामरतन जानोकर महाराष्ट्राच्या या उपराजधानीचे महापौर झाले. राजाभाऊंनी नागपूर नगरीत नवा इतिहास घडविला. राजाभाऊंच्या एका स्वप्नाची पूर्ति झाली. त्यांच्या निवडणूक प्रचाराची पद्धतीही अजब होती. नागपूरच्या पिवळीनदी-टेका विभागात मला त्यांनी निवडणूक प्रचारासाठी पाठविले होते. त्याठिकाणी एक तरुण कार्यकर्ता उभा होता. प्रचार करताकरता आम्ही खूप थकलो व मध्यरात्रीनंतर केव्हा डोळे लागले हे कळले नाही. कार्यकर्त्यांनी अचानक आम्हाला जागविले. डोळे पूसतपूसत मी पाहू लागलो. समोर राजाभाऊ उभे होते. घड्याळाकडे पाहिले. वेळ पहाटे साडेतीनची होती. राजाभाऊंनी प्रेमळ आवाजात 'खूप थकवा तर आला नाही ना' असे विचारले. वार्डाची स्थिती जाणून घेतली. डिसेंबर महिन्याची खूप थंडी होती. राजाभाऊ क्षणात दुसऱ्या वार्डात निघून गेले. जातांना त्यांनी आम्हाला आराम करण्याचा सल्ला दिला. राजाभाऊंचा हा अदम्य व अथक उत्साह पाहून आम्ही थक्क झालो.

राजाभाऊ फार कमी झोपायचे. सकाळी चार वाजेपासून त्यांची दिनचर्चा सुरू व्हायची. सकाळच्या गाडीने दौऱ्यावर निघायचे असल्यास मला अगदी सकाळीच बोलावून घ्यायचे. सकाळी चार-साडेचारला मी गेलो तर राजाभाऊ पूर्ण तयार होऊन राहायचे. त्यांच्या या जागण्याबद्दल मला नेहमीच एक प्रश्न पडत राहिला. राजाभाऊ त्यांच्या दिवाणखाण्यात रात्री दोन वाजेपर्यंत कार्यकर्त्यांशी चर्चा, बैठकी झाल्यानंतर झोपले केव्हा व सकाळी तयारी करून माझी वाट पाहणारे राजाभाऊ जागले केव्हा? हा तो अनाकलनीय प्रश्न होता. प्रवासात त्यांच्यासोबत एक सुटकेस व एक टाईप रायटर असायचा. गाडीत असो की, पक्ष कार्यकारिणीच्या बैठकीत असो, राजाभाऊ स्वत: पत्रे टाईप करायचे. महाराष्ट्रातील सिरोंचा विधानसभा पोटनिवडणुकीत पक्षाने माझी उमेदवारी समोर केली होती. राजाभाऊंनी माझ्याबद्दल माहितीची कागदपत्रे स्वत: टाईप करून पक्षश्रेष्ठींकडे पाठविण्याकरिता माझ्याकडे दिली होती.

१९७१ साली मध्यप्रदेशातील भिलाई येथे रिपब्लिकन पक्षाचे अधिवेशन होते. राजाभाऊंना भेटण्यासाठी आम्ही कार्यकर्ते विश्रामगृहावर गेलो. आम्हा सर्व कार्यकर्त्यांची राजाभाऊंनी आवभगत केली. पण हे सर्व करित असताना राजाभाऊ कुठेतरी हरवल्यासारखे जाणवत होते. आम्ही कार्यकर्ते एकमेकाकडे पाहू लागलो. कुठे आमचे चुकले तर नाही ना म्हणून आमची संभ्रमावस्था झाली. अधिवेशनाच्या

ठिकाणी जावून आले की नाही अशी विचारणा करून आमची राजाभाऊंनी त्याठिकाणी पोहचविण्याची व्यवस्था केली. गाडीत बसून आम्ही अधिवेशनस्थळी जात असताना राजाभाऊ एवढे अंतर्मुख! का असा प्रश्न आम्हास सतत भेडसावीत राहिला. प्रदीर्घ काळापर्यंत आम्ही राजाभाऊंच्या सहवासात असल्यामुळे त्यांचा स्वभाव थोडा बहुत आम्ही जाणून होतो. आम्ही अधिवेशनाच्या ठिकाणी पोहचतो न पोहचतो तोच राजाभाऊ अधिवेशनस्थळी आले. राजाभाऊ अधिवेशनाच्या मंडपात पोहचल्याचे कळल्याबरोबर कार्यकर्ते मोठ्या संख्येने जमू लागले. राजाभाऊ या सर्व कार्यकर्त्यांची आत्मीयतेने विचारपूस करू लागले. जेवणापासून तर विश्रांती घेतली की नाही इथपर्यंत राजाभाऊ कार्यकर्त्यांना विचारू लागले. आम्ही आश्चर्यचकित झालो. शासकीय विश्रामगृहातील राजाभाऊ व कार्यकर्त्यांमध्ये असलेले राजाभाऊ ही तफावत आमच्या लक्षात आली. यावेळेस प्रफुल्लित होऊन ते कार्यकर्त्यांशी हितगूज करू लागले. विश्रामगृहातील शासकीय बंदोबस्तात घेरले गेलेले राजाभाऊ व कार्यकर्त्यांच्या गराड्यात देहभान हरवलेले राजाभाऊ अशी ती तफावत होती. मला आठवते, राजाभाऊ नंतर अधिवेशन संपेपर्यंत विश्रामगृहात परत गेले नाहीत. दोन दिवसांच्या या अधिवेशनात ते कार्यकर्त्यांसोबतच राहिले. राजाभाऊंनी राजकारण, समाजकारण व त्याचबरोबर धर्मकारणही केले. सन १९५६ ला बौद्ध धम्माची दीक्षा ग्रहण केल्यानंतर राजाभाऊंनी बौद्ध धम्माच्या प्रचार व प्रसारासाठी देशभर दौरे केले. बिहारची राजधानी पटना येथे सन १९७१ ला राजाभाऊंच्या उपस्थितीत सुमारे सात हजार दलितांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला. या प्रसंगी आयोजित एका पत्रपरिषदेत राजाभाऊ म्हणाले, 'माणुसकी प्राप्त करण्यासाठी व समाजात सन्मानाने जगण्यासाठी हजारो लोकांनी आज हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्म अंगिकारला आहे. ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगताना ते म्हणाले, 'पाटणा एकेकाळी बौद्ध संस्कृतीचे केंद्र होते. पाटणा या शहरास फक्त बौद्धांच्या काळात पाटलीपुत्र असे संबोधले जात होते. सम्राट अशोक यांच्या मगध राज्याची ही राजधानी होती. दोन हजार वर्षांनंतर होत असलेला बौद्ध धम्म दीक्षेचा भव्य सोहळा प्राचीन बौद्ध संस्कृतीची प्रकर्षाने आठवण करून देत असल्याचे त्यांनी पत्रपरिषदेत अभिमानाने सांगितले. महाराष्ट्राप्रमाणे बिहार व इतर प्रांतामध्ये सुद्धा धम्मांतरित बौद्धांना संविधानाने बहाल केलेल्या सवलती देण्यात याव्यात असे उपसभापती राजाभाऊ म्हणाले.

उत्तर प्रदेशातील अलाहाबाद जिल्ह्यामधल्या ददिया या गावात राजाभाऊंच्या शुभहस्ते असंख्य दलितांनी बौद्ध धम्मात प्रवेश केला. या देशातील पददलितांचे दुःख, वेदना समाप्त करावयाच्या असतील तर त्यासाठी बौद्ध धम्म हाच एकमेव

पर्याय असल्याचे राजाभाऊंनी या धम्मदीक्षेच्या सोहळ्यात सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची आठवण करून देताना ते म्हणाले, 'सन १९५६ ला धम्मचक्रप्रवर्तन झाल्यानंतर गेल्या १५ वर्षात देशातील बौद्धाची संख्या खूप वाढलेली आहे. विषमता, अन्याय, अत्याचारांना बौद्ध धम्मात कोणतेच स्थान नाही.'

सन १९७१ ला केंद्रिय सरकारने बौद्ध विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती जाहीर केल्या. राजाभाऊंच्या अथक परिश्रमांचे, सातत्याने ही मागणी लावून धरण्याचे हे फळ होय. तेव्हाच्या केंद्रिय समाजकल्याण खात्याच्या सचिवांनी एक परिपत्रक काढून सर्व राज्यांना कळविले की, 'स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या कालखंडात अनुसूचित जातीच्या लोकांनी मोठ्या संख्येने बौद्ध धम्म स्विकारलेला असून त्यांची आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या अद्याप पिळवणूक होत असल्याची वस्तुस्थिती भारत सरकारच्या नजरेत आणून देण्यात आलेली आहे. बौद्धांना घटनेनुसार सवलती बहाल करण्यात याव्यात अशी मागणी काही राजकीय पक्षाकडून करण्यात आलेली आहे. सरकारने याबाबत गांभीर्यपूर्वक विचार करून बौद्ध धर्मात प्रवेश केलेल्यांची अद्यापही पिळवणूक होत आहे असे मान्य केले. देशातील सर्व राज्यसरकारांनी १९७१-७२ या चालू सत्रापासून परिपत्रकाची त्वरित अंमलबजावणी करावी अशी सूचना करण्यात येत असून बौद्ध विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी किती रक्कम खर्च होईल हे राज्य सरकारांनी केंद्र सरकारला ताबडतोब कळवावे. या योजनेनुसार सर्व खर्च केंद्र सरकार करेल. व आगामी भारत सरकारच्या अर्थसंकल्पात या रकमेची तरतूद करण्यात येईल. राज्य सरकारे व केंद्रशासित प्रदेशांनी बौद्ध धर्माचा स्विकार केलेल्यांची एक वेगळी यादी व आराखडा तयार करावा.' घटनेच्या नियमानुसार ज्यांना शैक्षणिक सवलती आहेत, ते सर्व नियम बौद्ध विद्यार्थी-विद्यार्थिनींना लागू होती असे परिपत्रकात नमूद करण्यात आले.

## संसदभवनावर मोर्चे

केंद्रिय सरकारचा हा निर्णय म्हणजे राजाभाऊंचा फार मोठा विजय होता. राजाभाऊ तेव्हा राज्यसभेचे उपसभापती होते. बौद्ध विद्यार्थ्यांना सवलती प्रदान करण्याचा निर्णय राजाभाऊंच्या अथक परिश्रमामुळे झाला हे निसंशय. सन १९५६ नंतर राजाभाऊंनी बौद्धांना शैक्षणिक व नोकरीविषयक सर्व सवलती मिळाव्यात यासाठी सातत्याने आंदोलने उभारली, सत्याग्रह केले, तुरुंगवास भोगला, रिपब्लिकन पक्षाच्या प्रत्येक निवडणूक जाहीरनाम्यात हा विषय टाकला. राज्यसभेतील भाषणांमधून राजाभाऊंनी सातत्याने ही मागणी केंद्रीय सरकारसमोर ठेवली. संसदेवर संपूर्ण देशभरातून रिपब्लिकन अनुयायांना बोलावून मोर्चे काढले.

बौद्धांना सवलती मिळविण्याकरिता एकही व्यासपीठ त्यांनी सोडले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उराशी बाळगलेल्या या स्वप्नाची परिपूर्ती करण्यासाठी राजाभाऊंची ही धावपळ होती. पार्लमेंटवर राजाभाऊंच्या नेतृत्वाखाली निघालेल्या अनेक मोर्च्यांमध्ये मी सहभागी झालो होतो, राजाभाऊंच्या नावावर प्रत्येक प्रांतातून मोठ्या संख्येने पक्षाचे अनुयायी या मोर्चांमध्ये सहभागी होत असत. राजाभाऊंबद्दलचे दलित, पिडित व दीनदुबळ्यांमध्ये आकर्षण होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर हा समाज राजाभाऊंकडे आशाळभूत नजरेने पाहात होता. म्हणून संसदभवनावर राजाभाऊंच्या नेतृत्वात मोर्चा असला की, लोकांचा समुदाय मोठ्या संख्येने या मोर्च्यांमध्ये भाग घेत असे. यात महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, पंजाब व दिल्लीचे मोर्चेकरी मोठ्या संख्येने सहभागी होत असत. त्याभागातील कार्यकर्त्यासोबत राहणे, जेवण घेणे, निवास करण्याची संधी आम्हाला प्राप्त होत असे. त्यांच्याबरोबर संवाद सुरू झाला की, राजाभाऊंबद्दल या कार्यकर्त्यांच्या मनात असलेला आदर, प्रेम बोलतांना ओसंडून वाहात असे. दिल्लीतील अनेक कार्यकर्त्यांच्या घरी, विशेषत: करोलबाग या दलितबहुल वस्तीमध्ये मला जाण्याचा योग आला. अनेकांच्या घरात बाबासाहेबांच्या फोटोसोबत राजाभाऊंचा फोटो आम्हास पहावयास मिळाला. दिल्लीत दलित चळवळीतील रामसिंग नामक एक वयोवृद्ध नेते आजही हयात आहेत. हे राजाभाऊंचे दिल्लीमधील खंदे कार्यकर्ते होते. आमची ते खूप आवभगत करायचे. सन २००० ला मी एका मोर्च्यात सहभागी होण्यासाठी दिल्लीस गेलो होतो. अपेक्षेप्रमाणे या मोर्च्यात रामसिंगची भेट झाली. आता ते वयोमानानुसार खंगून, खचून गेले आहेत. राजाभाऊंच्या तालमीत तयार झालेला हा कार्यकर्ता आजही दलितांसाठी सर्वदृष्टींनी खाक होवूनही लढत आहे. तो राजाभाऊंच्या आठवणी माझ्या खांद्यावर हात ठेवून सांगू लागला. व आम्हा दोघांच्याही डोळ्यात अश्रु उभे राहिले. श्रीमती गांधी भारताच्या पंतप्रधान असताना संसदभवनावर राजाभाऊंनी मोर्चा नेला. त्यात आम्ही सहभागी झालो होतो. बौद्धांच्या सवलतींची प्रमुख मागणी या मोर्च्यात होती. श्रीमती गांधींच्या काळातच धर्मांतरित बौद्ध विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती घोषित करण्यात आल्या. राजाभाऊंनी बौद्धांच्या मागण्यांची एक लढाई जिंकली. बौद्धांच्या नोकरीविषयक सवलतींचा प्रश्न अद्याप शिल्लक होता. त्याहीसाठी राजाभाऊंनी आंदोलन उभारले.

## बौद्धांच्या सवलती

तेव्हा बौद्धांच्या सवलतींच्या संदर्भात राजाभाऊंनी पुन: एकदा मागण्यांचा खलिता पंतप्रधान देसाईंच्या हातात सोपविला. देसाईंनी उच्चारलेल्या एका शब्दावर राजाभाऊंची देसाईंशी खूप खडाजंगी झाली. मागण्यांच्या खलित्यामधील

अग्रक्रमाच्या बौद्धांच्या सवलतींबाबत मोरारजी देसाई म्हणाले, 'सवलती हव्या होत्या तर बौद्ध धर्म कशाला घेतला?' पंतप्रधान देसाईंची ही नकारात्मक भूमिका ऐकून राजाभाऊ थोडे चिडल्यासारखे झाले. 'पंतप्रधान महोदय, एखाद्या मागासवर्गियाने धर्म बदलल्यास त्याची आर्थिक स्थिती एकदम उन्नत होईल काय?' पंतप्रधानांनी ही भूमिका ऐकून चर्चेस तेथेच विराम दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लक्षावधी दलितांना बौद्ध धर्माची दिक्षा दिली तेव्हा ते म्हणाले की, 'मागासवर्गियांच्या सवलती माझ्या खिशात आहेत.' राजाभाऊंनी पंतप्रधान देसाईंकडे मांडलेल्या मुद्द्याचा रोख बाबासाहेबांच्या त्या उद्‌गारांच्या दिशेने होता. असे विनाकारणचे वाद उभे करणारे मुद्दे मुरारजी देसाईंनी वेळोवेळी देशासमोर ठेवले. देसाईंनी बौद्धांच्या सवलतीबाबत नकारात्मक भूमिका घेणे नवलाईचे नव्हते. त्यांच्या स्वभावास ते धरून होते. राजाभाऊ आम्हा मोर्चेकऱ्यांसमोर आले. पंतप्रधानांची भूमिका आम्हा मोर्चेकऱ्यांना कळल्यावर संतापाची लाट उसळली. हंसराज गजभिये, ॲड. रामानंद धेपे, रामसिंग सारखे अनेक प्रादेशिक नेते मोर्च्यात होते. राजाभाऊ व या नेत्यांनी मोर्चेकऱ्यांना शांत केले. दिल्लीच्या करोलबाग येथे पक्षाच्या दिल्ली शाखेतर्फे जाहीर सभा ठेवण्यात आली. राजाभाऊंनी मित्र पक्ष असूनही देसाईंवर कडाडून हल्ला केला. 'धर्मांतरित बौद्धांना सवलती मिळवून दिल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही' असे ते म्हणाले.

सन १९७२च्या जानेवारी महिन्यात कोल्हापूरच्या एका जाहीर सभेत बोलताना राजाभाऊ म्हणाले, 'स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोन तपे लोटूनही देशात सामाजिक विषमता उत्तरोत्तर वाढत आहे. त्यासाठी समस्त दलितांनी बौद्ध धम्माची कास धरल्याशिवाय अन्य पर्याय नाही.

श्रीमती गांधींनी पंतप्रधान असताना राजाभाऊंना पत्र पाठवून कळविले की, जे पूर्वी अनुसूचित जातीचे होते व ज्यांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला, त्यांना मॅट्रीकनंतर शिष्यवृत्त्या देण्याचा निर्णय केंद्रिय सरकारने घेतलेला आहे. बौद्धांना शैक्षणिक सवलती सुरू करण्याबाबत आपण दि. १६ ऑगस्ट १९६९ला मला पत्र पाठवून मागणी केली होती. त्यानुसार ज्या आधारावर बौद्धांना आर्थिक मदत देता येईल अशी आकडेवारी सर्वच प्रांतीय सरकारकडून आम्ही ताबडतोब मागितलेली आहे. पत्राच्या शेवटी श्रीमती इंदिरा गांधींनी म्हटले की, हे सर्व एका महिन्याच्या आत व्हावयास पाहीजे. असे मी केंद्रिय समाज कल्याण खात्याला कळविले आहे. जेणेकरून निर्णयाची अंमलबजावणी त्वरित करता येईल. (मूळ पत्र इंग्रजीत.)

राजाभाऊंनी या प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हटले की, 'शैक्षणिक सवलतींबरोबर

बौद्धांना सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागाही प्राप्त होणे आवश्यक आहे. नोकऱ्यांची हमी दिली गेली नाही तर या शैक्षणिक सवलतींचा काय उपयोग? सरकारने सध्याच्या परिस्थितीत बौद्धांना नोकरीविषयक सवलती त्वरित जाहीर केल्या पाहिजेत.'

मुंबईत सन १९५८ ला बौद्ध महासभेचे अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाच्या उद्‌घाटन प्रसंगी राजाभाऊ म्हणाले, 'बौद्ध धर्मात तत्त्वांपेक्षा आचरणाला जास्त महत्त्व आहे. या धर्मात व्यक्ती आणि समाज या दोहोंच्या उत्कर्षाचे मार्ग सुचविले आहेत. व्यक्तीच्या आचरणाला या धर्मात महत्त्व असून समता, स्वतंत्रता व बंधुता हा या धर्माचा पाया आहे. आज संपूर्ण जगात मानवता प्रस्थापित करण्याकरिता व मानवा-मानवामध्ये योग्य नाते प्रस्थापित करून घेण्याकरिता धर्माची अत्यंत गरज आहे. व हा धर्म बौद्ध धर्मच होय. बौद्ध धर्म शास्त्रीय कसोटीवर खरा धर्म म्हणून सिद्ध झालेला आहे. भूतानला पंडित नेहरुंनी भेट दिली असताना बौद्ध धर्माचा गौरव करून ते म्हणाले, 'बौद्ध धर्माइतका शास्त्रीय कसोटीवर उतरणारा दुसरा धर्म नाही.' बाबासाहेबांनी ह्याच ठिकाणी आपणास बौद्ध धर्माची दीक्षा दिली. प्रत्येक व्यक्तीला आपल्या विकासासाठी संधी हवी असते. व्यक्तीचा विकास हाच बौद्ध धर्माचा गाभा आहे. ज्या लोकांना भारतात समता, स्वातंत्र्य व बंधुभाव नांदावा असे वाटते त्यांना बौद्ध धर्माचा स्विकार करावाच लागेल.'' राजाभाऊंनी आयुष्यभर आंबेडकरीबाणा जोपासला. कुणासमोर ते झुकले नाहीत. अथवा तत्त्वांची तडजोड केली नाही. ज्या रिपब्लिकन पक्षाची धुरा राजाभाऊंनी कणखरपणे सांभाळली, त्या पक्षाने खूप वाटा व वळणे पाहिली. परंतू या पक्षाच्या झेंड्याखाली राजाभाऊंनी खऱ्या आंबेडकरी बाण्याचे राजकारण केले. पडद्याआड कधी गुप्त समझोते केले नाहीत. आपली प्रतिष्ठा उंचावण्यासाठी कुणाशी तकलादू करारमदार केले नाहीत. त्यांचे राजकारण खुले होते. पददलितांच्या उत्थानाचा एकमेव ध्यास घेतलेल्या राजाभाऊंनी समतेचा लढा राजकीय, समाजिक व धार्मिक मंचावरून पूर्ण शक्तिनिशी पुढे रेटला. राजाभाऊंनी आयुष्याच्या अंतापर्यंत हा स्वतंत्र बाणा कायम ठेवला. रिपब्लिकन पक्षाचे राजकारण सामाजिक आशयाचे असल्याचे त्यांचे ठाम मत होते. म्हणून सत्ताधाऱ्यांशी त्यांनी कधीच समझोता केला नाही. चंद्रपूरच्या एका सत्कारसभेत, ''मी विरोधी पक्षाचा म्हणूनच सत्ताग्रहण केले.'' असे ते खणखणीत शब्दात बोलले. दलितांचे उत्थान हे सतीचे वाण असल्याची राजाभाऊंची ठाम समजूत होती. ज्यांना हे कार्य करावयाचे असेल त्यांनी घरावर तुळशीपत्र ठेवावे असे ते आपल्या अनुयायांना सांगायचे. त्यांच्या अनेक सहकारी नेत्यांनी स्वत:च्या तुंबड्या भरण्याचे राजकारण केले. राजाभाऊ मात्र यापासून

मैलोगीणती दूर होते. आपली सारी दौलत त्यांनी समतेच्या लढ्यासाठी फुकून टाकली.

राजाभाऊंचा ज्या सहकाऱ्यांनी दुसरा घरठाव केला त्या सहकाऱ्यांच्या बद्दल त्यांच्या मनात कधीच कटुता निर्माण झाली नाही. त्यात बी. पी. मौर्य हे एक होते. आजही ते हयात आहेत. एकेकाळचा उत्तरप्रदेशामधल्या राजकारणातील बलवान नेता, रिपब्लिकन पक्षाचा तो ब्रेन समजला जायचा. ते श्रीमती गांधींच्या मंत्रीमंडळात वाणिज्य मंत्री, नरसिंहराव सरकारचे सल्लागार होते. सन ७०-७१ ला रिपब्लिकन पक्ष दुभंगला व श्री मौर्यांनी राजाभाऊंची साथ सोडली. याच कालावधीत श्री. मौर्यांची जाहीर सभा चंद्रपूरच्या गांधी चौकात आयोजित करण्यात आलेली होती. कार्यक्रमाचा सारा भार काँग्रेसने उचलला होता. तेव्हाच्या सत्ताधारी काँग्रेसची या गटाशी युती होती. पक्षाच्या विभाजनाच्या पार्श्वभूमीवर या सभेचे आयोजन करण्यात आलेले होते. आंबेडकरी कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण पसरलेले होते. राजाभाऊ सभेच्या दिवशी शहरात नव्हते. परंतु राजकीय हालचालींबद्दल त्यांनी मला फोनवर माहिती विचारून घेतली होती. मी या सभेच्या एक दिवसाआधी कार्यकर्त्यांची बैठक घेतली असतांना कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. व राजाभाऊंच्या जन्मभूमीत जाणूनबूजून या सभेचे आयोजन करण्यात येत असल्याचे मत व्यक्त केले. श्री. मौर्य ज्या मार्गाने जातील, त्या मार्गाने निदर्शने करावीत व आपला निषेध नोंदवावा असा बैठकीत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार आम्ही तयारीने लागलो. श्री. मौर्य यांचे खोब्रागडे कुटुंबाशी अत्यंत आत्मीय संबंध होते. राजाभाऊंच्या आई, मौर्यांना आपल्या मुलासमान लेखायच्या. मौर्यांनी चंद्रपूरला आल्यावर राजाभाऊंच्या आईची भेट घेण्याची इच्छा व्यक्त केली. श्री. मौर्य चंद्रपूरला आले व राजाभाऊंच्या निवासस्थानी जाऊन आईंचा आशीर्वाद घेतला. नंतर ते गांधीचौकात सभेसाठी निघाले. असंख्य कार्यकर्ते काळे झेंडे घेऊन त्यांच्या गाडीमागे धावू लागले. निदर्शकांना बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ अडविण्यात आले. निदर्शकांचा जमाव वाढू लागला. मौर्यांची सभा होऊ द्यायची नाही असा जमावाने पवित्रा घेतला. निदर्शकांचा रेटा वाढू लागला. या रेट्यास आवर घालणे अशक्य असल्याचे पाहून पोलिसांनी अश्रुधूर सोडला व लाठीमार सुरू केला. यात अनेक कार्यकर्ते जखमी झाले. कार्यकर्त्यांचा जमाव या लाठीहल्ल्यास न जुमानता सभेच्या स्थळापर्यंत पोहचला. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मौर्यांची सभा रद्द करावी लागली. त्यांना पळताभूई थोडी झाली. जो रस्ता मिळेल त्या रस्त्याने मौर्यांनी पोलिसांच्या बंदोबस्तात पळ काढला. संतप्त कार्यकर्ते त्यांचा शोध घेऊ लागले. नंतर मौर्य नागपूरला गेले. नागपूरहून लखनौस पोहचले व तिसऱ्या दिवशी त्यांनी

काँग्रेसमध्ये प्रवेश केल्याचे वृत्त आम्ही वर्तमानपत्रांमधून वाचले. तसेच चंद्रपुरचा लाठीहल्ला व अश्रुधुराच्या बातम्याही झळकल्या. राजाभाऊंचा सकाळीच फोन आला. मला फोनवर बोलावून माझ्यावर ते खूप संतापले. 'मौर्य कुठेही असोत परंतु त्यांचे चंद्रपुरात आगमन झाल्याने ते आपले पाहूणे असल्याने पाहुण्यांशी असा व्यवहार करणे चुकीचे आहे.' अंत:करणाच्या दिलदारपणाचे याशिवाय अन्य उदाहरण कोणते असू शकेल? राजाभाऊंनी राजकारणात राहूनही सभ्यतेच्या मर्यादा कधी ओलांडल्या नाहीत. एक संस्कारक्षम असे त्यांचे जीवन होते.

## संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाचा आरंभ झाला. तेव्हा महाराष्ट्र विदर्भासहित द्विभाषिक राज्यात होते. गुजरात व महाराष्ट्र असे हे द्विभाषिक होते. मराठी भाषिकांचे एक राज्य व्हावे म्हणून उभारलेल्या मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात राजाभाऊ आपल्या राजकीय पक्षाला घेऊन सर्व शक्तिनिशी उतरले. त्यासाठी त्यांनी सारा महाराष्ट्र ढवळून काढला. चंद्रपूर येथील गांधी मार्गावरील राजाभाऊंचे निवासस्थान संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने गजबजून गेले. प्रख्यात समाजवादी नेते एस. एम. जोशी पासून तर 'मराठा'कार थोर साहित्यिक आचार्य अत्रे पर्यंत अनेक दिग्गजांची पायधूळ प्रचार दौऱ्याच्या निमित्ताने या निवासस्थानास लागली. सन १९६०ला द्विभाषिक तुटले तेव्हा राजाभाऊ राज्यसभेत होते. मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीच्या आंदोलनात राजाभाऊ आघाडीवर होते. भाषावार प्रांत रचनेबद्दल राजाभाऊंची मते स्पष्ट होती. मराठी भाषिक स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या संदर्भात २३ एप्रिल १९६० ला राजाभाऊ राज्यसभेत बोलताना म्हणाले, 'माझ्या मते सभागृहात या संबंधात सादर झालेले बिल तितकेसे समाधानकारक नाही. मा. गृहमंत्र्यांनी आताच खुलासा केला की, आम्ही मित्रत्वाच्या व खेळीमेळीच्या वातावरणात मुंबई राज्याची पुनर्रचना करित आहोत. मा. गृहमंत्र्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. परंतु तशा धर्तीचे खेळीमेळीचे व मित्रत्वाचे वातावरण मात्र निर्माण करणे अत्यंत आवश्यक आहे. असे निवेदन करण्यात येते की, मुंबई राज्याची भाषावार पुनर्रचना करते वेळी आमच्या राज्यसरकारने भाषिक प्रांतांची मूल तत्त्वे मान्य केलेली आहेत. पण आमच्या महाराष्ट्र राज्याचा विचार केल्यास आमच्या पदरात काय पडले आहे? मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांच्या पदरी लुळा-पांगळा महाराष्ट्र पडलेला आहे. मूळ महाराष्ट्राच्या चारही बाजूंकडून महाराष्ट्र राज्याचे लचके तोडण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र हेच एकमेव राज्य आहे ज्यावर या नवीन राज्यपुनर्रचनेत राज्याच्या सरहद्दीबद्दल अन्याय झालेला आहे.'

'ज्या महाराष्ट्राकरिता मराठी भाषिकांनी लढा दिला तो महाराष्ट्र हा खासच नव्हे. माझ्या मित्रांनी नुकतेच सांगितले की, आमच्या पदरात पंधरा आणे हिस्सा पडला असताना एक आणा हिस्स्यासाठी घासाघिस करण्यात काय अर्थ? कॉंग्रेसच्या गोटातून या माझ्या मित्राने सुचविल्याप्रमाणे हा आणेवारीचा प्रश्न नसून तत्त्वाचा प्रश्न आहे. मला हे जाणून घेण्याची इच्छा आहे की, या राज्याची पुनर्रचना कोणत्या तत्त्वावर करण्यात आली? तेथे ठराविक रक्कम गुजराथ राज्याला मिळाली किंवा ठराविक मैलांचा भूभाग गुजराथ राज्याला जोडला गेला. हा महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीने मुद्द्याचा प्रश्न नाही. राष्ट्राच्या हितोन्नतीच्या दृष्टीने एखाद्या रास्त गोष्टीबद्दल महाराष्ट्रीय जनतेला खेद वाटणे स्वाभाविक आहे. राष्ट्राच्या हितोन्नतीकरिता महाराष्ट्र वाटेल तो त्याग करावयास तयार आहे. पण जर मूळ महाराष्ट्र राज्यापासून मोठा भूभाग वगळून टाकला तर त्याचा आम्ही काय अर्थ समजायचा? त्यापासून आम्ही कोणता निष्कर्ष काढायचा? यामधून एकच निष्कर्ष निघू शकतो. की याबाबत महाराष्ट्रावर फार मोठा अन्याय करण्यात आलेला आहे. असे कां? डांग च्या बाबत बोलायचे झाल्यास हा भूभाग प्रामुख्याने मराठी बोलणाऱ्या जनतेचा विभाग आहे. सन १९५१ च्या चौकशी समितीच्या अहवालावरून असे दिसून येते की, डांगमधील बहुसंख्य जनता मराठी भाषिक आहे. तेव्हा हा मोठा भूभाग महाराष्ट्राला का जोडण्यात येवू नये. सन १९४९ ला बाळासाहेब खेर व मोरारजी देसाई यांनी जेव्हा डांग जिल्ह्याची पाहणी केली त्यावेळी त्यांच्या चौकशी समितीने काय निष्कर्ष काढला? जंग हा मराठी भाषिक प्रदेश आहे हा तो निष्कर्ष होय. त्यांच्या या निर्णयानुसारच मुंबई सरकारने सन १९४९ साली एक हुकूम काढून असे जाहीर केले की, डांगचा महाराष्ट्रात अंतर्भाव करण्यात यावा. माझे मित्र श्री. पेंडसे यांनी सांगितल्याप्रमाणे जेव्हा भाषावर सरहद्दीबद्दल वाद निर्माण झाला तेव्हा डांग हा भाग गुजराथला जोडण्यात यावा की, महाराष्ट्राला या वादाचा निवाडा लावण्यासाठी बक्शी टेकचंद समिती नेमण्यात आली. वास्तविक बक्शी टेकचंद हे काही महाराष्ट्रीय नाहीत. ते एक त्रयस्थ सद्गृहस्थ आहेत. पण तरीसुद्धा त्यांनी नि:स्पृहपणे असा निर्णय दिला की, डांग या भूभागाचा मराठी भाषिक राज्यात अंतर्भाव करण्यात यावा. एसआरसी रिपोर्ट नंतरही असे ठरले की, डांग हा महाराष्ट्राला जोडण्यात यावा. यासाठी कॉंग्रेस कमिटीने एक समिती नेमली. ज्यात पंडित गोविंद वल्लभ पंत, ढेबरभाई, मौलाना अब्दूल कलाम आजाद सारखी मोठी माणसे होती. डांग महाराष्ट्रात विलिन करण्यात यावा असे या तीन सदस्यांनी सुचविले. असे असताना डांग जिल्हा गुजरातला जोडण्याबद्दलचे बिल गृहमंत्री सादर करतात हे केवढे विचित्र आहे. हा महाराष्ट्रावर ढळढळीत अन्याय आहे. उकाई धरण योजनेवर कोरडे

ओढताना राजाभाऊ म्हणाले, "या धरण योजनेकरिता ते जवळजवळ १५० महाराष्ट्राची खेडी मागत आहेत. तेव्हा या धरण योजनेचा विचार करता या सगळ्या गोष्टी विचित्र वाटतात. उकाई धरण योजना सरकारच्या दृष्टीने वैज्ञानिक स्वरुपाची असली तरी माझ्या दृष्टीने नाही. मुंबईच्या असेंब्लीत मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण काय म्हणाले हे येथे वाचून दाखविणे आवश्यक आहे, 'या धरणाची उंची अद्याप ठरविण्यात आलेली नाही. त्यातील महाराष्ट्राला किती पाणी मिळणार हा एक वादाचा विषय आहे. तेव्हा आम्ही तंज्ञांशी याबाबत विचारविनिमय करणार आहोत.'

या योजनेबाबत तपशीलवार बोलताना राजाभाऊ म्हणाले, 'उकाई धरणाच्या पाण्याची विभागणी अथवा वाटप हा काही तपशिलाचा विषय होऊ शकत नाही. या धरणातून महाराष्ट्र व मुंबईला किती पाणी मिळणार हे जोपर्यंत निश्चितपणे ठरविले जात नाही, तोपर्यंत या योजनेतून हे धरण बांधताच येणार नाही. मुख्यमंत्र्यांच्या वतीने बोलायचे झाल्यास ही योजनाच मुळी बिनचूक पायावर आधारलेली नाही. त्यांना दोन मैलाचा भूभाग आणि १०० खेडी गुजराथ राज्यात हवी आहेत. या धरणयोजनेपासून जवळ जवळ ८० मैल दूर असलेले खेडे गुजराथमध्ये विलिन होईल याची कल्पना तरी करता येईल काय? सीमावादाचा विचार करताना हेच तत्त्व आम्ही पाळीत आहोत काय? गुजराथला आर्थिक सहायता करण्याबद्दलची मागणी सुद्धा तात्विक मूलतत्त्वावर आधारलेली आहे असे वाटत नाही. राजधानीची उभारणी करण्याकरिता कोट्यावधी रुपयांची मदत दिली जात आहे. वास्तविक गुजराथ राज्य खरोखरच राजधानी बांधणार आहे काय? मुंबई-दिल्ली मार्गावर एक केंद्र असलेले बडोद्यासारखे सुंदर व उत्कृष्ट शहर असताना, राजधानी बांधण्याची आवश्यकता तरी काय? मला असे वाटते की, बडोदा ही गुजरात राज्याची राजधानी करण्यात यावी. व दहा कोटी रुपये राजधानीतील इमारती बांधणी करिता व भरभराटीकरिता खर्च करण्यात यावेत. गुजराथचे मुख्यमंत्री श्री. जिवराज मेहता यांच्या म्हणण्याप्रमाणे गुजराथ आता मुंबईबाहेर जातो आहे. मुंबई जवळ जादा रक्कम आहे. तेव्हा हक्क म्हणून रक्कमेची मागणी मान्य करण्यात यावी. गुजराथ राज्याला मुंबईतून बाहेर जावे लागत आहे. रक्कमेमध्ये महाराष्ट्राप्रमाणे गुजरातचाही तितकाच वाटा आहे.'' पुढे राजाभाऊ म्हणाले, 'अशी हक्क मागण्याची पद्धत मोठी विचित्र आहे. ज्या अर्थी भाषावार प्रांत रचनेला आपण मान्यता देत आहोत त्याअर्थी त्यांच्या चांगल्या-वाईट परिणामांनाही आपण तयार असले पाहिजे. भाषावार प्रांतरचनेनुसार आपण मुंबई महाराष्ट्राला बहाल करण्याचे ज्याअर्थी कबूल केले आहे. त्याअर्थी मुंबई शहरातून येणारा महसूल देखील मुंबईकरांच्या व महाराष्ट्राच्या हितासाठीच खर्च करण्यात आला पाहिजे.'' आपल्या भाषणाच्या शेवटी राजाभाऊ

म्हणाले. "१९४७ साली ब्रिटीश भारत देश सोडून गेले. पण सोडून जाताना या देशाच्या हिताकरिता आम्ही करोडो रुपये खर्च केले आहेत म्हणून ते आम्हाला परत मिळाले पाहिजेत असे ब्रिटीशांनी म्हटले असते तर ते सुज्ञपणाचे ठरले असते. काय? त्याकरिता प्रत्येक वर्षाला इंग्लंडला हप्त्याने काही रक्कम देण्यात यावी हे न्यायशीर होईल काय? तेव्हा गुजराथची ही मागणी सर्वथैव अयोग्य आहे. तसा तुटवडा पडल्यास आपण गुजराथ राज्यास मदत केली पाहिजे ही गोष्ट रास्त आहे. शेवटी ज्या हुतात्म्यांनी महाराष्ट्र व गुजराथ या दोन राज्यांची निर्मिती करण्यासाठी प्राण वेचले त्या हुतात्म्यांना मी अभिवादन करतो."

राजाभाऊंनी दिनांक २४/१/६० रोजी राज्यसभेत नागपूरला उच्च न्यायालयाचे खंडपीठ व नागपूर करार यावर अत्यंत महत्वपूर्ण भाषण दिले. भाषणात ते म्हणाले, "सहाय्यक समितीच्या सदस्यांनी वैदर्भीय जनतेच्या बिलाला मान्यता दिल्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मुंबई उच्च न्यायालयाचे कायम स्वरूपाचे न्यायाधिशांचे एक पीठ असावे या नागपूर कराराच्या एका अटीला तरी मान्यता मिळाली हे पाहून खरोखर आनंद होत आहे. परंतु या बिलाच्या अनुरोधाने न्यायाधिशांची जी संख्या ठरविण्यात आलेली आहे ती सर्वथैव अपूर्ण आहे. या बिलाप्रमाणे नागपूरच्या खंडपीठात तीन न्यायाधिशांचीच नियुक्ती करण्यात आलेली आहे. परंतु आजच्या घटकेला नागपूर हायकोर्टात खरोखर चार न्यायाधिशांची आवश्यकता आहे. मुंबई उच्चन्यायालयाच्या कक्षेतील नागपूर खंडपिठामध्ये कोर्टाचे जास्त कामकाज नाही असे इतर सदस्यांकडून सांगितले जाणे साहजिक आहे. परंतु हा युक्तिवाद यथायोग्य नाही. गेल्या दोन वर्षांपूर्वी याच नागपूर कोर्टात कित्येक तक्रारी व दावे पडलेले असताना याचा झटपट रितीने निकाल लावण्यात आला. मोठमोठी निकालपत्रे एकेका शब्दातच संपविण्यात आली. मला तर वैयक्तिकरित्या असे वाटते की, मुंबई हायकोर्टाचे काम बरोबर चालत नसावे. कारण तेथेही बरीच अपिले झटपट निकालात काढली जातात. तेव्हा या दुरुस्तीकडे लक्ष पुरविण्यात यावे ही माझी विनंती आहे. पहिल्या दुरुस्तीवर बोलताना सहाय्यक समितीच्या सदस्यांचे मी आभार मानतो. कारण नागपूर कराराच्या निदान एका अटीला तरी त्यांनी मान्यता देण्याचे कबूल केलेले आहे. तेव्हा या बिलात नागपूर कराराचा अंतर्भाव करण्यात कोठे मज्जाव येतो हे मला समजत नाही. तेव्हा या बिलामध्ये नागपूर कराराचा अंतर्भाव करण्यात येत नसेल तर वैदर्भीय जनतेवर हा फार मोठा अन्याय आहे असे माझे स्पष्ट मत आहे. मला असे वाटते की, नागपूर कराराच्या सर्व अटींची या करारात तरतूद करण्यात यावी. नागपूर शहराला दुय्यम प्रतीच्या राजधानीचे स्वरूप प्राप्त व्हावे हा माझ्या बिलदुरुस्तीचा आशय आहे. तसेच

मुंबई विधिमंडळाचे एक सेशन तरी नागपूरमध्ये भरविण्यात यावे. या योजनेला मुंबईच्या मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिलेली आहे. तेव्हा याचीही या बिलात तरतूद करण्यात यावी. यात कायदेशीर अडचण काय आहे ते कायदेमंत्र्यांनी आम्हाला सांगावे. दुसऱ्या दुरुस्तीचा विदर्भाच्या जनतेच्याच नव्हे तर महाराष्ट्रीय जनतेच्या दृष्टीनेही अत्यंत उपयोग आहे. महाराष्ट्र व विदर्भ हे दोन्ही विभाग आर्थिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले आहेत. विदर्भातील मागासलेले लोक उपभोगीत असलेल्या सवलती काढून टाकण्यात याव्यात असे मुंबई सरकारने जाहीर केले आहे. विदर्भ हा मध्यप्रदेशाचा भाग आहे. परंतु गेल्या वर्षापासून त्यांच्या सवलती मुंबई सरकारने काढून टाकण्याचे ठरविले आहे. या सवलती देण्याकरिता कोणती अडचण आहे?'' असा सवाल राजाभाऊंनी आपल्या भाषणात केला.

## राजाभाऊंचे विषमतेविरुद्ध विचार

राजाभाऊंनी वर्णवाद, जातिभेद, अस्पृश्यता या बुरसटलेल्या विचारांची चिरफाड शास्त्रशुद्ध पायावर केली. सन १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते बौद्ध धम्माचा अंगिकार केल्यानंतर त्यांनी बौद्धधम्माच्या प्रचार व प्रचारासाठी भरपूर प्रयत्न केले. डॉ. आंबेडकरांनी ज्या शास्त्रशुद्ध पायावर आपला लढा उभा करून या देशातील प्रतिगाम्यांना निरुत्तर केले होते, राजाभाऊंनीही याच मार्गाचे अनुसरण केले. वऱ्हाडमध्ये कौंडण्यपूरला प्रतिवर्षी फार मोठी यात्रा भरते. सन १९५६ च्या डिसेंबर मध्ये राजाभाऊंची या परिसरात प्रचंड सभा झाली. या सभेत राजाभाऊंनी अत्यंत अभ्यासपूर्ण असे भाषण केले. भाषणात ते म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूरला धर्मांतर केले. याबद्दल एका वर्गाकडून कडक टीका झाली. काही टीकाकार बौद्ध धर्माचा स्विकार केल्याबद्दल दलित जनतेचे नुकसान झाले असे म्हणतात. नागपूरला धर्मांतराचा कार्यक्रम होण्याआधी ह्याच लोकांनी डॉ. आंबेडकर यांच्यामागे आता अस्पृश्य जनता मुळीच नाही. १४ ऑक्टोबरला डॉ. आंबेडकर फारच झाले तर त्यांच्या पत्नी हे दोघेच बौद्ध धर्म स्विकारतील असा प्रचार वर्तमानपत्रांतून चालविला होता. परंतु धर्मांतर करणाऱ्या लोकांचा आवाका हळू हळू वाढू लागला. पत्रकारांनी, शेकडो धर्मांतर करणार, नंतर हजारो व नंतर लाखो अशा बातम्या देणे सुरू केले. नागपूरचा सारा परिसर बुद्धंम् सरणंम् गच्छामिच्या मंत्रांनी दुमदूमून गेला. लाखो लोकांच्या समुदायाने एकाच वेळेस दीक्षा घेण्याचे जगातील हे पहिलेच उदाहरण होय. टीकाकारांचे स्वप्न भंग झाले. दलित जनतेने स्वत:च्या कृतीने सिद्ध करून दाखविले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशाचे पालन करण्यासाठी आम्हाला कोणत्याही भयंकर दिव्यातून जावे लागले तरी जावू. नागपूरचे धर्मांतर ही केवळ सुरुवात आहे.

समानतेच्या स्थानावर पोहचण्यासाठी सर्व बहुजनसमाज बौद्ध होईल. उन्नतीची वाट बौद्ध धर्मातच आहे. बाबासाहेब म्हणतात, 'मला माझ्या प्रकृतीची पर्वा नाही, बौद्ध धर्माचा प्रचार करण्यासाठी मी वाटेल त्या ठिकाणी जाईन' प्रबुद्ध भारतात जाहीर झाले आहे की, मुंबईला १० लाख लोक बौद्ध धर्माची दीक्षा घेणार आहेत. नाशिक, पुणे, औरंगाबाद इत्यादि ठिकाणीही दीक्षेचे कार्यक्रम होणार आहेत. उत्तर प्रदेशात आग्रा, दिल्ली, बंगाल व मद्रास प्रांतातही हे कार्यक्रम होणार आहेत. बौद्ध धर्माचा स्विकार केल्याखेरीज आपला तरणोपाय होणे शक्य नाही. हा जनसमुदाय आपण बघतो आहोत. १४ ऑक्टोबरला बाबासाहेबांनी धर्मांतर केले म्हणून पत्रकारांनी टीका केली. पण आपण १४ ऑक्टोबरला केलेले धर्मांतर योग्य आहे की अयोग्य ही साक्ष ह्या कौंडण्यपूर यात्रेतील ही सभा देत आहे.'' या प्रचंड सभेला संबोधित करताना राजाभाऊ म्हणाले, 'येथील सवर्णांच्या देवळात अस्पृश्यांना मज्जाव आहे. दुसरीकडे गोरगरीब अस्पृश्य लोकांनी आपले वेगळे देऊळ बांधले आहे. या दोन देवळांची तुलना करा. येथील सवर्णांच्या देवळात जी असमानता आहे ती सर्वत्र भारतात पहावयास मिळेल. याच असमानतेच्या शिकवणुकीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्म स्विकारला. या भेदभावाचे कारण काय असले पाहिजे याचा विचार तरी कोणी केलेला आहे काय? आम्ही बौद्ध धर्मच का स्विकारला? याचा तरी कोणी विचार केलेला आहे काय? या देशात असमानता व भेदभावाची शिकवणूक देण्याबद्दल वेद, गीता, उपनिषदे, पुराण, स्मृति, श्रुती ही धर्मशास्त्रे जबाबदार आहेत. या धर्मग्रंथांमध्ये भेदभाव, वर्णभेद, जातीयता, अस्पृश्यता या विषमतामूलक तत्त्वांचा स्पष्ट उल्लेख आहे. या ग्रंथांनी हिंदूधर्माला मान्यता दिली. जो धर्म भेदभावाला, जातीयतेला मान्यता देतो, त्याचा आम्ही त्याग केला तर आम्ही कोणती चूक केली? ऋग्वेदातील पुरुष सुक्तात चार वर्ण कसे निर्माण झाले याची माहिती देण्यात आलेली आहे. ईश्वराने सृष्टी निर्माण केली. पुरुष निर्माण केला. पुरुषाच्या तोंडातून ब्राह्मण, बाहू-क्षत्रिय, जांघ-वैश्य व पाय-शुद्र अशी वेदात कल्पना आहे. गीतेत कृष्णाने राष्ट्राच्या कारभाराचे नियम चातुर्वर्ण्याच्या भेदांवर केलेले आहेत. मनुस्मृतीत तर वर्णभेदाचे अत्यंत किळसवाणे स्वरूप पहावयास मिळते. शुद्रांनी विद्या शिकू नये. पैसा मिळवू नये. लढाई करून मानाने जीवन जगू नये असे मनूने मनुस्मृतीत कायदे केले आहेत. कुत्र्याप्रमाणे जन्माने हीन लेखून ज्या दलित जनतेवर हजारो वर्षे ज्या धर्मग्रंथांनी अन्याय व जुलूम केला त्यांना प्रमाण मानून आम्ही हिंदू आहोत असा टेंभा मिरविणे हे पाशवी व गुलामी मनोवृत्तीचे प्रतिक आहे.' चातुर्वर्ण्यावर कोरडे ओढताना राजाभाऊ भाषणात म्हणाले, 'चातुर्वर्ण्याचा पुरस्कार करणारे काही लोक म्हणतात, समाजधारणेकरिता

चातुर्वर्ण्यांची आवश्यकता आहे. पण त्यामधली असमानता काय दाखविते? चातुर्वर्ण्य जगाच्या पाठीवर कोठेही नाही. हजारो जातीत समाज विभागलेला इतरत्र कोठेही नाही. या देशात अशी जी विभागणी करण्यात आली ती कोणत्या आधारावर? काही लोक म्हणतात वर्णव्यवस्था निर्माण झाली ती मनुष्याच्या कर्मावर. व हे प्रतिपादन करण्यासाठी गीतेचा आधार घेतला जातो. पण हा खोटा सिद्धांत आहे. चातुर्वर्ण्य ही व्यक्तीच्या जन्मानुसार व्यवहारात सर्रास सुरू आहे. ही गोष्ट सिद्ध करण्यासाठी अनेक उदाहरणे देता येतील. द्रोणाचार्याला हिंदू धर्म ग्रंथात ब्राह्मण म्हटले आहे. पण द्रोणाचार्याने तर आपले सारे आयुष्य क्षत्रियाचे कार्य करण्यात घालविले. मग तो ब्राह्मण कसा होऊ शकतो? पण हिंदूधर्म ग्रंथ त्याला क्षत्रिय म्हणत नाहीत. ब्राह्मण म्हणतात. दुसरे उदाहरण कर्णाचे घ्या. कर्ण हा कुंतीच्या पोटचा मुलगा होता. ती कुमारी असताना कर्ण जन्मास आला. त्याचे पालन पोषण रथ हाकलणाऱ्या एका ढीवर जातीच्या सारथ्याने केले. कर्ण शूर, पराक्रमी, योद्धा, लढवय्या म्हणून पुढे आला. पण त्याला हिंदू धर्मग्रंथांनी क्षत्रिय म्हणून मान्यता दिली नाही. द्रोपदी स्वयंवर प्रसंगी बाण उचलण्यास समोर आलेल्या कर्णाला कृष्णाने अडविले. व तू सारथ्याचा पुत्र आहेस. तू या स्पर्धेत भाग घेवू नकोस असे सांगितले. त्या वेळचे कर्णाचे उद्‌गार आहेत, 'जन्म घेणे माझ्या हाती नव्हते. पण कर्माने आपले नाव अजरामर करणे माझ्या हाती आहे.' कोणत्याही क्षत्रियाच्या शंभर पटीने कर्ण शौर्यवान होता. पण त्याला क्षत्रिय का म्हटले गेले नाही? श्रीकृष्णाच्या वेळी चातुर्वर्ण्याची विभागणी कर्मावर नसून जातीवरच होती. जाणुनबूजून स्वतःच्या स्वार्थाकरिता ही योजना बनविण्यात आली. समाज धारणेसाठी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण निर्माण करण्यात आले असे म्हटले जाते, परंतु हा कारस्थानाचा भाग आहे. मूठभर उच्चवर्णियांनी आपली हुकूमत बहुजनांवर गाजविण्यासाठीच द्रोण हा ब्राह्मण व कर्ण हा क्षत्रिय नाही असे ग्रंथात विवेचन केलेले आहे. खरा प्रश्न असा आहे की, जर वर्णव्यवस्था समाजाच्या उद्धारासाठी होती तर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशी उच्चनीचतेची विभागणी का करण्यात आली? असा भेदभाव का ठेवण्यात आला? चार वर्गांची विभागणी समान करण्यात आली असती तर काय बिघडले असते? उच्चवर्णीयांना चारही वेद समान आहेत हे दाखवायचे होते म्हणून त्यांनी चारही वेद ईश्वराने निर्माण केले असा सिद्धांत मांडला. पण असाच सिद्धांत चातुर्वर्ण्यात मांडला असता तर समाजाचा नाश झाला नसता. मेरी थॉमस पेन ने आपल्या 'ऐज ऑफ दि रिजन' या ग्रंथात लिहिल्याप्रमाणे, 'जगात मुसलमान, ईसाई, यहुदी या धर्मसंस्था स्थापन करणाऱ्यांना ईश्वराचे बहुजनसमाजावर वर्चस्व स्थापन करावयाचे होते. हेच तत्त्व हिंदू धर्माला लागू पडते.

हा धर्म एकिकडे जीवन जगण्यास परवानगी देतो व दुसरीकडे गुलामीत ठेवतो. आम्ही गुलामीत का राहावे हेच समजत नाही. हिंदू धर्म ग्रंथांनी चातुर्वर्णाला मान्यता दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आधुनिक युगात निर्माण झाले की, ज्यांनी या विषमतामूलक तत्त्वांविरुद्ध बंड पुकारले. महात्मा ज्योतिबा फुले यांनी दलित, पददलित दीनदुबळ्यांवरील अन्याय दूर करण्यासाठी अतोनात कष्ट उपसले. हे एक उदाहरण सोडले तर चातुर्वर्ण्यातील सामाजिक विषमतेविरुद्ध आवाज काढणारी व्यक्ती निर्माण झाली नाही. धर्माच्या नावावर बहुजनसमाजावर घोर अन्याय-अत्याचार करण्याचे उदाहरण जगाच्या इतिहासात आढळणार नाही.'' पाश्चात्य धर्मसंस्थांचे विवेचन करताना राजाभाऊ म्हणाले, ''युरोपात ख्रिस्ती धर्मसंस्था चालविणारे पोप जनतेवर अन्याय, अत्याचार करीत. पोपने देऊळ बांधण्यासाठी लोकांना स्वर्गात जाण्याचे सर्टिफिकेट देवून निधी गोळा केला. जो जास्त निधी देईल तो पापापासून मोकळा. पण १५ व्या शतकात युरोपात मार्टीन लुथरने पोपने धर्माच्या नावाखाली चालविलेल्या कारवायांविरुद्ध आवाज उठविला. मार्टिनने पोपच्या साहित्याची राखरांगोळी केली. पण असले धाडस या देशात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशिवाय कुणी केले नाही. फ्रान्समध्ये वाल्टेअरने धर्माच्या नावाखाली पोपने चालविलेले अत्याचार बंद केले. थॉमस पेन ने सुद्धा या विरुद्ध आवाज उठविला. युरोपात २ हजार वर्षेपर्यंत पोपने अत्याचार केले. याहीपेक्षा जास्त अत्याचार हिंदुस्थानात अस्पृश्यांवर झाले. पण या अन्यायाविरुद्ध कोणीही आवाज उठविला नाही. कारण येथील उच्चवर्णियांनी शस्त्रे, पैसा व विद्येवर बहुजनसमाजाचा काहीएक अधिकार ठेवला नाही. शूद्र कितीही निरोगी व सशक्त असो, त्याला युद्धाचे शिक्षण घेण्यास बंदी टाकण्यात आली. विद्या शिकण्याची आवड असताना सुद्धा शुद्रांना विद्येपासून मज्जाव करण्यात आला. ५० वर्षांपूर्वीची गोष्ट. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना, ते केवळ महार जातीत जन्मले म्हणून संस्कृत शिकण्यास मनाई करण्यात आली. परंतु बाबासाहेबांनी विरोधाला न जुमानता, न डगमगता संस्कृतचा अभ्यास केला. वेद, शास्त्र, पुराणे धर्माच्या विरुद्ध निर्माण करण्यात आलेली आहेत. हे ग्रंथ बुद्धीला पटत नाहीत. यात उच्चवर्णीयांचा स्वार्थ होता.''

भाषणाच्या शेवटी राजाभाऊ म्हणाले, ''कॅन्सरचा रोग क्षयाच्या रोगाप्रमाणे असतो. ऑपरेशन केले तर हा रुग्ण काही वर्षे जगू शकतो. ज्याला जिवंत राहावयाचे असेल तो शस्त्रक्रिया करू देईल. कितीही पिडा झाली तरी तो घाबरणार नाही. भारतीय समाजाला असाच वर्ण व जातीभेदाचा रोग जडलेला आहे. त्याला शस्त्रक्रियेचाच जालिम उपाय केला पाहिजे. या भयानक रोगामुळे भारतीय समाज रसातळाला गेल्याशिवाय राहणार नाही. ख्रिश्चन धर्माला कीड लागली होती तेव्हा

मार्टिन लूथर किंग, थॉमस पेन सारख्यांनी पोपच्या विरुद्ध आवाज उठविला. त्यांनी ख्रिश्चन धर्मात नवीन तत्त्वे आणली नसती तर तो धर्म टिकला नसता. आम्ही बौद्ध धर्म का घेतला याला विषमतामुलक तत्त्वे कारणीभूत आहेत.''

राज्यांचा आकार, प्रदेश वगैरेच्या भिन्नतेमुळे लोकसंख्या व आर्थिक बाबी यात विषमता निर्माण होते. व त्याचा परिणाम राजकीय असमतोल निर्माण होण्यात होतो. असे राजाभाऊंचे मत होते. सन १९७३ ला चंद्रपूर येथील एका पत्रपरिषदेत ते म्हणाले, 'माझ्या विदर्भाच्या भूमित व तेलंगणा, सौराष्ट्र, झारखंड इत्यादि लहान लहान राज्ये स्थापन करण्याकरिता तेथील जनतेने उग्र आंदोलन उभारलेले आहे. या आंदोलनाची उभारणी राष्ट्रीय स्तरावर झाली पाहिजे.' ज्या विदर्भाच्या मातीत राजाभाऊंचा जन्म झाला, त्याबद्दल पत्रकारांशी बोलताना त्यांनी सांगितले, 'विदर्भाचे वेगळे राज्य व्हावे ही माझ्या पक्षाची स्पष्ट भूमिका आहे.' एकेकाळी राजाभाऊ संयुक्त महाराष्ट्राचे कट्टर पुरस्कर्ते होते. नंतर त्यांनी स्वतंत्र विदर्भाची मागणी केली. या दोन भूमिकांबद्दल आज तटस्थपणे विचार होणे जरुरीचे आहे. द्विभाषिक राज्य नको म्हणून राजाभाऊंनी आपली सर्व शक्ती पणास लावली. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रखर आंदोलनात स्वतंत्र विदर्भाची मागणी लावून धरणे तेव्हा कालविसंगत होते. कदाचित द्विभाषिक राज्यांच्या पुरस्कर्त्यांना मराठी भाषिकांमध्ये फुट पाडण्यासाठी स्वतंत्र विदर्भाची मागणी ही एक सुवर्णसंधी होती. राजाभाऊंनी महाराष्ट्र राज्याखातर ही फुट टाळली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'थॉट्स ऑन लिंग्वीस्टीक स्टेट्स' या पुस्तिकेत लहान लहान राज्ये हितकारक असल्याचे लिहून ठेवलेले आहे. परंतु त्यानंतरच्या कालखंडात बाबासाहेबांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाकरिता आशीर्वाद दिले हा सुद्धा इतिहास आहे. राजाभाऊंनी बाबासाहेबांची भूमिका रेटली. त्याकाळात राजाभाऊंनी स्वतंत्र विदर्भ मागितला असता तर आंदोलनात फार मोठा डेडलॉक निर्माण झाला असता हेही खरे आहे, राजाभाऊंना तो टाळायचा होता. नंतरच्या कालखंडात राजाभाऊंनी स्वतंत्र विदर्भाची मागणी करणे याचा अन्वयार्थ असा लावता येईल की, संयुक्त महाराष्ट्र राज्याची मागणी ही काळाची गरज होती. तर राजाभाऊंनी स्वतंत्र विदर्भ राज्याच्या निर्मितीची मागणी करणे हा तात्विक अधिष्ठानाचा भाग होता.

राजाभाऊंनी दुष्काळी परिस्थितीबद्दल कधीकधी टोकाच्या भूमिका घेतलेल्या आहेत. त्यावेळेस नागपूर, मालेगाव इत्यादि ठिकाणी धान्य दंगली झाल्यात. यावर ते म्हणाले, 'दंगल कोणतीही असो, त्याचे समर्थन करता येण्यासारखे नसले तरी ही दंगल भुकेने पेटलेल्या जनतेची अपरिहार्य प्रतिक्रिया होय.' साठेबाजी, नफेखोरी, काळाबाजार, भ्रष्टाचार करणाऱ्यांविरुद्ध मुंबईच्या एका जाहीर सभेत बोलताना

राजाभाऊ म्हणाले, 'या समाज द्रोह्यांविरुद्ध भारत संरक्षण कायदा तातडीने अंमलात आणावा.'

राजाभाऊंचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी उभा दावा होता हे सर्वविदित आहे. ते आरएसएसवर तुटून पडायचे. त्यांची ही स्पष्ट भूमिका असतानाही या संघटनेचे असंख्य कार्यकर्ते राजाभाऊंच्या मित्रपरिवारात होते. आरएसएसची जन्मभूमि नागपूर तर राजाभाऊंची कर्मभूमी नागपूर. परंतु त्यांच्या सावलीलाही राजाभाऊ कधी गेले नाहीत. एवढी टोकाची भूमिका असल्यानंतर ही संघाचा कार्यकर्ता त्यांना भेटावयास गेल्यास त्यांच्या आदरातिथ्यात कधी तफावत आढळली नाही. गंगाधर फडणविसां सारखे त्यांचे अगदी जवळचे मित्र होते. म्हणून फडणविस राजाभाऊंच्या श्रद्धांजलीप्रसंगी ढसढसा रडले. 'निधर्मी भारतभूमीत धर्माची पुंगी वाजविणे बंद करा.' असे त्यांनी एकदा संघकार्यकर्त्यांना बजावले होते. संघवालेही मोठे बहाद्दर. राजाभाऊ नागपूरमधून लोकसभेला उभे राहिले तेव्हा संघ - जनसंघाच्या कार्यकर्त्यांनी त्यांना पाठींबा देताना 'अय्या गडे, इश्श गडे, आमचा उमेदवार खोब्रागडे.' असा मजेदार प्रचार केला होता.

साम्यवादावरही राजाभाऊंनी कोरडे ओढलेले आहेत. सिलोनचे पंतप्रधान दिवंगत सिरोमाओ बंदरनायके यांचे पुतणे डॉ. एस. के. बंदरनायके यांचा सन १९७४ ला नागपूर येथे भव्य सत्कार करण्यात आला. या समारंभात राजाभाऊ खणखणीत शब्दात म्हणाले, "साम्यवाद व समाजवादापेक्षा बौद्ध धम्माची जीवनपद्धती श्रेष्ठ आहे. केवळ आर्थिक प्रश्नांनी मानवी समस्या सुटणार नाहीत. बौद्ध धम्मच या सर्व प्रश्नांना चोख उत्तर आहे."

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी जवळील दिघोरी या खेड्यात महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण एकाच वेळेस करण्याचा योग राजाभाऊंना आला. या प्रसंगी महनीय विचार व्यक्त करताना त्यांनी म्हटले, "महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या कट्टर राजकीय विरोधकांचे पुतळे एकाच ठिकाणी उभारणे हा औचित्यपूर्ण प्रसंग आहे. या दोन महान नेत्यांचा परस्परविरोध व्यक्तिगत पातळीवर नव्हता. तो तत्त्वांसाठी सिद्धांतासाठी होता. दोन्ही नेते थोर राष्ट्रभक्त होते. देशाच्या स्वातंत्र्याकरिता, राष्ट्राच्या समृद्धीसाठी दोन्ही नेत्यांनी महान कामगिरी केलेली आहे." स्वातंत्र्य आंदोलनाच्या कालखंडात व स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या प्रारंभीच्या काळात आंबेडकर अनुयायांमध्ये गांधींबद्दल एक वेगळे मत होते. राजाभाऊंनी या अनावरणप्रसंगी काढलेले हे उद्‌गार मतभेदांची दरी दूर करणारे सिद्ध झाले.

राजाभाऊंच्या घराच्या मागील व्हरांड्यात एक पाळणा होता. आजही तो आहे. या पाळण्यावर बसून राजाभाऊ पायांनी झोका घेत कार्यकर्त्यांशी हितगूज व चर्चा करीत असत. राजाभाऊंचा हा एक छंद होता. पण या छंदास क्रियशिलतेची जोड होती. राजाभाऊंनी या पाळण्यावर बसून अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. देशव्यापी आंदोलनाची रूपरेषा त्यांनी याच पाळण्यावर बसून आखली. साप्ताहिक 'प्रजासत्ताक' सुरू करण्याचा निर्णय त्यांनी याच पाळण्यावर झोके घेत घेतला. राष्ट्रीय स्तरावरील नेते राजाभाऊंकडे मुक्कामाला आले तर सकाळी याच पाळण्यावर बसून चहा-पान घ्यायचे. आजही हा पाळणा या सर्व घडामोडींचा मूक साक्षीदार आहे.

जगन्नाथपुरीचे शंकराचार्य स्वामी निरंजन देव तीर्थ यांनी बंगलोरला अत्यंत आक्षेपाई वक्तव्य केल्यामुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली. सन ७२-७३चे वर्ष असावे. ''अस्पृश्यता हिंदू धर्माचे अभिन्न अंग आहे. अस्पृश्यतेचे पालन केलेच पाहिजे अशा आशयाचे ते विधान होते. भारताचे माजी राष्ट्रपती दिवंगत संजीव रेड्डी हे तेव्हा लोकसभेचे अध्यक्ष होते. या सभागृहाने एकमताने शंकराचार्यांच्या या विधानाचा धिक्कार केला. अध्यक्षांच्या खूर्चीवर विराजमान झालेले रेड्डी म्हणाले की, 'पुरीचे शंकाराचार्य टेबलाच्या खाली बसविण्याच्या पात्रतेचे आहेत'. तेव्हा चंद्रपूरातही संतापाची लाट उसळली. आम्ही सर्व कार्यकर्ते एकत्र बसलो व शंकराचार्यांचा निषेध करण्याकरिता एक निषेध मोर्चा आयोजित करावा असा निर्णय घेण्यात आला. मोर्च्यात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. त्याच दिवशी संध्याकाळी राजाभाऊ दौऱ्यावरून चंद्रपूरला परतले. त्यांना आम्ही कार्यकर्त्यांनी आंदोलनाची पूर्ण माहिती दिली. राजाभाऊ तेव्हा पाळण्यावर बसून झोके घेत होते. राजाभाऊ माझ्यावर व इतर कार्यकर्त्यांवर खूप रागावले. बाजुलाच त्यांच्या मातोश्री बसल्या होत्या. त्यांनी राजाभाऊंचा राग शांत केला. शांत होऊन ते म्हणाले, 'अरे तुम्ही अनुनभवी आहात. थोडे विचारले पाहिजे.'

राजाभाऊंनी प्रदीर्घ काळ राजकारण-समाजकारण केले. हे करीत असतांना त्यांनी सहृदयता कधी सोडली नाही. चंद्रपूरला पंडित भगवतीप्रसाद मिश्र हे स्वातंत्र्यसंग्राम सैनिक होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सामाजिक आंदोलनात ते सतत आघाडीवर असायचे. वयाने जेष्ठ असूनही ते राजाभाऊंना समतेच्या आंदोलनातील एक खंदा नेता म्हणून मान देत असत. एकदा पंडीत मिश्र यांची अचानक प्रकृती बिघडली व त्यांना सरकारी रूग्णालयात भरती करण्यात आले. राजाभाऊंना कळल्यावर ते पंडित मिश्र यांची प्रकृती पहावयास दवाखान्यात गेले व खिन्न मनाने परतले. नंतर पंडितजीचे देहावसान झाले. राजाभाऊ त्यांच्या अंन्त्ययात्रेत सहभागी झाले व त्यांच्या शवाला त्यांनी खांदा दिला.

राजाभाऊंनी हिंदू धर्माचा त्याग केला व बौद्ध धम्म स्विकारला. 'भारत बौद्धमय करेल' या बाबासाहेबांच्या वचनाची परिपूर्ती करण्याच्या दिशेने राजाभाऊंनी वाटचाल सुरू केली. चंद्रपूरची ऐतिहासिक दीक्षाभूमी याची आजही साक्ष देत आहे. कलकत्ता, पाटना, सारनाथ इत्यादि महाराष्ट्राबाहेरील शहरांमध्ये व महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी राजाभाऊंच्या हस्ते धम्मदींक्षेचे समारंभ पार पडले. सन १९८२ला त्यांनी चंद्रपूरच्या दीक्षामैदानावर धम्मदीक्षेचा रौप्य महोत्सव अत्यंत थाटात संपन्न केला. सतत ९ दिवसापर्यंत चाललेल्या या रौप्य महोत्सवात चंद्रपूर व दूरवरच्या बौद्ध जनतेने मोठ्या संख्येने भाग घेतला. या नऊ दिवसांच्या कालावधीत अनेक बौद्ध कुटुंबांनी राजाभाऊंच्या शुभहस्ते बौद्ध धम्माची दीक्षा ग्रहण केली. श्रीलंका, थायलंड इत्यादी देशांमध्ये आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय बौद्ध संम्मेलनात राजाभाऊंनी भारतीय बौद्धांचे अनेकदा प्रभावी नेतृत्व केले. सन १९७२ला श्रीलंकेची राजधानी कोलंबो येथे आयोजित जागतिक बौद्ध परिषदेत राजाभाऊंनी हिरीरीने भाग घेतला. या परिषदेच्या खुल्या अधिवेशनात त्यांनी एक प्रस्तावही सादर केला. या प्रस्तावावर ते म्हणाले, 'दक्षिण व्हिएतनाममधील बौद्ध बांधवांचा अनन्वित छळ होत आहे. हजारोंच्या संख्येने तेथील बौद्ध निराधार व निराश्रित होत आहेत. व्हिएतनामच्या बौद्धांची स्थिती अत्यंत हृदयद्रावक असून त्यांच्या सहाय्यतेकरिता परिषदेने हर तऱ्हेचे प्रयत्न केले पाहिजेत.' साऱ्या जगात फोफावलेल्या बौद्ध धम्माच्या चळवळीचा आढावा बौद्धांच्या या जागतिक परिषदेने घ्यावा अशी मौलिक सुचनाही त्यांनी बोलताना केली. बौद्ध परिषदेच्या याच खुल्या अधिवेशनात राजाभाऊंची 'बौद्ध मानवी सेवा' व शिक्षण समितीच्या चिटणीसपदी नियुक्ती करण्यात येऊन त्यांचा बहुमान करण्यात आला. जगातील मानवी समस्यांच्या सोडवणुकीकरिता साम्यवाद अथवा समाजवाद हे उत्तर नसून बौद्ध धम्म या सर्व प्रश्नांचे उत्तर आहे. असे त्यांनी या परिषदेत ठामपणे सांगितले.

राजाभाऊंचा असिम त्याग, निस्वार्थ सेवा, समतेच्या लढ्यात समर्पित केलेले जीवन याची पावती म्हणून सन १९७५ला त्यांचा सुवर्ण महोत्सव त्यांच्या जन्मभूमित अत्यंत थाटात संपन्न झाला. त्यांच्या भव्य नागरी सत्कारात सर्व राजकीय, सामाजिक व धार्मिक संघटनांचे नेते सहभागी झाले होते. 'राजाभाऊंच्या रूपाने चंद्रपूरची लाल माती संपूर्ण देशाला ललालभूत ठरली.' या शब्दात विभिन्न नेत्यांनी याप्रसंगी राजाभाऊंचा खुल्या अंत:करणाने गौरव केला. नागपूर विद्यापिठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते याप्रसंगी प्रमुख अतिथी होते. 'डॉ. आंबेडकरांच्या एका सच्च्या शिपायास अभिवादन करण्याकरिता माझी प्रकृती ठीक नसतांनाही मी येथे आलो' या भावपूर्ण शब्दांत डॉ. भाऊसाहेब कोलत्यांनी

राजाभाऊंचा गौरव केला. या निमित्ताने एका गौरव स्मरणिकेचेही प्रकाशन करण्यात आले मी या स्मरणिकेचा संपादक होतो. अनेक विचारवंतांचे राजाभाऊंचा गौरव करणारे लेख या स्मरणिकेत आहेत. महाराष्ट्राचे प्रख्यात पत्रकार व तरुण भारत या दैनिकाचे माजी संपादक दिवंगत ग. त्र्यं. माडखोलकर यांनी आपल्या लेखात राजाभाऊंचा गौरव करतांना लिहिले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो धम्मचक्रप्रवर्तनाचा ध्वज नागपूरच्या दीक्षाभूमीवर १९५६ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर उभारला, तो हातात घेऊन राजाभाऊंनी पूर्व व आग्नेय आशियातील सिलोन, थायलंड सिंगापूर, जपान इत्यादि देशात प्रवास केला. व त्या धर्माच्या त्या त्या राष्ट्रातील स्वरूपाची माहिती करून घेतली. आंतरराष्ट्रीय बौद्ध संम्मेलनात त्यांना जे उच्च स्थान मिळाले, ते याच कारणामुळे. त्याचप्रमाणे पोलंड, पूर्व जर्मनी, फ्रान्स इटली, अमेरिका इत्यादि पाश्चात्य देशात प्रवास करून त्यांनी तेथील राज्यघटना, राजकीय परिस्थिती आणि निर्वासित अल्पसंख्यंकांचे प्रश्न यांची माहिती करून घेतली; व अमेरिकेतील निग्रो समाजाच्या उठावाचाही निकरास आलेला प्रश्न समजावून घेतला. असा हा नागपूर प्रांतातील दलित समाजाचा बहुश्रूत चतुरस्त्र आणि कर्तृत्ववान नेता शतायुषी होवो व महाराष्ट्राच्या आणि भारताच्या उन्नतीच्या कार्यात अधिकाधिक यशस्वी होवो, असे मी या त्यांच्या ५१व्या वाढदिवसाच्या मंगलसमयी मन:पूर्वक इच्छितो.'' महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या व राजाभाऊंनी ज्या भूमीस आपली कर्मभूमी मानले, त्या नागपूरच्या महानगरपालिकेने राजाभाऊंचा त्यांच्या ५१व्या वाढदिवसा निमित्ताने भव्य सत्कार केला. व मानपत्र अर्पण केले. सत्कारास उत्तर देताना राजाभाऊ म्हणाले, 'महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेने मी गेल्या २५ वर्षात समाजाची अल्पशी सेवा करू शकलो. डॉ. आंबेडकरांचे कार्य हे सतीचे वाण असल्याचे मी नेहमीच सांगत आलो आहे. या खडतर कार्यासाठी मी माझे जीवन वाहिले आहे.'

राजाभाऊंनी विदेशात खूप भ्रमंती केली. विद्यार्थी दशेत असतांना उच्च शिक्षणासाठी विलायतेस तर गेलेच, परंतु देशाच्या राजकारणात-समाजकारणात उतरल्यानंतर पौर्वात्य राष्ट्रे जपान, श्रीलंका, हाँगकाँग, थायलंड, सिंगापूर तसेच अमेरिकेस त्यांनी भेटी दिल्या. अमेरिका, जर्मन डेमॉक्रटीक रिपब्लिक (पूर्व जर्मनी) या देशांना देणाऱ्या सांसदिय शिष्टमंडळात राजाभाऊ होते. तत्कालिन लोकसभाध्यक्ष धिल्लाँन यांच्या नेतृत्वात हे शिष्टमंडळ गेले होते. अमेरिकन निवडणूक पद्धतीचा अभ्यास करणे हा या शिष्टमंडळाचा हेतू होता. फ्रान्स, इटली, स्वित्झरलँडया राष्ट्रांनाही त्यांनी भेटी दिल्या. राज्यसभेचे उपसभापती असतांना राजाभाऊंच्या नेतृत्वात एका सांसदिय शिष्टमंडळाने पोलंड या राष्ट्राला भेट दिली. या

शिष्टमंडळात विद्यमान पंतप्रधान श्री अटलबिहारी वाजपेयी हे एक सदस्य होते. राजाभाऊंचे श्री वाजपेयींशी स्नेहसंबंध होते. श्री. वाजपेयी चंद्रपूरला दौऱ्यांवर आले की ते राजाभाऊंची हटकून आठवण करायचे.

## राजाभाऊंच्या शिक्षणसंस्था

या सर्व धावपळीच्या आयुष्यामधून वेळ काढून राजाभाऊंनी शिक्षणक्षेत्रातही पदार्पण केले. शिक्षण ही दलितांच्या उन्नतीची गुरुकिल्ली असल्याचे मानून डॉ. आंबेडकरांनी मुंबई-औरंगाबाद येथे महाविद्यालये सुरू केली. राजाभाऊंनी बाबासाहेबांच्या पावलावर पाऊल टाकून शिक्षण संस्था स्थापन केल्या. सिद्धार्थ शिक्षण सहाय्यक संस्थेची सर्वप्रथम त्यांनी सन १९५७ला संस्थापना केली. या संस्थेमार्फत आज चंद्रपूर जिल्ह्यात दोन शाळा व तीन वसतिगृहे सुरू आहेत. चंद्रपूर व नान्होरी, तह, ब्रह्मपुरी येथे माध्यमिक विद्यालये आहेत. चंद्रपूरचे सिद्धार्थ विद्यालय नावारूपास आलेली संस्था असून या विद्यालयातून अनेक विद्यार्थी गुणवत्ता यादीत आलेले आहेत. नुकताच महाराष्ट्र शासनाने या विद्यालयास 'दलित मित्र' पुरस्कार देऊन गौरव केलेला आहे. राजाभाऊंनी डॉ. आंबेडकर मेमोरिअल सोसायटी स्थापन करून चंद्रपूरच्या दीक्षामैदानावर भव्य असे महाविद्यालय उभे केले. चंद्रपूर जिल्ह्यातील अगदी पूर्वेकडील टोकाला ब्रह्मपुरी येथेही त्यांनी महाविद्यालय सुरू केले. ब्रह्मपुरी येथे बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे प्रशिक्षण महाविद्यालय सुरू करण्यात आलेले आहे. राजाभाऊंनी उभारलेल्या या सर्व शैक्षणिक संस्थांमधून बहुतांश मागासवर्गीय व ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. अनेक विद्यार्थी डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील झालेले व शासनात मोठ्या हुद्द्यावर आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील राजाभाऊंच्या या भरीव कार्यामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील व जिल्ह्याबाहेरील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण संपादन करण्याची फार मोठी संधी उपलब्ध झालेली आहे.

आज चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर डॉ. आंबेडकर कॉलेज डौलाने उभे आहे. परंतु या महाविद्यालयाच्या स्थापनेचा इतिहास तेवढाच हृदयस्पर्शी आहे. राजाभाऊंची पहिली मूळ संस्था सिद्धार्थ शिक्षण सहाय्यक संस्था व शाळा सिद्धार्थ विद्यालय, चंद्रपूर ही होत. राजाभाऊंनी अनेक संस्था उभ्या केल्या. परंतु सिद्धार्थ विद्यालय व तेथील कर्मचाऱ्यांवर सदैव पितृतुल्य प्रेम केले. चंद्रपूरच्या दीक्षाभूमीवर कॉलेज सुरू करण्याकरिता प्रारंभी फार मोठ्या रकमेची गरज होती. सिद्धार्थ विद्यालयाच्या शिक्षकांकडून ही सहायता मागण्याचा त्यांनी मनोदय व्यक्त केला. तसे पाहिले तर राजाभाऊ संस्थाध्यक्ष असल्यामुळे ते आदेशही देऊ शकले असते. परंतु त्यांनी असे

न करता शिक्षकांची एक सभा बोलावली व शिक्षकांना कॉलेजकरिता आर्थिक सहाय्य करण्याची विनंती केली. शिक्षकांनी स्वयंस्फूर्तपणे एकसूरात सहा-सहा महिन्यांच्या पगार कॉलेजसाठी देण्याचे राजाभाऊंना विनम्रपणे सांगितले. कॉलेजला नंतर मंजुरी मिळताच राजाभाऊंना सर्वप्रथम सिद्धार्थ विद्यालयाच्या शिक्षकांची आठवण झाली. त्यांनी शिक्षकांना आपल्या निवासस्थानी अल्पोपहाराकरिता निमंत्रित केले व प्रत्येकाच्या पगाराची रक्कम परत करतांना ऋण व कृतज्ञता व्यक्त करावयास ते विसरले नाहीत. त्यांच्याच संस्थेचे कर्मचारी परंतु राजाभाऊंनी असे ऋणानुबंध जोपासले. भ्रष्टाचारापासून दूर, व सार्वजनिक कार्याकरिता ज्यांना सहायता मागीतली त्यांना इमाने-इतबारे पैसा परत करणे हा मापदंड त्यांनी आयुष्यभर पाळला.

राजाभाऊ नागपूर विद्यापीठ कोर्टाचे अनेक वर्षे सदस्य राहिले. आज नागपूर विद्यापीठाच्या क्षेत्रातील खेड्यापाड्यात महाविद्यालयाचे जाळे पसरलेले आपण पाहतो. यामुळे ग्रामीण भागातील गोरगरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची फार मोठी संधी उपलब्ध झालेली आहे. राजाभाऊंनी विद्यापीठाच्या कोर्टाचे सदस्य असतांना सन १९६९ साली ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यांमधील गोरगरीबांच्या दारापर्यंत गेली पाहिजे यासाठी विद्यापीठात एक ठराव मांडला व तो पास करवून घेतला. ''ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाला सर्वतोपरी प्रोत्साहन मिळावे म्हणून ग्रामीण व मागास क्षेत्रात निघणाऱ्या नव्या महाविद्यालयाच्या बाबतीत विद्यापीठाने आपले नियम बदलून शिथील करावे. मागासवर्गियांच्या शैक्षणिक उन्नतीकरिता त्यांच्या शैक्षणिक संस्था निघाल्या पाहिजेत.'' अशा आशयाचा तो ठराव होता.

## 'प्रजासत्ताक' साप्ताहिक

पत्रकारितेत राजाभाऊंची खूप रूची होती. दीन-दलित, अल्पसंख्यांक समाजाच्या प्रश्नांना खऱ्या अर्थाने वाचा फोडावयाची असेल तर त्यांची वृत्तपत्रे असणे जरुरीचे आहे असे त्यांचे मत होते. त्याकरिता त्यांनी चंद्रपूर येथे पक्षाच्या मालकीचे भीमशक्ती मुद्रणालय सुरू केले. सन १९६९ला या मुद्रणालयातून 'प्रजासत्ताक' साप्ताहिक सुरू करण्यात आले. हे साप्ताहिक सुरू करण्यामागे मूळ प्रेरणा राजाभाऊंचीच होती. मी या साप्ताहिकाचा कार्यकारी संपादक होतो. या साप्ताहिकास दलित, बौद्ध, अल्पसंख्यांक समाजाने सामाजिक आंदोलनाच्या रूपात स्विकारले. 'प्रजासत्ताक' साप्ताहिकाने 'रावण दहन' ही कुप्रथा बंद व्हावी म्हणून वृत्तपत्राच्या माध्यमातून मोठे आंदोलन उभारले होते. संपूर्ण विदर्भ व महाराष्ट्रात या आंदोलनाचे लोण पोहचले. या आंदोलनातला एक उल्लेखनीय प्रसंग आठवतो. चंद्रपूर शहरातील काही कर्मठ लोकांनी राजाभाऊंच्या घरासमोर मोर्चा

आणून दगडफेक करण्याचा प्रयत्न केला. राजाभाऊ त्यावेळेस दिवाणखाण्यात बसले होते. प्रतिगाम्यांच्या या अचानक झालेल्या हल्ल्याने राजाभाऊ मुळीच डगमगले नाही. दिवानखाण्यातून ते बाहेर व्हरांड्यात आले. राजाभाऊंनी हा काय तमाशा चालवला म्हणून गर्जना केली. व एकटेच मेन रोडवर येऊन त्या दगडफेक करणाऱ्यांच्या घोळक्यात शिरले. राजाभाऊंचा हा आक्रमक पवित्रा पाहून त्या कर्मठांचे धाबे दणाणले व क्षणात त्यांची पांगापांग झाली. सिटी पोलीस स्टेशनचे इन्सपेक्टर तेव्हा बंदोबस्तात होते. राजाभाऊंची ही हिमंत व धैर्य पाहून त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या पोलीस सहकाऱ्यांना ते म्हणाले, 'मी पोलीस खात्यात नोकरीला नसतो तर राजाभाऊंचा अनुयायी म्हणून त्यांचा झेंडा खांद्यावर घेतला असता.' एक निर्भिड व धैर्यवान म्हणून राजाभाऊंची याप्रसंगी त्यांच्या कार्यकर्त्यांना प्रचिती आली. रावण दहनाची कुप्रथा अशीच चालत राहिल्यास देशाच्या ऐक्य व एकात्मतेस धोका निर्माण होईल असे त्यांचे स्पष्ट मत होते. दक्षिण भारतात व या देशातील आदिवासी समाजात रावणास पूज्य मानले जाते म्हणून ही कुप्रथा हानीकारक आहे अशी त्यांची भूमिका होती. 'रावण दहन : एक ब्राह्मणी षड्यंत्र' या साप्ताहिक 'प्रजासत्ताक'मधून प्रकाशित झालेल्या लेखांवर मला व संपादकास चंद्रपूरच्या जिल्हा न्यायालयाने शिक्षा ठोठावली. तेव्हा राजाभाऊंनी नागपूरच्या उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन आम्हास सोडविले. दक्षिण भारताचे एक थोर पुढारी पेरियार रायस्वामी नायकर यांचे निधन झाल्यांची वार्ता कळल्यावर राजाभाऊ सुन्न झाले. तेव्हा ते चंद्रपूरातच होते. चंद्रपूरच्या टाऊन हॉलमध्ये पेरियारांना श्रद्धांजली अर्पण करतांना ते म्हणाले, 'पेरियारांच्या दुःखद निधनाने एक थोर समाजक्रांतीकारक हरपला आहे.'

## कामगार संघटना बांधल्या

राजाभाऊ कामगार क्षेत्रातही उतरले. त्यांनी नागपूर विभागातील बिडी मजुरांना संघटित केले. त्याकरिता त्यांनी महाराष्ट्र राज्य बिडी मजदूर संघटनेची स्थापना केली. सन १९५८ ते १९७० पर्यंत ते या संघटनेचे अध्यक्ष होते. बिडी मजुरांचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांना किमान वेतन कायदा लागू व्हावा याकरिता राजाभाऊंनी सतत लढे दिले व बिडी मजुरांना स्थैर्य प्राप्त करून दिले. बिडी व्यवसाय हा घरगुती व्यवसाय असून बहुतांश दलित व मागासवर्गीय समाज या व्यवसायात मजूर म्हणून काम करतो. राजाभाऊंच्या अथक परिश्रमाने हजारो कुटुंबे पोटापाण्याला लागली व त्यांना फार मोठा आर्थिक आधार मिळाला. यासाठी त्यांना बिडी मालकाशी दोन हात करावे लागले. बिडी मजुरांच्या समस्या घेऊन राजाभाऊंनी महाराष्ट्राच्या विधानसभेवर मोर्चे काढून या मजुरांना न्याय मिळवून दिला.

राजाभाऊंनी विदर्भातील खेड्यापाड्यात निवास करणाऱ्या कोतवालांचेही संघटन उभे केले. कोतवाल हा खेडे विभागात राहणारा सरकारचा अस्थायी चाकर होय. त्यांची सेवा चोवीस तासांची असते. गावात केव्हा काही झाले तर त्याची त्वरित दखल घेणे, संबधित पोलीस अधिकाऱ्यांना व इतर अधिकाऱ्यांना तातडीने कळवून कार्यवाहीची हालचाल करणे हे त्यांचे मुख्य काम असते. कोतवालकी या देशात शेकडो वर्षापासून चालत आलेली आहे. खेडे व शासन यंत्रणा यामधला कोतवाल हा महत्त्वपूर्ण दुवा होय. पण त्यांना फार तुटपुंजा पगार, आवकजावक करण्याकरिता साधनांची कमतरता. शिवाय चाकरी अस्थायी व त्याची आणि त्याच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची काही खात्री नाही. कोतवालाच्या चाकरीत बहुतांश मागासवर्गीय समाज असून ही कोतवालकी परंपरेने चालत आलेली आहे. त्यांची दयनीय स्थिती राजाभाऊंनी हेरली व मजबूत अशा संघटनेची बांधणी केली. कोतवालांचे वेतन व त्यांना चतूर्थ श्रेणीचा दर्जा देणे या मागण्यांकरिता राजाभाऊंनी सतत संघर्ष केला.

अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षपद भूषवितांना पक्षाला संलग्न एक कामगार संघटना असावी असे राजाभाऊंना वाटू लागले. आपल्या सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेऊन त्यांनी भारतीय स्तरावर 'डिटू' (Democratic Indian Trade Union) या नावाची संघटना स्थापन केली. जेथे कुठे मागासवर्गीय मजूर अथवा कर्मचारी असेल त्यांना ही संघटना एक फार मोठा आधार होता. या माध्यमातून राजाभाऊंनी अनेक कार्यकर्ते तयार केले. कोळशाच्या खाणीत काम करणाऱ्या कामगारांचीही त्यांनी संघटना उभी केली. त्यासाठी त्यांनी 'विदर्भ खाण कामगार संघ' स्थापन केला. अनेक वर्षे ते या संघटनेचे अध्यक्ष होते. राजाभाऊंची जन्मभूमी असलेला चंद्रपूर जिल्हा कोळशाच्या खाणीसाठी प्रसिद्ध आहे. त्याकाळात या खाणी खाजगी मालकांच्या ताब्यात होत्या. खाणींचे राष्ट्रियीकरण व्हायचे होते. खाण कामगारांच्या वेतनमानासाठी जे जे वेज बोर्ड बसले, त्यात राजाभाऊंनी वेळोवेळी मौलिक सूचना केल्या. तेव्हा वाहतुकीची साधने कमी होती. खाजगी बसेस चालायच्या. चंद्रपूरपासून सुमारे वीस किलोमीटर अंतरावरील घुग्गुस या कोळसा खाणीच्या क्षेत्रात राजाभाऊंनी खाजगी बसेसने प्रवास करून संघटना उभारली. युवक व विद्यार्थी यांच्या संघटना त्यांनी उभारल्या; रिपब्लिकन स्टूडण्टस् फेडरेशन व रिपब्लिकन युवक संघ अशी या संघटनांची नावे होती. या दोन्ही तरुणांच्या संघटनांना व्यापक स्वरूप देण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. १९६०-६१चा एक प्रसंग आठवतो. अमरावतीच्या शिवाजी महाविद्यालयातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती काही कारणांमुळे तेथील प्राचार्यांनी अडवून धरली होती. फेडरेशनच्या विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला. त्याच वेळेस राजाभाऊ

बडनेरमार्गे नागपूरला जात असल्याचे आंदोलनकारी विद्यार्थ्यांना कळले. त्यांनी राजाभाऊंची बडनेरच्या रेल्वेस्थानकावर अगदी सकाळी भेट घेतली व आपली अडचण सांगितली. हे सर्व ऐकल्यानंतर राजाभाऊंनी नागपूरला जाण्याचा बेत रद्द केला. व सकाळच्या लोकलने अमरावती गाठली. या दरम्यान प्राचार्यांना ही माहिती मिळताच त्यांनी राजाभाऊंचे महाविद्यालयाच्या परिसरात हार्दिक स्वागत केले. व राजाभाऊंच्या समक्ष शिष्यवृत्ती वाटपाचे प्राचार्यांनी आदेश दिले. विद्यार्थी व युवकांच्या आघाड्यांच्या पाठीशी एक पितृतूल्य म्हणून राजाभाऊ उभे राहिले. युवक व विद्यार्थ्यांकरिता त्यांनी एक अत्यंत मोलाची मागणी केली. १४ एप्रिल हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून केंद्रिय सरकारने घोषित करावा ही ती मागणी होय. माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जयंतीदिन बालदिवस तर माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. असा तर्क देऊन राजाभाऊंनी डॉ. आंबेडकर जयंती दिवस 'विद्यार्थी दिन' म्हणून साजरा केला पाहिजे अशी तर्कसंगत मागणी केली. ज्या बाबासाहेबांनी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात अठरा अठरा तास पाव रोटी खाऊन विद्यार्जन केले, बोटीमधून भारतात परतताना समुद्राच्या लाटांच्या हेलकाव्याने बाबासाहेबांनी सोबत आणलेले काही ग्रंथ पाण्यात पडल्याने ज्या बाबासाहेबांचे अंत:करण अत्यंत दु:खी झाले; ज्यांनी ग्रंथांवर, ज्ञानसाधनेवर अपार प्रेम केले, तो बाबासाहेबांचा जयंतीदिन विद्यार्थी दिवस म्हणून साजरा करण्याची मागणी अत्यंत समयोचित, सुसंगत, योग्य व औचित्यास धरून होती.

बाबासाहेबांनी समतेच्या लढ्यात अनेक संघटना स्थापन केल्या. त्यात समता सैनिक दल ही एक होती. दलितांच्या चळवळीत हे दल शांतता व सुव्यवस्थेचे कार्य करायचे. पोलिसांची गरज नसायची. राजाभाऊंनी समता सैनिक दलाचे पुनर्संघटन केले. या दलाला नवीन संजिवनी दिली. समता सैनिक दलाचे राजाभाऊ बालवयात स्वयंसेवक होते. त्यामुळे या दलाबद्दलचा राजभाऊंच्या मनात एक वेगळा आदरभाव होता. त्यांच्या सभा सम्मेलनात समता सैनिक दलाचे स्वयंसेवक सुरक्षेचे कवच म्हणून आपली जबाबदारी पार पाडायचे.

## राजाभाऊ व आणीबाणी

सन १९७७ला श्रीमती इंदिरा गांधीनी देशात आणीबाणी लागू केली. 'लोकशाहीच्या नरडीला नख' या शब्दात राजाभाऊनी आणीबाणीचा विरोध केला. लोकनायक बाबू जयप्रकाश नारायण, या देशातील असंख्य विरोधी पक्षीय नेते व कार्यकर्ते गजाआड डांबते गेले. परंतु राजाभाऊ निर्भिडपणे आणीबाणीच्याविरुद्ध

सभा सम्मेलने घेत असतांना त्यांच्या केसांनाही धक्का लावण्याची हिंमत कुणाची झाली नाही. याच कालखंडात श्री वसंतराव साठे यांचे फॅसिस्ट विरोधी परिषदेच्या निमित्ताने चंद्रपूरला आगमन झाले होते. राजाभाऊ व श्री. वसंतराव साठे यांच्या भेटीची वेळ ठरली. मी श्री साठे यांना फॅसिस्टविरोधी परिषद आटोपल्यावर राजाभाऊंच्या निवासस्थानावर आणले. राजाभाऊंनी त्यांचे स्वागत करून नेहमीच्या स्वभावाप्रमाणे आवभगत केली. असंख्य कार्यकर्त्यांचा जमाव याप्रसंगी जमला होता. आणीबाणीच्या अशा नाजुक कालखंडात श्रीमती गांधीचे एक अत्यंत विश्वासू सहकारी राजाभाऊंच्या भेटीसाठी, त्यांची आणीबाणीबद्दलची भूमिका स्पष्ट असतांनाही येतात, हे पाहून उपस्थित सर्व कार्यकर्त्यांच्या नजरा या भेट-प्रसंगावर खिळल्या. श्रीयुत साठे राजाभाऊंना वडील बंधूचा मान द्यायचे. प्रकृति, स्वास्थ्य वगैरेपासून बोलण्यास सुरवात झाल्यानंतर श्री. साठे यांनी मुद्यास 'हात' घातला. ते राजाभाऊंना म्हणाले, 'राजाभाऊ, दिल्लीत आज आपली श्रीमती इंदिरा गांधींच्या पाठीशी उभे राहण्याची आवश्यकता आहे.' श्री साठे यांच्या या शब्दांनी संपूर्ण दिवाणखाना हादरून गेला. कार्यकर्त्यांनी कान टवकारले. हृदयांची स्पंदने वाढली. राजाभाऊ काय बोलणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या, राजाभाऊंच्या चेहऱ्यावरील भाव क्षणात बदलले. अतिथींच्या स्वागताची सीमारेषा ओलांडून राजाभाऊ धीर गंभीर आवाजात श्री. साठे यांना उद्देशून म्हणाले, ''वसंतराव, मॅडमला जाऊन सांगा की, आणीबाणी लागू करतांना कुणाला विचारले? राजाभाऊ श्रीमती इंदिरा गांधींना मॅडम म्हणायचे. श्री. वसंतराव साठे राजाभाऊंचे हे शब्द ऐकून गर्भगळीत झाले. दिवाणखान्याच्या बाहेर निघून गाडीत बसले. राजाभाऊंनी गाडीपर्यंत जाण्याचा शिष्टाचार पाळला. श्री. साठे निघून गेले. राजाभाऊंनी राजकरणात ज्या ज्या निष्ठा जोपासल्या त्यांचे हे मूर्तिमंत उदाहरण होय. आणीबाणीच्या त्या १९ महिन्याच्या कालखंडात साऱ्या देशातील विरोधी पक्षीय नेते भयभीत झाले असताना राजाभाऊंनी कशाचीही तमा न बाळगता आपली प्राजांळ भूमिका बेधडक पणे ठेवली. हा त्यांच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग होता. राजाभाऊंचे मंन वळविण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधींनी श्री वसंतराव साठे यांना आपला दूत म्हणून पाठविले असा या प्रसंगाच्या आम्हा कार्यकर्त्यांनी त्यावेळेस अन्वयार्थ लावला. श्रीमती गांधी फार मोठ्या मनाच्या होत्या. राजकीय मतभेदांची एवढी मोठी दरी असतांनाही त्यांनी राजाभाऊंचे कर्तृत्व कधीच अव्हेरले नाही. बाबासाहेबांच्या नंतर दलितांचा मसिहा म्हणून त्या राजाभाऊकडे पाहायच्या. म्हणून राष्ट्रीय सरकारची संकल्पना जेव्हा देशासमोर आली तेव्हा तत्कालिन राष्ट्रपतींकडे श्रीमती गांधींनी राष्ट्रीय सरकार करिता ज्या सहा राष्ट्रीय नेत्यांच्या नावांची यादी सादर केली होती, त्या सहा नावांमध्ये राजाभाऊंचे नाव होते. एका कर्तृत्ववान नेत्यास

त्याच्या कर्तृत्वाची मिळालेली ही पावती होय. देशाच्या राजकरणात राजभाऊंचे किती महत्वाचे स्थान होते, हे या घटनेवरून लक्षात येईल. असे अनेक प्रसंग आहेत,ज्यामधून राजाभाऊंचे व्यक्तिमत्व तावून सुलाखून निघालेले आपणास दिसेल. राजाभाऊंना श्रीमती गांधींनी राज्यसभेच्या उपसभापतीपदासाठी पाठिंबा दिला होता. राजाभाऊंचा या पदावरील कार्यकाल संपला तेव्हा दिल्लीत काँग्रेसच्या वर्तुळातून एक पिल्लू सोडण्यात आले. राजाभाऊंनी काँग्रेसच्या चार आण्याच्या सभासदत्वाच्या फॉर्मवर सही करावी. पुढील जबाबदारी काँग्रेसची. राजाभाऊंच्या नावाची त्यावेळेस देशाच्या राजधानीत उपराष्ट्रपतीपदासाठी चर्चा होती. उपराष्ट्रपती राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. संविधानातील ही तरतूद लक्षात घेतल्यास राजाभाऊंच्या नावाची चर्चा होणे अनाठायी नव्हते. परंतु राजाभाऊंचा पिडंच असा होता की, त्यांना पदाची कधीच लालसा नव्हती. यादेशातील समतेच्या लढ्याशी त्यांनी निष्ठा व इमान राखले होते. सामाजिक मूल्यांच्या बाबतीत रणसंग्रामात त्यांनी राजकीय तडजोड कधी केली नाही, त्यांनी ताठ मानेने आंबेडकरी बाण्याचे राजकारण-समाजकारण केले. राज्यसभेच्या उपसभापतीपदावरून ते खाली उतरले तेव्हा सरळ त्यांनी सामानसुमान बांधून आपली जन्मभूमी गाठली. रेल्वेच्या एका भीषण अपघाताची नैतिक जबाबदारी स्विकारून तेव्हाचे रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी आपल्या पदाचा राजीनामा देऊन सामान बांधले व आपल्या गावी परतले स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडातील ही दोन उदाहरणे राजकरणातील नीतिमूल्ये जपणारांसाठी दिपस्तंभाप्रमाणे आहेत. चंद्रपूर शहराच्या मध्यभागी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा ब्राँझ धातूचा अप्रतिम असा पुतळा राजाभाऊंनी उभारला. मुबंईचे प्रख्यात शिल्पकार वाघ यांनी तो घडविला. चंद्रपूरचा हा पुतळा आगळा वेगळा व सर्वात जास्तीत उंचीचा आहे. स्वत: शिल्पकार वाघ यांनी चंद्रपूरच्या आपल्या भेटीत ही माहिती दिली. या भव्य पुतळ्याचे अनावरण तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी केले. राजाभाऊंच्या एका शब्दाखातर श्रीमती गाधींचे मे महिन्यातील चंद्रपूरच्या रखरखत्या उन्हात आगमन झाले. गाधींनी येथील दीक्षाभूमीवरच्या सभेत राजाभाऊंनी जमविलेला अलोट जनसमुदाय पाहिला. एक मोठ्या राष्ट्रीय व्यक्तिमत्वाचा माणूस म्हणून श्रीमती गांधींना राजाभाऊंची प्रचिती आली. जाहीर सभेत राजाभाऊंबद्दल गौरवोद्गार काढतांना त्या म्हणाल्या, खोब्रागडेजी ज्या सामाजिक मूल्यांसाठी अहोरात्र लढा देत आहेत त्या मूल्यांसाठी आपण सर्व लढले पाहिजे.'

साहित्यात राजाभाऊंची खूप रूची होती. बौद्ध साहित्य सम्मेलने, दलित साहित्य सम्मेलने, अ. भा. मराठी साहित्य सम्मेलने यांना नेहमीच राजाभाऊंचा

वरदहस्त व सहकार्य असायचे. धावपळीच्या आयुष्यामुळे आपण फारसे लिखाण करू शकलो नाही ही मनातील खंत राजाभाऊ आपल्या मित्रवर्तुळात बोलून दाखवायचे. आकाशवाणी वरील भाषणे ते स्वत: लिहीत असत. 'प्रजासत्ताक' या नियतकालिकाचे ते प्रेरणास्त्रोत होते. राजाभाऊंचे वास्तव्य चंद्रपूरला असले की या नियतकालिकांमधून प्रकाशित होणारे साहित्य, वार्ता, माहिती ते स्वत:च सेन्सर करीत असत. विख्यात साहित्यिक डॉ. गंगाधर पानतावणे यांना सन १९७४ ला लिहिलेल्या एका पत्रात राजाभाऊ म्हणतात, 'नुकताच मी उत्तरप्रदेशाच्या पूर्वभागातील अलाहाबाद, जौनपूर व देवरिया या जिल्हांचे दौरे करून दिल्लीस पोहचलो. मला दिनांक ११ फ्रेब्रुवारीचा 'प्रजासत्ताक' चा अंक पाहावयास मिळाला. अस्मितादर्श मेळाव्यातून अस्मिता दर्शला लेखकांचे व कवींचे मोठ्या प्रमाणात लाभत असलेले नियमित योगदान मला 'प्रजासत्ताक' साप्ताहिकातून वाचावयास मिळाले व आनंद झाला. अस्मिता दर्शच्या लोकप्रियतेचे हे द्योतक आहे. गेल्या काही वर्षांपासून आपण यासाठी जो त्रास घेत आहात, प्रामाणिकपणे यात राबत आहात, त्याचे आपणास मिळालेले हे फळ होय. भविष्यात आपले नियतकालिक निश्चितच भरभराटीस जाईल.' राजाभाऊंना मराठी नाटके पाहण्याचा भारी शौक होता. नाटकांचे ते दर्दी व रसिक होते. १९७० ते १९८० या दशकात चंद्रपुरात दर्जेदार अशी नाटके खूप यायची. राजाभाऊ लग्नाआधी आपल्या मित्रपरिवारासोबत तर लग्नानंतर सपत्निक नाटकांना हजेरी लावायचे. चंद्रपुरात नाटक लागले की, राजाभाऊ शहरात आहेत असे त्यावेळेस समिकरण तयार झाले होते. देशात राजाभाऊंचा कुठेही संचार असो, नाटकाच्या दिवशी राजाभाऊंचे चंद्रपूरला हमखास आगमन व्हायचे, व आम्हालाही त्यांना आणण्यासाठी रेल्वे स्टेशनवर त्याची फियाट घेऊन जाण्याची सवय झालेली होती. नाटके पाहण्याचा छंद त्यांनी आयुष्यभर जोपासला. एक मुत्सद्दी राजकारणी एवढा रसिक असणे हे राजाभाऊंचे स्वभाव वैशिष्ट्य अनाकलनीय आहे. चंद्रपुरात सन १९७१ मध्ये ५३वे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन आयोजित करण्यात आले होते. राजाभाऊंच्या जन्मभूमित अ. भा. मराठी साहित्य संम्मेलनाच्या आयोजनाची ही पहिलीच वेळ होती. हे संम्मेलन यशस्वी व्हावे व चंद्रपुरच्या लाल मातीची शान रहावी म्हणून राजाभांऊच्या मनात एक विचार होता. तो अनेकदा आपल्या सहकाऱ्यांना त्यांनी बोलून दाखविला होता. अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदी दलित साहित्यिकाने विराजमान व्हावे अशी त्यांची इच्छा होती. योगायोगाने हे संम्मेलन त्यांच्या जन्मभूमीत आयोजित होणार असल्याने एका स्वप्नाची परिपूर्ती होईल असे राजाभाऊंना मनोमन वाटत होते. त्यांनी या दिशेने प्रयत्नांना प्रारंभ केला. त्यांचे जवळचे मित्र अस्मितादर्शकार डॉ. गंगाधर पानतावणे यांनी अध्यक्षपदासाठी

उमेदवारीही भरली. राजाभाऊंनी त्यांचे जे जे मराठी साहित्यिक मित्र होते, त्यांच्याशी संपर्क साधला. चंद्रपूरचे त्यांचे जवळचे मित्र माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री श्री. शांताराम पोटदुखे हे या संमेलानाचे आयोजक होते. श्री पोटदुखे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. सुरेश द्वादशीवार, प्राचार्य मदन धनकर व मी असे मिळून राजाभाऊंच्या सांगण्यावरून डॉ. पानतावणे यांच्या प्रचारासाठी दौरे काढले. डॉ. पानतावणे या सच्च्या आंबेडकर बाण्याच्या साहित्यिकास अध्यक्षपदाची संधी द्यावी ही राजाभाऊंची भूमिका काही साहित्यिकांना रुचली नाही. राजकीय दबावतंत्र वापरले जात आहे. असा कांगावा झाला. शेवटी डॉ. पानतावणे यांना पराभव पत्करावा लागला. आंबेडकरी विचारांचा साहित्यिक मराठी साहित्य सम्मेलनाच्या अध्यक्षपदावर आरुढ होऊ शकला नाही हे शल्य राजाभाऊ आपल्या हृदयात शेवटपर्यंत बाळगून होते.

## राजकीय पक्षातील ऐक्यावर भर

राजाभाऊ सतत ३५ वर्षे देशाच्या राजकारणात होते. एक मुरब्बी राजकारणी म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांनी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत रिपब्लिकन पक्षाच्या झेंड्याखाली राजकारण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय मानसपुत्र म्हणून जनता त्यांच्याकडे पाहायची. या पक्षाच्या स्थापनेसाठी राजाभाऊंनीच पुढाकार घेतला. या राजकीय पक्षाने खूप चढउतार पाहिले. पक्षाला खिंडार पाडणारे नेतेही उदयास आले. परंतु राजाभाऊ एखाद्या अचल पहाडासारखे पक्षाचा झेंडा घेऊन उभे राहिले. राजाभाऊंनी पक्षात ऐक्य राहावे म्हणून जिवापाड प्रयत्न केले. काही नेते पक्षाचे नाव घेऊन पडद्याआड तडजोडी करित असल्याचे व आपले इप्सित साध्य करित असल्याचे राजाभाऊंनी उघड्या डोळ्यांनी पाहिले. राजाभाऊ आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ व एकमेव उच्चविद्याविभूषित होते. परंतु पक्षांतर्गत त्यांची प्रतिमा खंडित करण्याचा बुद्धिपुरस्पर प्रयत्न करण्यात आला. संधीसाधू व निष्ठाहीन लोक पक्षाच्या झेंड्याखाली जमू लागल्याचे राजाभाऊंच्या लक्षात आले. पक्षाचे विभाजन होत असल्याचा अत्यंत वेदनादायी प्रकार त्यांना पहावा लागला. राजाभाऊंनी खतपाणी घालून एक मोठा वृक्ष उभा केला, त्याच वृक्षाच्या सावलीत उभ्या असलेल्या काही लोकांनी वृक्षाच्या मुळावरच घाव घालावा असा हा प्रकार होता. पक्षाचे हे विभाजन कसे टाळता येईल हा एकच ध्यास राजाभाऊंसमोर होता. यास कारणीभूत असलेल्या शक्तींचाही राजाभाऊंनी शोध घेतला. सन १९६४ च्या भूमिहीनांच्या यशस्वी सत्याग्रहानंतर रिपब्लिकन पक्षाची ताकत वाढली होती. पक्षाने एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून आपले स्थान कायम ठेवले होते. हा राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष होता. सत्ताधारी पक्षात भागिदारी मिळाल्यास

या स्थानाला धक्का पोहचण्याचा संभव आहे, अशी त्यांची भूमिका होती. सत्ताधाऱ्यांशी युती करण्याचे धोके राजाभाऊंनी ओळखले होते. त्यांचे हे म्हणणे नंतर काळाने सिद्ध केले. रिपब्लिकन पक्षाचे याक्षणी देखील विभाजन होत असल्याचे आपण पाहतो. त्यास सत्ताधाऱ्यांच्या मागे धावण्याची मनोवृत्ती कारणीभूत ठरल्याची साक्ष आज इतिहास देत आहे. राजाभाऊंचा पक्षऐक्यावर भर होता. आपण सर्वांनी एक व्हावे याकरिता त्यांनी देशभर दौरे काढले. स्वतःचा मान-अपमान त्यांनी बाजूला ठेवला. पक्षाच्या ऐक्यासाठी अमरावती येथे बैठक झाली. अमरावतीच्या खापर्डे मैदानातील जाहीर सभेत राजाभाऊंनी भूमिका मांडली. 'आपण सर्व एक होऊ. त्याशिवाय तरणोपाय नाही.' बंगलोरला सुद्धा पक्षऐक्यासाठी बैठकीची दुसरी फेरी झाली. येथील शंकर लिंगा पाड्या हॉटेलमध्ये सर्व नेते तळ ठोकून होते. कर्नाटकचे तेव्हाचे आमदार आरमुगम या बैठकीचे आयोजक होते. राजाभाऊंनी पक्ष नेत्यांना प्रत्यक्ष भेटून, 'काही करा पण पक्षाचे ऐक्य कायम ठेवा.' अशी भूमिका मांडली. बंगलोरपासून काही किलोमीटर अंतरावरील कोलार येथेही बैठक झाली. या सर्व बैठकींमधून व बंगलोर येथील पब्लिक हॉलच्या जाहीर सभेमधून राजाभाऊ म्हणाले, 'एकी असेल तर आपण तरु. बेकी असेल तर आपण मरू. पक्षऐक्यासाठी मी आपले पद सोडावयास तयार आहे.' कोलारच्या बैठकीत तर नागपूरच्या काही अर्धशिक्षित पुढाऱ्यांनी राजाभाऊंचा घोर अपमान केला. मी या सर्व घटनांचा साक्षीदार आहे. सत्तेच्या मागे धावणाऱ्या पक्षातील पुढाऱ्यांचे हे मनसुबे पाहून राजाभाऊ शेवटी हतबल झाले. आपले मित्र डॉ. गंगाधर पानतावणे यांना सप्टेंबर १९७० ला लिहिलेल्या एका पत्रात या सर्व घडामोडीवर राजाभाऊ लिहितात, ''सर्व प्रयत्नांनी पक्षाची व अखंडता कायम ठेवण्यात आमचे मिशन अयशस्वी ठरले. सातत्याने कार्य करीत राहणे हाच आता एकमेव पर्याय राहिलेला आहे.'

## कार्यकर्त्यांचा पिंड

राजाभाऊंनी दलित-शोषितांसाठी अहोरात्र कष्ट उपसले. खूप खस्ता खाल्ल्या. त्यासाठी त्यांनी देश-विदेशात भ्रमंती केली. लोकांमध्ये राहणे व त्यांच्याशी एकजीव होऊन जगणे हा त्यांच्या स्वभावाचा एक भाग होता. असेच एकदा चंद्रपूर जिल्ह्याच्या ब्रह्मपुरी तालुक्यातील नान्होरी या खेड्यातील सभा आटोपून राजाभाऊ चंद्रपूरला निघाले. मध्यरात्र उलटली होती. हिवाळ्याचे दिवस होते. व कडाक्याची थंडी पडली होती. मध्यरात्रीच्या त्या थंडीने खूप जोर धरला. वाटेत रस्त्यावरच्या एखाद्या खेडेगावात थोडे थांबावे अशी राजाभाऊंनी इच्छा व्यक्त केली. बाजुलाच तनिसाची गंजी होती. कार्यकर्त्यांनी थोडे तनिस घेऊन बाजूला पेटविले बाजूच्या तनिसाच्या

गंजीवर राजाभाऊंनी अंग टाकले. व क्षणात निद्राधिन झाले. एक उच्चविद्याविभूषित बॅरिस्टर गवताच्या गंजीवर झोपतो हे दृश्य त्याक्षणी कार्यकर्त्यांच्या मनाला हेलकावे देत राहीले. अशीच एक सभा धाबा नामक एका खेड्यात होती. बुद्ध व आंबेडकरांच्या पुतळ्यांच्या अनावरणाचा तो कार्यक्रम होता. वाटेत त्यांच्या कारमध्ये अचानक बिघाड झाला. गाव त्या स्थळापासून सुमारे ६ किलोमीटर अंतरावर होते. रात्रीची वेळ असल्याने गावाच्या दिशेने कच्चा रस्ता दिसेना. राजाभाऊ गावाकडे पायीच चालत निघाले. सोबत असलेले कार्यकर्तेही त्यांच्या मागोमाग जाऊ लागले. हे पाहून कार्यकर्त्यांच्या मनातील राजाभाऊंबद्दलची आपुलकी आणखी दृढ झाली. दलित-शोषितांचे प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र झटत असताना त्यांनी खाण्यापिण्याचीही कधी पर्वा केली नाही. जे मिळेल ते खाणे, जी परिस्थिती समोर येईल त्यास सामोरे जाणे असा राजाभाऊंच्या आयुष्याचा क्रम होता. बेसनभात हे गरिबांचे कमी खर्चाचे व लवकर तयार होणारे साधे जेवण राजाभाऊंना खूप आवडायचे. रात्रीच्या सभा आटोपल्या की बेसनभात ही राजाभाऊंची खासकरून फरमाईश असायची. राजाभाऊ एक कार्यकर्ता म्हणून लोकांमध्ये - कार्यकर्त्यांमध्ये राहिले. कार्यकर्त्यांवर त्यांनी निस्सीम प्रेम केले. त्यांच्या तालमीत तयार झालेले असंख्य कार्यकर्ते आपापल्या परीने समाजकार्यात कार्यरत आहेत. त्यांचे एक वैशिष्ट्य असे होते की, कार्यकर्ता कितीही गर्दीत असला तरी राजाभाऊ त्याला नावाने ओळखायचे, हाक द्यायचे. कार्य व तब्येतीची विचारपूस करायचे. पक्षाचा कार्यकर्ता रस्त्यात दिसल्यास गाडी थांबवून त्यांच्याशी ते बोलायचे. या सवयीमुळे राजाभाऊंनी जिवाभावाचे सहकारी जमविले. राजाभाऊंचे हे स्वभाव वैशिष्ठ्य कार्यकर्त्यांना खूप लोभस वाटत असे. त्यांचा करारी, धीरगंभीर व पहाडी आवाज आजही त्यांचे कार्यकर्ते विसरणे शक्य नाही. भारताचे माजी केंद्रिय अर्थराज्यमंत्री व राजाभाऊंचे एक निकटचे मित्र चंद्रपूरचे श्री. शांताराम पोटदुखे एकदा राजाभाऊंच्या जयंतीप्रसंगी जाहीर सभेत बोलताना म्हणाले, 'राजाभाऊ देशात जेथे कुठे जातात, तेथे त्यांना जनता दुसरे बाबासाहेब म्हणून संबोधते.' श्री पोटदुखे यांचे हे अगदी सार्थ असे मत आहे. राजाभाऊंचे संपूर्ण देशात दौरे असायचे. त्यांच्या जाहीर सभांना खूप गर्दी रहायची. बाबासाहेबांच्या पश्चात त्यांच्या मानसपुत्राला पाहण्यासाठी, ऐकण्यासाठी लोकांची अलोट गर्दी उसळायची. राजाभाऊंच्या समोर कार्यकर्ते नतमस्तक होत असत. कार्यकर्त्यांच्या प्रकृतीची सुद्धा ते दखल घ्यायचे. चंद्रपूर जिल्ह्यातील एका निष्ठावान कार्यकर्त्यास टी. बी. च्या आजाराने घेरले. तो बरा व्हावा म्हणून राजाभाऊंनी हर तऱ्हेचे प्रयत्न केले. शेवटपर्यंत त्याला अर्थसहाय्य केले. त्याची प्रकृती ठीक झाल्यानंतर तो संघटनेचा कार्यकर्ता म्हणून जिल्ह्याचा व प्रदेशाचा पक्षनेता म्हणून आयुष्याच्या अंतापर्यंत राजाभाऊंच्या पाठीशी राहिला. राजाभाऊंचे व्यक्तिमत्व

त्यांच्या करारी व पहाडी आवाजात सामावलेले होते. आतून घुमत येणारा त्यांचा आवाज खणखणीत कलदार रुपयाप्रमाणे कुणाच्या कानावर गेला तर तो हृदयापर्यंत भिडणारा, स्पष्ट पण अहंकाररहित असे त्यांच्या वक्तृत्वशैलीचे वर्णन करता येईल. संसद असो, संसदेबाहेरील सभा असो, राजाभाऊंच्या वक्तृत्वाची श्रोत्यांना भुरळ पडायची. श्रोते मंत्रमुग्ध होत असत. राज्यसभेत असख्खलित इंग्रजी बोलणारे राजाभाऊ जनसभांमध्ये तेवढ्याच आवेशाने आपल्या मायबोली-मराठीत बोलत. इंग्रजी, मराठी व हिंदी या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते.

## संयमी नेता

राजाभाऊंचा कुणाला दिलेला शब्द वज्रलेप असायचा. डॉ. आंबेडकर महाविद्यालय, चंद्रपूरचे त्यावेळचे प्राचार्य डबीर यांनी राजाभाऊंची एक मार्मिक आठवण लिहून ठेवली आहे. नागपुरात राजाभाऊंनी प्राचार्यपदाच्या मुलाखती घेत असताना आपणास नेमले असल्याचे व आपण चंद्रपूरच्या महाविद्यालयात रुजू व्हावे अशी डबीरांना सूचना केली. प्राचार्य डबीर म्हणाले, 'सर मला आर्डर केव्हा देणार?' यावर राजाभाऊंनी खुलासा केला, 'डबीरसाहेब, आमचा शब्द हीच आर्डर समजायची.' राजाभाऊंच्या स्वभावाच्या आणखी एका पैलूचा आवर्जून उल्लेख करणे आवश्यक आहे. आपल्या विरोधकांविषयी अथवा आपल्याविषयी अनुदार बोलणारांबद्दल राजाभाऊ संयमाने बोलायचे. राजकारणात राजाभाऊंची वागणूक सुसंस्कृतपणाची होती. एकही उणादुणा शब्द त्यांच्या बोलण्यात नसायचा. वैचारिक विरोध म्हणजे वैर नव्हे हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जपले. सभ्यता व संयम या दोहोंचा संगम राजाभाऊंच्या स्वभावात होता. कार्यकर्ते व मित्रांना घेऊन आपल्या निवासस्थानी जेवणावळी करणे हा राजाभाऊंचा खास शौक होता. दिल्लीत असो की चंद्रपुरात, राजाभाऊंनी हा शौक शेवटपर्यंत सांभाळला. शालीनता व जिव्हाळा हे गुण अशाप्रसंगी राजाभाऊत पाहावयास मिळायचे. एक स्वच्छ मनाचा दिलेर माणूस असे राजाभाऊंचे त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये स्थान होते. त्यांच्या या स्वभावाचा अनेकांनी गैरफायदा घेतला. यामुळे राजकारणात त्यांचे अनेक शत्रू निर्माण झाले. आपल्या अवतीभोवती वावरणाऱ्या लोकांना पारखून घेण्याची फुरसत राजाभाऊंना मिळाली नाही. त्यांची दिलेरी व ऐसपैसपणा हेच त्यांच्या काही कार्यकर्त्यांना वरदान ठरले. येथे ज्या राजाने आश्रय दिला त्याचेच आसन डळमळीत करण्याचा कुटील प्रयत्न झाला. सरळ स्वभावामुळे राजाभाऊंना आपल्या काही कार्यकर्त्यांबद्दल अंदाज बरोबर बांधता आले नाहीत. राजाभाऊंच्या जवळची म्हणवणारी माणसे त्यांच्यावरच उलटल्याचे प्रकार घडले. राजकारणात माणसांना पारखून घ्यावे लागते. वेळ आल्यास आपल्या अगदी जवळच्या माणसांना दूर ठेवावे लागते.

शत्रुलाही जवळ करावे लागते. राजाभाऊंचे काही अंदाज आपल्या साध्या, सरळ व भोळ्या स्वभावामुळे फसले असे कधी कधी वाटायला लागते. ज्या कार्यकर्त्यांना त्यांनी तयार केले, राजकारण-समाजकारणाचे धडे दिले, त्यातले काही उलटले हे राजाभाऊंनी स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले. परंतु राजाभाऊंच्या मनात सुडाची भावना कधीच नव्हती. खंत अवश्य वाटली असेल. राजाभाऊंच्या सुसंस्कृत स्वभावाचे हे वैशिष्ट्य म्हणता येईल.

## अखेरचा प्रवास

राजाभाऊंनी या देशातील समतेच्या लढ्यात स्वत:ला झोकून दिले. सामाजिक मूल्यांचा हा लढा सतीचे वाण असल्याचे ते म्हणायचे. ऊन असो, वारा असो, पाऊस असो, कशाचीच तमा न बाळगता त्यांनी हा लढा गतीमान केला. दीनदलितांच्या सेवेसाठी त्यांनी आपली सारी शक्ती पणास लावली. एखाद्याच्या पायाला भिंगरी बांधली तर तो कुठेही थांबत नाही. असा राजाभाऊंचा जीवनक्रम होता. त्यांना स्वत:च्या खाजगी आयुष्याचा विसर पडला होता. वयाच्या ४७व्या वर्षी त्यांनी विवाह केला. परंतु त्यांचे मन कुटुंबात कधीच रमले नाही. त्यांना एक अपत्य झाले. परंतु ते अवघे दोन महिने जगले. आपल्या या लाडक्या मुलीच्या शेवटच्या क्षणी राजाभाऊ मुलीजवळ नव्हते. अमरावती जिल्ह्यातील दूरच्या एका खेड्यातील जाहीर सभेत असल्याचे कळल्यावर मध्यरात्री मी संपर्क साधला. राजाभाऊ सकाळी पोहचले ते शेवटच्या अंत्यसंस्कारासाठी. सामाजिक लढ्याखातर स्वत:च्या आयुष्याची राखरांगोळी करणाऱ्या राजाभाऊंच्या जीवनातील हा हृदयाचा ठाव घेणारा प्रसंग आहे.

राजाभाऊंचे पारदर्शी असे जीवन होते. स्वत:ची संपत्ती त्यांनी समाजलढ्यासाठी लावली. ज्या मातीत राजाभाऊंचा जन्म झाला ते चंद्रपूरकर त्यांना आपले भूषण मानत. गावचे एक शिष्टमंडळ तत्कालिन नगराध्यक्षांच्या नेतृत्वात दिल्लीस गेले असताना राजाभाऊंनी चंद्रपूरकरांची जी बाडदास्त राखली त्या घटनेची आठवण आजही येथील लोक करीत असतात. समाजसेवेचा एक सारखा ध्यास, देश-विदेशात सततचे भ्रमण व स्वास्थ्याकडे दुर्लक्ष यातच राजाभाऊंना आजाराने घेरले. आजारी अवस्थेतही त्यांनी आपल्या कार्यात कधी खंड पडू दिला नाही. विटाभट्ट्यांचा प्रश्न घेऊन काही कार्यकर्ते राजाभाऊंना भेटायला त्यांच्या निवासस्थानी आले. त्या काळात या व्यवसायात बहुतांश दलित कामगार काम करीत असत. राजाभाऊंची आजारी अवस्था पाहिल्यानंतर कार्यकर्त्यांचे मन काही सांगावयास धजेना. शेवटी भित भित त्यांनी आपली समस्या मांडली. त्याही

अवस्थेत राजाभाऊंनी जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावला. एक समस्या घेऊन येत असल्याची सूचना केली. गाडीचा ड्रायव्हर बोलविला. व कार्यकर्त्यांना गाडीत बसवून ते जिल्हाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी निघाले. आपली छाती चोळीतच ते गाडीतून उतरले. जिल्हाधिकारी त्यांची वाट बघत होते. त्यांनी विटाभट्ट्यांची समस्या संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून राजाभाऊंच्या समोर तात्काळ सोडविली. राजाभाऊ घरी परतल्यावर त्यांची प्रकृति पुन्हा ढासळली. तातडीने डॉक्टरांना बोलविण्यात आले. व डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतर रात्रीच्या गाडीने पत्नी इंदुमतीला घेऊन ते तातडीने दिल्लीला रवाना झाले. दिल्लीच्या जी. बी. पंत रुग्णालयात त्यांना भरती करण्यात आले. कार्यकर्ते, चाहते व मित्रपरिवार देशभरातून राजाभाऊंना भेटण्यासाठी दिल्लीस येऊ लागले. याही आजारीअवस्थेत राजाभाऊंनी आतिथ्य सोडले नाही. दिल्लीच्या लोदी इस्टेटमधील त्यांच्या बंगल्यावर सर्व कार्यकर्त्यांना राहण्या-खाण्याची सोय झाली पाहिजे याकडे त्यांचे विशेष लक्ष होते. दिल्लीत तेव्हा कडाक्याची थंडी होती. गरम कपड्याची सोय करा हे ते आजारी अवस्थेत असूनही सांगायचे. रुग्णालयात उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृति ढासळत गेली. व ९ एप्रिल १९८४ रोजी त्यांचे निर्वाण झाले.

राजाभाऊ या देशातील समतावादी लढ्यातील बाबासाहेबांच्या नंतरचे फार मोठे सेनानी होते. या लढ्याची आयुधे आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्यांनी कधीच खाली ठेवली नाहीत. सिद्धांताशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही. चांदीचा चमचा घेऊन जी व्यक्ती जन्मास आली, त्या राजाभाऊंचे निर्वाण झाले तेव्हा, त्यांचा एक छदामही बँक बॅलन्स नव्हता. ही घटना त्याग व समर्पणाच्या भावनेने काम करणाऱ्या या देशातील असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणार आहे. आपला लाडका जेष्ठपुत्र विलायतेहून मायदेशी परतेल, त्याच्याकरिता छानपैकी घर असावे, त्याने छानपैकी रहावे हे स्वप्न देवाजीबापूंनी रंगविले होते. परंतु या घरावर आयुष्याच्या अंतापर्यंत राजाभाऊ एक वीट देखील चढवू शकले नाहीत. आजही गांधीमार्गावरील त्यांचे निवासस्थान पन्नास वर्षांपूर्वी जसे होते तसेच किंबहुना पडक्या अवस्थेत आहे. राजकारणाच्या आडोशाने कोट्यावधी रुपयांची माया जमविणारे कुठे व समतेच्या लढ्यासाठी आपले सर्वस्व पणास लावणारे राजाभाऊ कुठे? राजाभाऊंचे जीवन एक रणसंग्राम होता. एक युद्ध होते. या योद्ध्याने अखेरच्या क्षणापर्यंत सामाजिक विषमतेविरुद्ध युद्ध केले. समाजातील रंजल्या-गांजलेल्यांसाठी, शोषित पिडितांसाठी निस्वार्थपणे काम करणाऱ्या समर्पित कार्यकर्त्यांना राजाभाऊंचे जीवन एक दीपस्तंभ, एक प्रेरणास्रोत, एक स्फूर्तिस्थान म्हणून सदैव राहील.

## बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांची राज्यसभेतील गाजलेली निवडक भाषणे

काश्मिर भारताचा अविभाज्य भाग आहे आय.ए.एस. आणि आय.पी.एस.मधील नोकरभरतीसाठी अमेंडमेंट बिलाद्वारे करण्यात आलेल्या नियमांच्या अंमलबजावणीबाबत जरी अनेक सूचना आल्या असल्यातरी सर्वसाधारणपणे सभागृहातील दोन्ही बाजूंच्या सभासदांनी संमती दिलेली आहे. सन १९५१ साली हे बिल पास करण्यात देशभर आय.ए.एस. आणि आय.पी.एस. नोकरीमध्ये एकसूत्रीपणा आणण्याचा हेतू होता. परंतु जम्मू व काश्मिरची विशिष्ट आणि अपवादात्मक स्थिती लक्षात घेऊन तेवढ्या भागाला हे बिल लागू करण्यात आले नव्हते. अशी संमती देण्याचे पहिले कारण जम्मू व काश्मिरला हे कायदे लागू होत नाहीत. आतापर्यंत काश्मिरमधील अधिकाऱ्यांची बदली देशातील इतर राज्यात होऊ शकत नसे. त्यामुळे मध्यवर्ती कारभाराचा त्यांना अनुभव प्राप्त होत नसे. आता ते शक्य होईल. हे संमती देण्याचे दुसरे कारण होय. या संमतीचे तिसरे कारण असे की, त्यामुळे जम्मू आणि काश्मिर या प्रदेशाचे भारतातील विलिनीकरण पूर्ण होऊन तो या देशाचा अविभाज्य भाग होण्याच्या मार्गावरील हे एक पुढचे पाऊल आहे.

काश्मिर हा या देशाचा अविभाज्य भाग असताना काही अशा गोष्टी आहेत की, ज्यामुळे तसे वाटत नाही. २१ जुलै १९५२ला दिल्लीच्या अधिकारातून ते राज्य काढून घेण्यात आले. काही कलमे वगळली तर भारताची राज्य घटना जम्मू काश्मिरला लावण्यात आली नसून त्या राज्याची स्वतंत्र राज्यघटना आहे. जम्मू काश्मिरचे राष्ट्रीय निशाण वेगळे ठेवण्यात आले आहे. असा वेगळ्या निशाणाचा अधिकार इतर कोणत्याही राज्याला नाही. सर्व राज्यांचे राज्यपाल भारताचे राष्ट्रपती नेमतात. जम्मू-काश्मिरला राज्यपाल नसून सदर-ए-रियासत आहे. त्यांची निवड तेथील विधान सभा करते. त्यांचे निवडणूक आयोग स्वतंत्र आणि वेगळे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकाराखाली तेथील उच्चन्यायालय नाही.

काश्मिर हा भारताचा अविभाज्य भाग आहे. याबाबत कोणालाही शंका नाही. परंतु तेथील राज्य कारभारातील ठळक उणीवा व दोष असे आहेत की, त्यामुळे विरोधकांना खोडसाळपणा करण्याची संधी लाभते. अशा व्यक्तींनी आतापर्यंत या परिस्थितीचा गैरफायदा घेतलेला आहे. म्हणून अशा ऊणीवा व दोष नाहीसे करून जगाला आपण दाखवून दिले पाहिजे की, काश्मीर व भारत वेगवेगळे नाहीत. ही आपली जबाबदारी आहे. या बिलाला मान्यता देऊन ते आपण पुढे रेटत आहोत.

या बिलाचे श्रेय काश्मिरी जनतेला, काश्मिर सरकारला आणि विशेषतः

काश्मिरचे पंतप्रधान बक्षी गुलाम महंमद यांनाच दिले पाहिजे. भारत सरकारला ते श्रेय देण्याचे कारण नाही. कारण जम्मू-काश्मिर सरकारनेच याबाबतीत पुढाकार घेतलेला आहे.

काश्मिरचे पंतप्रधान म्हणून जेव्हा शेख अब्दुल्ला होते त्यावेळी या बाबतीतले प्रयत्न हाणून पाडण्याचा प्रयत्न झाला. बक्षी गुलाम महंमद यांनी बिल पास होण्याची वाट न पाहता जानेवारी १९५७ला अखिल भारतीय सर्व्हिसेस मध्ये भाग घेण्यासाठी ताबडतोब दहा-पंधरा अधिकारी पाठविले होते. काश्मिरी जनतेने काही बाबतीत आपण होऊन हालचाली केल्या होत्या. भारतीय निवडणूक आयोगाच्या अधिपत्याखाली काश्मिर विधान सभेच्या निवडणुकी व्हाव्यात असा जोरदार प्रयत्न त्या विधानसभेच्या प्रमुख सभासदांनी केला. हे उदाहरण सन्माननीय सदस्य श्री. भुपेश गुप्ता यांनी दिलेले आहे. जम्मु-काश्मिरमधील निवडणूक भारतीय निवडणूक आयोगाच्या देखरेखीखाली होतील अशी व्यवस्था करण्यात यावी ही मी मागणी करित आहे.

वरिष्ठ नोकर भरतीच्या बाबतीत येणाऱ्या अनेक अडचणी आहेत. प्रथमतः इतर राज्ये अथवा मध्यवर्ती सरकारच्या नोकरीतील काही अधिकाऱ्यांना बदली म्हणून अथवा डेप्युटेशनवर पाठवावे लागेल. ह्याची वरिष्ठ अधिकारी निवडताना खबरदारी घेतली जावी. साधारणतः अनुभव असा असतो की, मध्यवर्ती वरिष्ठ अधिकारी आपले काम काळजीपूर्वक सहानुभूतीने करण्याऐवजी स्थानिक अधिकाऱ्यावर ताशेरे झाडून अथवा आपली हुशारकी मिरवून प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करतात. अर्थातच स्थानिक अधिकारी त्याचा तिटकारा करतात. मध्यवर्ती अधिकाऱ्यांना राज्यातील गुंतागुंतीच्या कारभाराची माहिती नसते. व ते स्वतःला उच्च श्रेणीचे समजतात. आणि राज्य सरकारच्या नोकरांना हीन लेखतात. त्यांचे काही पूर्वग्रह व मनोगंड घेऊन ते राज्य सरकारच्या नोकरीत बदलीवर जातात. म्हणून राज्य सरकारकडे पाठवावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची निवड करताना इतर राज्यातून जे काम करीत आहेत अशांची निवड करावी, म्हणजे ते अधिकारी जम्मू काश्मिरच्या राज्य कारभारात क्रियाशिलतेने भाग घेऊन तेथील जनतेच्या भावनांशी समरस होऊ शकतील.

एका द्विभाषिक राज्यातून (मध्यप्रदेश) काढून दुसऱ्या विशाल द्विभाषिकाला-मुंबईराज्याला राज्यपुनर्रचनेनंतर जोडलेला विदर्भाचा अनुभव विशद करणे आवश्यक आहे. मुंबई आणि विदर्भात अधिकाऱ्यांच्या इकडून तिकडे बदल्या करण्यात आल्या. जुन्या मुंबई राज्यातून विदर्भात येणारे अधिकारी जुन्या

मध्यप्रदेशातील अधिकारी त्या योग्यतेचे नाहीत असे उद्‌गार काढतात. परिस्थिती अगदी उलट आहे. विदर्भातील अधिकारी कार्यक्षम व सुयोग्य आहेत. एखाद्या विभागातील जनता मागासलेली असू शकते. काहीविशिष्ट जाती-जमाती मागासलेल्या असतात. परंतु जे एका राज्यातील वरिष्ठ अधिकारी राज्यकारभाराचे सूत्र संचालन कार्यकुशलतेने करतात त्यांना ते अकार्यक्षम आहेत असे कसे म्हणता येईल? विदर्भात याचा फार विपरित परिणाम झाला आहे. त्यामुळे मुंबईच्या द्विभाषिकापासून विदर्भाची सोडवणूक करून विदर्भाचे राज्य वेगळे करण्याची हालचाल तेथे सुरू झालेली आहे.

परिगणित जाती जमातीच्या साठी राखून ठेवलेल्या अधिकारी वर्गातील जागांच्या भरतीबाबत दुसरी खबरदारी घेतली पाहिजे. जरी भारताच्या राज्य घटनेद्वारे आयएएस आणि आय.पी.एस. या वरिष्ठ अधिकारी वर्गातील भरतीसाठी राखीव जागा दलितवर्गियांसाठी असल्यातरी आम्हाला याबाबतीत फार कटू अनुभव आलेला आहे.

उपसभापती महोदय, घटनेत याबाबत तरतूद केलेली आहे. परंतु घटनेने आम्हाला जरी या संबंधात राखीव जागांचे प्रमाण दिले असले तरी त्यांची योग्य अंमलबजावणी होत नाही ही तक्रार आहे. पाच महिन्यांपूर्वीच्या खास भरतीच्या वेळी १५० उमेदवार परीक्षेला बसले. जे लेखी परीक्षेत उत्तीर्ण झाले त्या सर्वांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. आय. ए. एस. साठी भरती केलेल्या १०२ उमेदवारात दलित वर्गीय अवघे ७ होते. येथे डॉ. गोरे यांनी तशी तरतूद दलित जातीसाठी काश्मिरच्या राज्यघटनेत आहे का असा प्रश्न विचारला आहे. अशी तरतूद नसल्यास काश्मिरमधला दलितवर्ग मागासलेला असल्यामुळे तेथेही राखीव जागांचे प्रमाण नोकऱ्यात असले पाहिजे हा माझा आग्रह आहे.

वरिष्ठ नोकऱ्यांसाठी झालेल्या खास भरतीच्या वेळी आलेल्यापैकी बरेच जण फारच चांगल्या दर्जाचे आहेत. एक उदाहरण असे आहे की, उत्तर प्रदेश बोर्डाच्या मॅट्रीक परीक्षेत प्रथम श्रेणीत पास व पन्नास हजार विद्यार्थ्यात १६वा नंबर आलेला विद्यार्थी आय.ए.एस.च्या लेखी परीक्षेत पास झाला. परंतु तोंडी परीक्षेत काय झाले कोण जाणे? त्याला यश मिळू शकले नाही. अशी उदाहरणे पुष्कळ आहेत. जो विद्यार्थी इंटर होऊ शकला नाही तो आय. ए. एस. मध्ये यशस्वी झाला. आमच्या विदर्भात असा एक अधिकारी आहे, जो इंटरमिजिएट परीक्षेत नापास झाला. पण आय.ए.एस. परीक्षेमध्ये पास झाल्याचे जाहीर करण्यात आले. उपसभापती महोदय म्हणतात त्या उमेदवाराला परीक्षेला कसे बसता आले? परंतु कदाचित त्याला

युद्धकालिन नोकरीचा फायदा घेता आला असेल.

राखीव नोकऱ्यांचे प्रमाण १६ टक्के असताना दिडशे उमेदवारांमध्ये अवघ्या सातच दलित वर्गियांना निवडण्यात आले. यामध्ये योग्य प्रमाण पाळले जावे अशी माझी मागणी आहे. दलित वर्गियांना नोकरीच्या क्षेत्राखेरीज दुसऱ्या कोणत्याच क्षेत्रात शिरकाव करून घेता येत नाही व्यापार, वाणिज्य, उद्योगधंदे यांची दारे आमच्या दलित वर्गियांसाठी बंद आहेत. शिक्षणाचे एकच क्षेत्र आहे. नंतर नोकरी. जर नोकरी मिळाली नाही तर वैफल्य येईल, दारूण निराशा होईल. आणि त्यामुळे दलित वर्गियांची प्रगती खुंटेल. यासाठी जम्मु-काश्मिरच्या घटनेत देखिल दलित वर्गियांसाठी नोकऱ्यांची तरतूद असली पाहिजे. शेवटी हा अखिल भारतीय स्वरूपाचा प्रश्न आहे. जेथे राज्य कारभार उच्चवर्णीय हिंदूंच्या हाती आहे, तेथे दलित वर्गियांवर अन्याय होतोच याचा आम्हाला अनुभव घ्यावा लागत आहे. आज सत्ता उच्चवर्णीय हिंदूंच्या हाती आहे. आम्ही अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरवून तसा कायदा केला. परंतु मी अशी अनेक उदाहरणे देईन की, दलित वर्गियांना अत्याचार सहन करावे लागले. पण न्याय मात्र मिळाला नाही. दलित वर्गीयांना चांगल्या कायद्याचा उपयोग नसून चांगल्या राज्यकारभाराची गरज आहे. तीच महत्त्वाची बाब आहे. दलित वर्गियांचे हितरक्षण करणारे राज्यकर्ते असले पाहिजेत. उच्चवर्णीय अधिकाऱ्यांना अस्पृश्यांविषयी सहानुभूती नाही. यासाठी आमचे अधिकारी असावेत. जम्मु-काश्मिरमध्ये तसे राखीव प्रमाण स्पष्टपणे ठेवण्यात यावे. (दि. ६.९.१९५८)

## भारताची राष्ट्रभाषा हिंदी असावी

भारताची दप्तरी भाषा कोणती असावी या वादग्रस्त प्रश्नांवर सभागृहात झालेली सर्व भाषणे मी लक्षपूर्वक ऐकली आहेत. या प्रश्नासंबंधी वातावरण गरम करणारी, कटुता निर्माण करणारी जी भावनोत्तेजक भाषणे या सभागृहात केली गेली, त्यावरून हा प्रश्न साधा व सरळ नसून अत्यंत नाजूक आहे. आणि तो जर काळजीपूर्वक हाताळण्यात आला नाही तर त्याचे घोर परिणाम होतील हे स्पष्ट झाले आहे.

भाषा कमिटीने आपल्या अहवालात हा प्रश्न हताळला आहे. तथापि लोकप्रतिनिधींची मते राष्ट्रपती विचारात घेत असल्यामुळे संसदेमध्ये त्यावर सहानुभूतिपूर्वक विचार होणे आवश्यक आहे. भारताची दप्तरी भाषा एकच असावी आणि तो मान हिंदी भाषेलाच मिळावा याबद्दल दुमत कुणाचेच होणार नाही. कारण हिंदीला राष्ट्रभाषेचा मान देण्याचा हिंदी भाषेचा हक्क कोणीही नाकारू शकणार नाही.

तथापि हिंदी भाषेने इंग्रजी भाषेची जागा कशी घ्यावी आणि इंग्रजीऐवजी हिंदी भारताची दप्तरी भाषा म्हणून केव्हापासून सुरुवात करावी हा प्रश्न जेव्हा निर्माण होतो तेव्हा वादाला सुरुवात होते. हे वाद ताठरवृत्ती स्विकारुन सोडविता येण्यासारखे नाहीत. लोकशाहीच्या भूमिकेवरच हा प्रश्न धसास लावला पाहिजे.

सबंध भारतीयात समान संस्कृतीची निर्मिती व्हावी, भारताचे ऐक्य अबाधित राहावे म्हणून भारताची दप्तरी भाषा एकच असणे आवश्यक आहे. परंतु दुर्दैवाने आम्हा भारतियांची संस्कृती एक नाही. आपणास आता ती वाढीस लावावयाची आहे. भाषेमुळे संस्कृतीचे जतन होत असल्यामुळे समान संस्कृतीच्या वृद्धीसाठी हिंदी हीच राष्ट्रभाषा असावी हे संशयातीत आहे. परंतु याबाबत हिंदी भाषेच्या समर्थकांनी जी वृत्ती प्रदर्शित केली आहे. व जे मार्ग अवलंबिले आहेत. त्याकडे पाहिले असता अहिंदी भाषिकांनी जेवढे नुकसान हिंदी भाषेचे केले नसेल, त्यापेक्षा कितीतरी पटींनी नुकसान हिंदी भाषिकांनी केले. हिंदी भाषिकांनी इतर भाषांबद्दल दाखविलेली अनुदारता व तुच्छता यामुळे अन्य भाषिकांत हिंदी भाषेविषयी तिरस्कार निर्माण झालेला आहे. म्हणून हिंदी भाषिकांनी आपल्या धोरणात व वृत्तीत वेळीच बदल केला पाहिजे असे माझे त्यांना सांगणे आहे.

हिंदी भाषेला दप्तरी भाषा म्हणून अमूक एका तारखेपासूनच वापर करण्यात यावा असे बंधन घालण्यात येऊ नये असे मला प्रतिपादन करावयाचे आहे. भारतीय संविधानात १९६५ सालापासून हिंदीची अंमलबजावणी करण्यात यावी अशी तरतूद आहे. तसेच भाषा कमिटीने देखिल गुळगुळीत शब्दात कां होईना तीच कालमर्यादा सूचित केलेली आहे. घटनेत केलेल्या या तरतुदींचा वारंवार दाखला देण्यात येऊन त्यावरहुकूम न वागल्यास घटनेच्या पावित्र्याचा भंग होईल असेही कित्येक सदस्यांनी बोलून दाखविले आहे. परंतु फ्रँक अँथनी या सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे घटनेत पवित्र म्हणून जर कोणता भाग असेल तर तो 'मूलभूत हक्कांचा' होय. परंतु त्यात देखील सरकारने सात वेळा संशोधन करून दुरुस्त्या केलेल्या आहेत. असे असता राष्ट्रभाषेच्या या कलमाबाबत घटनेच्या पावित्र्यभंगाचा बागूलबुवा का उभा करण्यात येत आहे? हा माझा सवाल आहे. या प्रश्नाच्या घटनात्मक बाजूबद्दल बोलायचे झाल्यास, सभागृहाच्या निदर्शनास मी हे आणून देऊ इच्छितो की, घटनेतील हे कलम केवळ एक मताच्या आधिक्याने संमत झालेले आहे. या कलमाबाबत लिहितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'काँग्रेस पक्षाच्या बैठकीतील गुपित भंगाचा आरोप आता माझेवर येणार नाही अशी अपेक्षा आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून स्विकारण्यासंबंधीची ती चर्चा होती. राष्ट्रभाषेसंबंधी असलेल्या घटनेच्या ११५व्या कलमावर जेवढी गरमागरम व

विस्तृत चर्चा झाली, तेवढी चर्चा अथवा जबर विरोध दुसऱ्या कोणत्याही कलमाला झाला नाही. प्रदीर्घ चर्चेनंतर हे कलम मतास टाकण्यात आले. ६१ विरुद्ध ६१ असे मतदान झाले. कसलाही निर्णय घेणे अशक्य झाले. काही कालावधीनंतर हाच प्रश्न पुन्हा काँग्रेसच्या पक्ष बैठकीत मतदानास टाकला आणि केवळ एक मताने हिंदी ही राष्ट्रभाषा ठरली.'

ही वस्तुस्थिती आहे. तरीही यावरहुकुम न वागल्यास घटनेचे पावित्र्य भंग होईल असे समजणे असमंजसपणाचे आहे. हिंदीची 'राष्ट्रभाषा' म्हणून अंमलबजावणी करण्यासाठी निश्चित अशी ठराविक मर्यादा घालणे इष्ट नाही. त्यापेक्षा १९६५ नंतर देखील ५-१० वर्षे तरी 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवली पाहिजे. कारण राष्ट्रभाषेपेक्षा राष्ट्राच्या ऐक्याचा प्रश्न अत्यंत मोलाचा आहे. हिंदीचे समर्थक आपल्या चुकीच्या धोरणाने भारताच्या ऐक्यावर आघात करीत आहेत हे ते विसरत आहेत. भारताच्या ऐक्यासाठी तुम्हाला हिंदी नको आहे काय असा सवाल मला एका सन्माननीय सदस्याने केला. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, १९६५ सालापासून हिंदीची भारताची दप्तरी भाषा म्हणून अंमलबजावणी होऊ नये.

माझे हिंदी भाषिक मित्र मला सांगू शकतील काय की, १९६० वा १९६५ सालापासून भारताचा राज्यकारभार हिंदी भाषेतून सुरू केल्यास काय अहित होणार आहे? तोपर्यंत इंग्रजीचाच वापर सुरू ठेवण्यात मला काहीच वावगे दिसत नाही. इंग्रजी भाषा ही आंतरराष्ट्रीय कीर्ती पावलेली भाषा आहे. जगातील सर्वात पुढारलेल्या भाषांपैकी इंग्रजी भाषा ही एक आहे. शास्त्रीय आणि वैज्ञानिक विषयावरील लिखाण इंग्रजी भाषेतच उपलब्ध आहे. खुद्द गृहमंत्र्यांनी मागे लोकसभेत सांगितले होते की, शास्त्रीय संशोधनाचा विचार केला असता इंग्रजी भाषेतच मौलिक ग्रंथ आहेत. असे असता इंग्रजी भाषेला विरोध कां असावा? माझ्या काही मित्रांनी सांगितले की, अनेक देशात परकीय भाषा मुळीच बोलल्या जात नाही. तेव्हा भारतात सुद्धा इंग्रजी ह्या परकीय भाषेचा वापर नसावा. परंतु इंग्रजी ही परकीय भाषा असली तरी ती आंतरराष्ट्रीय भाषा आहे हे विसरून चालणार नाही. जागतिक बौद्ध परिषदेला जपान, मलाया, सिंगापूर, फ्रान्स, जर्मनी आस्ट्रीया आदि देशांचे प्रतिनिधी आले होते. मी सुद्धा भारतातील अनेक प्रतिनिधींपैकी एक होतो. तेथील कामकाजात भाग घेण्याचा योग मला आला. परिषदेचे संपूर्ण कामकाज इंग्रजी भाषेतच चालले. व प्रतिनिधींनी आपल्या भाषणात इंग्रजी भाषेचाच वापर केला. एवढेच नव्हे तर थायलँड सारख्या देशात सुद्धा आज मुले-मुली इंग्रजी शिकत आहेत. व इंग्रजी भाषेचा सर्रास वापर करीत आहेत. केवळ इंग्रजी ही परकीय भाषा शिकतात म्हणून ते गुलाम नाहीत. शतकानुशतके ते स्वातंत्र्याचा उपभोग घेत आहेत.

१९६५ ही कालमर्यादा नसावी असे मी म्हणतो. याचे कारण हिंदी भाषेची अजून व्हावी तशी प्रगती वा समृद्धी झाली नाही. मागील १० वर्षात सरकारने हिंदीच्या अभ्युदयासाठी कोणताच प्रयत्न केला नाही. अशा स्थितीत तो अन्य भाषिकांवर लादणे योग्य होणार नाही. आज हिंदी ही प्रादेशिक भाषा आहे. ती राष्ट्रभाषा म्हणून मान्य करून तिची अंमलबजावणी करण्यापूर्वी अखिल भारतीय भाषा म्हणून समृद्ध होणे आवश्यक आहे. आणि मला खात्री आहे की, नजीकच्या ५-१० वर्षांच्या काळात 'हिंदी' अखिल भारतीय भाषेचा दर्जा प्राप्त करू शकेल. आणि देशाच्या कानाकोपऱ्यात ती बोलली जाईल. हिंदी भाषा न बोलणारांवर ती लादण्याऐवजी ते स्वत:च हिंदीचा वापर करू लागतील अशी प्रगती हिंदी भाषेची करावयास हवी.

याशिवाय शुद्धीकरणाच्या नावाखाली अयोग्य शब्द हिंदी भाषेत घुसडून भाषेचे सौंदर्य बिघडविण्याच्या प्रवृत्तीला वेळीच आळा घालणे तिच्या समृद्धीच्या दृष्टीने आवश्यक आहे. केवळ संस्कृत भाषेतीलच शब्द हिंदी भाषेत आणण्याचा दुराग्रह न करता सर्वच भाषेतील शब्द घेतले पाहिजेत. इंग्रजी भाषा समृद्ध असण्याचे हेच एक कारण आहे. अन्य भाषांमधील जे शब्द आपल्या दररोजच्या प्रचारात रुढ झाले आहेत ते शब्द हिंदी भाषेने आत्मसात करावयास हवे. त्यासाठी घाई करून उपयोग नाही. यासंबंधात स्विकारलेले ताठर धोरण भारताच्या संघटनात्मक ऐक्याला अत्यंत घातक आहे. काही काळपर्यंत परकीय भाषेचा वापर एकवेळ चालेल. पण ज्यामुळे जबर विरोधाचा उठाव होऊन दुही निर्माण होईल, आणि देशाची सबंध घडी विस्कटून जाईल अशी प्रादेशिक भाषा सत्तीने राष्ट्रभाषा म्हणून लादणे मुळीच मान्य होण्यासारखे नाही. देशाच्या ऐक्याच्या, हिताच्या दृष्टीने हिंदी भाषेला स्वयंप्रगत व समृद्ध करणे आणि तोपर्यंत इंग्रजीचाच वापर चालू ठेवणे इष्ट आहे. (दि. २४-१०-१९५९)

## हुंडाबंदी विधेयकाला पाठिंबा

मी या विषेयकाला पाठिंबा देण्यासाठी उभा राहिलो आहे. दोन्ही सभागृहात ज्या वादग्रस्त मुद्यासंबंधी एकमत न झाल्याकारणाने दोन्ही सभागृहांची ही संयुक्त बैठक घेणे भाग पडले आहे. त्या वादग्रस्त प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी मला खुद्द या बिलाबद्दल काही विचार मांडावेसे वाटतात. आणि काही माननीय सभासदांनी या बिलाला अयशस्विरित्या विरोध करताना उपस्थित केलेल्या मुद्द्यांना उत्तर देण्याचा प्रयत्न करावासा वाटतो.

काही सभासदांनी असे म्हटले आहे की, सामाजिक सुधारणा कायद्याने होऊ

शकत नाही. याबाबतीत माझे विचार भिन्न आहेत. कायद्याने सामाजिक सुधारणा होऊ शकतात असे माझे मत आहे. पण त्यासाठी दोन गोष्टी आवश्यक आहेत. पहिली गोष्ट लोकसभेत जो कायदा करावयाचा असेल तो अंमलात आणता येण्यासारखा असला पाहिजे. दुसरी गोष्ट, हा कायदा अंमलात आणण्यासाठी सरकारने प्रामाणिक हेतू बाळगावा. दुर्दैवाने सगळ्या प्रकारचे कायदे बनविण्याचे सरकारला वेड लागले आहे असे दिसते. पण हे कायदे अंमलात येण्यासारखे नसतात किंवा हे कायदे अंमलात आणायला स्वत: सरकार नाखूष तरी असावे; एखादे विधेयक पास झाल्यावर ते केवळ कायद्याच्या पुस्तकातील शोभिवंत वस्तू रहावी अशी सरकारची इच्छा दिसते. किंवा सरकारला असे वाटत असावे. सरकारचा हा दृष्टिकोन बदलला पाहिजे. मला अगदी खात्री आहे की, जर हा दृष्टिकोन बदला आणि विधेयक पास झाल्यावर ते अंमलात आणण्यासाठी सरकारने सावधगिरी बाळगली व काळजी वाहिली तर या देशात कायद्याने सामाजिक सुधारणा घडवून आणता येतील. या आदरणीय लोकसभेने अनेक विधेयके संमत केली आहेत. जर सरकारने ती आस्थापूर्वक व विशेष काळजीपूर्वक कार्यान्वित केली असती तर आज समाजात क्रांतीकारक बदल घडवून आणता आले असते.

दुसरी गोष्ट मला सांगाविशी वाटते की, आजच्या समाजात स्त्रियांच्या दर्जाचे कारण काय याचा आपण विचार करावा. माझ्या मते, मनूने तयार केलेल्या व धर्माच्या नावाखाली समाजावर लादल्या गेलेल्या सामाजिक निर्बंधांमुळे स्त्रियांना हीन दर्जा प्राप्त झाला आहे. या निर्बंधामुळे स्त्री जात आतापर्यंत मालमत्तेची वस्तू होऊन राहिली आहे. आणि तिच्यावर मालकी हक्क सांगणे, तिचा ताबा घेणे, तिची वाटेल तशी विटंबना करणे व पुरुष जातीच्या इच्छेप्रमाणे तिचा त्याग करणे हे प्रकार होत आहेत. हा धार्मिक व सामाजिक दृष्टिकोन आमूलाग्र बदलला पाहिजे. आज आपण काय पाहतो? एका माननीय सभासदाने उल्लेख केल्याप्रमाणे आज वर्तमानपत्रांतून पुष्कळशा जाहिराती पाहावयास सापडतात. जर आपण याचा विचार केला तर स्त्री ही वर्तमानपत्राद्वारे विकता येणारी किंवा विकत घेता येणारी वस्तू आहे, असे आपणास दिसेल. ही परिस्थिती बदलली पाहिजे. माझ्या मते स्त्रीला समाजातील तिचे महत्त्वाचे मानाचे स्थान दिले पाहिजे.

वादग्रस्त मुद्द्यावर बोलायचे झाल्यास राज्यसभेने मांडलेले विचार बरोबर आहेत. याचा मला उल्लेख करावासा वाटतो. राज्यसभेने सुचविलेल्या दुरुस्त्यांना मला पाठिंबा द्यावयाचा आहे. राज्यसभेने सूवर्णमध्य गाठण्याचा प्रयत्न केला. राज्यसभेला हे विधेयक शक्य तितके परिणामकारक करण्याची उत्कट इच्छा आहे. त्याचबरोबर बेमूर्वत व समाजविरोधी शक्ती समाजातील निरपराध व्यक्तींना त्रास देऊ शकणार

नाहीत किंवा त्यांना लुबाडू शकणार नाहीत हेही राज्यसभेला पाहावयाचे आहे.

कलम २ मधील वाद 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष' हे शब्द घालावेत आणि स्पष्टीकरण हा शब्द गाळावा यासंबंधीचा आहे. या दोन्ही दुरुस्त्या हे विधेयक अधिक परिणामकारक करणाऱ्या आहेत. जर आपण 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष' हे शब्द काढून घेतले तर समाजातील समाजविरोधी शक्ती या विधेयकातील तरतुदी गुंडाळून ठेवतील. हा कायदा धाब्यावर बसविण्यासाठी ते सर्व प्रकारचे मार्ग व साधने आपल्या विकृत मेंदूच्या जोरावर शोधून काढतील. जर हे शब्द घातले नाहीत तर या विधेयकाचे मुख्य उद्दिष्ट साध्य होणार नाही. जर हे शब्द नसतील तर या ना त्या कारणाने हुंडापद्धत चालूच राहील.

माननीय सभासद श्री. खाडीलकर यांनी आस्थापूर्वक व आत्यंतिक तळमळीने बोलत असताना आताच असा उल्लेख केला की जर एखाद्याला या विधेयकाला धाब्यावर बसवावयाचे असेल तर तो तसे लग्नाकरिता ५ हजार रुपयांचे मंगळसूत्र मिळवून सहज करू शकेल. 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष' या शब्दाकडे मला त्यांचे लक्ष वेधले पाहिजे. ज्यांना ५ हजार रुपयांच्या मंगळसूत्राची देणगी द्यावयाची असेल त्यांना हे शब्द बंधनकारक राहतील. या शब्दांच्या अर्थाने ही ५ हजार रुपयांच्या मंगळसूत्राची देणगी अप्रत्यक्ष हुंडा या सदराखाली मोडेल. अर्थात, या तरतुदीचा विचार लग्नासंबंधीच करण्यात यावा म्हणून 'प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष' हे शब्द आवश्यक आहेत. व ते या विधेयकात राहिले पाहीजेत आणखी असे की, जर हे शब्द असतील तर ते सर्व शंका दूर करतील. व त्यामुळे या विधेयकाला अधिक सुस्पष्टता येईल. कायदा अंमलात आणायला सुस्पष्टतेची फारच आवश्यकता आहे.

'स्पष्टीकरण' या शब्दाबद्दल बोलायचे झाले तर हा शब्द गाळला गेला पाहिजे. जर आपण स्पष्टीकरण हा शब्द ठेवला तर हा कायदा धाब्यावर बसविण्यास तो शब्द एकदा मार्ग सुचवील. स्वत: 'स्पष्टीकरण' हा शब्द हे सुचवितो की, लग्नाच्यावेळी अगोदर किंवा नंतर देणग्या देता येतात. ज्यांना कायदा मोडावासा वाटतो त्यांना आपण हे कां सुचवावे? पुष्कळशा सभासदांनी हा विचार मांडला आहे की, प्रेमापोटी व मायेपोटी पालकांना आपल्या मुलांना अशा देणग्या देण्यात अडथळा येईल. मला हे सांगितले पाहिजे की, अशा लोकांना या विधेयकातील 'हुंडा' या शब्दाचा खरा अर्थ समजलेला नाही. लग्नाच्या वेळी, अगोदर किंवा नंतर जे काहीही दिले जाते ते लग्नाप्रित्यर्थ देईपर्यंत किंवा लग्नाच्या संदर्भात दिल्याशिवाय त्याला 'हुंडा' असे म्हणता येणार नाही. म्हणून जर बापाने किंवा आईने लग्नाच्यावेळी आपल्या मुलीला काहीही दिले आणि त्यांचा संबंध जर

लग्नाशी नसेल तर अशी देणगी देता येईल. अशा देणग्या द्यावयास हरकत नसावी. पण तो सुद्धा हा कायदा धाब्यावर बसविण्याचा एक मार्ग ठरू शकेल हे विसरू नये. म्हणून मला सूचना कराविशी वाटते की, लग्नाच्या वेळी किती रकमेपर्यंत देणग्या दिल्या जाव्यात यावर काही तरी निर्बंध ठेवला पाहिजे. मला आणखी असे म्हणावेसे वाटते की, केवळ हा कायदा पास करून आपण हा सामाजिक अन्याय दूर करायला समर्थ होणार नाहीत. आचार्य कृपलानी म्हणतात की, स्त्रियांनी स्वत:च्या संघटना कराव्यात आणि जे हुंडा देतात किंवा घेतात त्यांच्या दारात सत्याग्रह करावा. माझ्यामते लोकांच्या दारात सत्याग्रह करणे पुरेसे नाही. दुसरे हे की, हा कायदा पास झाल्यावर कोणतेही पालक उघडपणे हुंडा देणार नाहीत. जर त्यांना द्यावयाचा असेल तर तो गुप्तपणे आणि चोरुन देतील. मग अशा स्त्रियांच्या संघटनांवर खरोखर हुंडा दिला किंवा नाही हे समजणे फारच कठीण होईल. जर आचार्य कृपलानी स्त्रियांची संघटना होण्याबद्दल खरोखर कळकळ दाखवित असतील तर त्यांनी केवळ सत्याग्रहापुरताच विचार करू नये. त्याचबरोबर स्त्रियांनी जातीभेद किंवा प्रांतभेद याचा विचार न करता कोणत्याही शिकलेल्या व सुस्वभावी तरुणांशी लग्न करण्याबद्दलही त्यांनी जोर दिला पाहिजे. हाच एक मार्ग आहे की, ज्यायोगे हा सामाजिक अन्याय दूर करता येईल.

जर आपणाला हा हुंड्याचा सामाजिक अन्याय दूर करावयाचा असेल तर हे आवश्यक आहे की, सबंध सामाजिक दृष्टीकोन बदलला पाहिजे. त्यासाठी समाजाची पुनर्रचना होणे आवश्यक आहे. आज आपण काय पाहतो? जातिभेदांमुळे सर्वप्रकारचे निर्बंध लादले गेले आहेत. त्यामुळे लोकांना स्वत:च्या जातीतही विवाह करता येत नाही. ते आपल्या पोटजातीतच लग्न करतात. काही समाजात अशी रुढी आहे की, मुलीऐवजी मुलांनाच हुंडा द्यावा लागतो. मला वाटते, ही रुढी मारवाडी समाजात असावी. मग मारवाडी तरुण व इतर समाजातील मुली यांची लग्ने कां होऊ नयेत? मारवाडी लोकांना हुंड्याची अपेक्षा नसल्यामुळे अशा लग्नात मुलींना हुंडा द्यावा लागणार नाही. अविवाहित मुलामुलींची लग्ने व्हायला यामुळे सोपे जाईल. व ही हुंड्याची अत्यंत अमानूष व अन्यायकारक पद्धतही बंद होईल.

आणखी असे की, हल्ली पालकांकडून लग्ने जुळविली जातात. हेसुद्धा ताबडतोब बंद झाले पाहिजे. तरुण मुलामुलींना समाजाच्या मोकळ्या वातावरणात वावरु द्यावे. त्यांना एकमेकांच्या सहवासात मोकळेपणाने हिंडूफिरु द्यावे. त्यांचा एकमेकांशी परिचय वाढला पाहिजे. व त्यांनी एकमेकांना समजून घेतले पाहिजे. या परिचयाचे रुपांतर मैत्रीत होईल आणि जर ते एकमेकांना आवडतील तर नंतर ते एकमेकांवर आत्यंतिक प्रेम करु लागतील. शेवटी या परिचयाचे व मैत्रीचे रुपांतर

त्यांच्या विवाह संबंधात होईल. म्हणून जर आपणाला ही हुंड्याची भयंकर पद्धत बंद करावयाची असेल तर पहिली आवश्यक गोष्ट ही की, या देशात धार्मिक शिकवणीने ज्या चाली व दृष्टिकोन निर्माण झाले आहेत ते पूर्णपणे बदलले पाहिजेत. आणि तरुण मुलामुलींना एकमेकांच्या सहवासात येता येईल व त्यांची मैत्री वाढू लागेल. अशा मोकळ्या वातावरणाच्या समाजाची निर्मिती व्हावी. आंतरजातीय विवाहांना उत्तेजन दिले पाहीजे.

शेवटी मला म्हणावेसे वाटते की, ज्या लोकांना हुंड्याचा हा सामाजिक अन्याय दूर व्हावा असे वाटते, ज्यांना स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समानता प्राप्त व्हावी असे वाटते आणि या देशातील स्त्रीसमाजाला ज्या मनूने 'मालमत्तेची वस्तू' या दर्जाला आणून ठेवले आहे, त्या मनूने लादलेली विषमता नष्ट व्हावी असे ज्यांना वाटते, त्या सर्वांनी या विधेयकाला पाठींबा दिला पाहिजे व ते पास करून घेतले पाहिजे. (१०/६/१९६१)

## भारताचे राष्ट्रीय ऐक्य कसे साधले जाईल?

सन्माननीय उपसभापती, आपल्या राष्ट्रपतीबद्दल बऱ्याचशा वक्त्यांनी व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. भारतीय रिपब्लिकन पक्षातर्फे मी त्यांचे हार्दिक अभिनंदन करतो. स्वातंत्र्यासाठी झालेल्या प्रत्येक संघर्षात व केलेल्या चळवळीत त्यांनी मोठ्या भक्तिभावाने भाग घेतला होता. आणि स्वातंत्र्य प्राप्तीनंतरही त्यांनी या देशाच्या प्रगतीसाठी व विकासासाठी आपले जीवन अर्पण केले. निवृत्तीनंतर लोकांची सेवा करण्याच्या त्यांच्या इच्छेवरून हे स्पष्ट होते की, त्यांचे जीवन संपूर्णपणे राष्ट्रकार्यासाठी वाहिलेले आहे. म्हणून मी त्यांच्या स्वास्थ्याबद्दल व दीर्घायुष्याबद्दल सदिच्छा व्यक्त करतो.

राष्ट्रपतींच्या भाषणावर बोलताना राष्ट्रीय ऐक्याच्या प्रश्नाबद्दलच मला प्रामुख्याने बोलावेसे वाटते. अन्नादुराई यांच्या भाषणानंतर बहुतेक सर्वांनी त्यांच्या भाषणाचा उल्लेख केला आणि त्यावरून या सभागृहाच्या प्रत्येक सभासदाला राष्ट्रीय ऐक्याची चिंता वाटत आहे असे दिसते. यात शंका नाही, या देशाच्या प्रत्येक नागरिकाच्या मनात हा देश एक असावा, अविभाज्य असावा याबद्दल उच्च भावना आहे. आणि जर विध्वंसक प्रवृत्ती पुढे येत असतील तर मग आपण सर्वांनी संघटितपणे त्या प्रवृत्तींना मागे हटविले पाहिजे. प्रत्येकाने या प्रवृत्तीचा व श्री. अन्नादुराई यांच्या भाषणाचा उल्लेख केला आणि त्यांची भाषणे जोरदारही झाली. आताच श्री. अटल बिहारी वाजपेयी यांनीही बोलताना कडक भाषा वापरली आणि जेव्हा ते पाकिस्तान निर्मितीबद्दल बोलू लागले तेव्हा मी त्यांना अडथळा केला की,

आता पाकिस्तान निर्माण झालेले आहे. माझ्या या अडथळ्याने ते थोडेसे चिडलेही. पण मी जेव्हा अडथळा करण्याचा प्रयत्न केला तेव्हा मला विशेषकरून हे सांगावयाचे होते की, म. गांधी, पं. नेहरुंसारख्या राष्ट्रीय पुढाऱ्यांचा जबरदस्त विरोध असूनही पाकिस्तान निर्माण झाले. गांधीजी म्हणाले होते की, मी मेल्यावरच पाकिस्तान निर्माण होईल. गांधीजी जिवंत राहिले, पण पाकिस्तान निर्माण झाले. हे इतिहासाचे धडे आपण विसरणार काय? येथील प्रत्येकजण द्रविडीस्तानाच्या मागणीला विरोध करीत आहे. पण काही द्रविडीस्तानाची मागणी करण्याची पहिलीच वेळ नाही. चार वर्षापूर्वी श्री. संपत यांनीही हीच घोषणा केली होती. याच विचारसरणीचा पुरस्कार केला होता. व दक्षिण भारतासाठी स्वतंत्र राष्ट्राची मागणीही केली होती. जे लोक आता या मागणीला विरोध करीत आहेत, व विशेषत: सरकारी प्रतिनिधी, या सर्वांकडून मला हे कळायला पाहिजे की, या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी त्यांनी काय केले आहे? अलिकडे डिएमके संघटना विभागली गेली आहे. श्री. संपत या संघटनेच्या बाहेर गेलेले आहेत. ही संघटना वरुन खालपर्यंत दुभंगली गेली असूनही त्यांचे गेल्या सार्वत्रिक निवडणुकीतील मतदान वाढले आहे. विधानसभेत व लोकसभेत त्यांचे बरेच प्रतिनिधी निवडून आले आहेत. याचा अर्थ काय? याचा अर्थ इतकाच की, दुसऱ्या सभागृहात चार वर्षापूर्वी श्री. संपत यांनी विभक्तपणाची घोषणा केली असूनही आमच्या सरकारने या विध्वंसक प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी काही केले नाही. आणि म्हणून, मी म्हणतो की, जोरदार भाषणे व कडक भाषा वापरून हा प्रश्न सुटणार नाही. म. गांधी व पंडित नेहरुंचा विरोध असुनही पाकिस्तान निर्माण झाले. त्याचप्रमाणे, जरी आपण सगळे एका सभासदाविरुद्ध, श्री. अन्नादुराई विरुद्ध एकत्र आलो तरी हा प्रश्न सुटणार नाही. व उलट द्रविडीस्तान मात्र कदाचित निर्माण होईल. म्हणून आपण या विध्वंसक प्रवृत्तीची कारणे कोणती हे समजून घेतले पाहिजे. व ती कारणे नाहीशी करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व देशभर प्रत्येक नागरिकाला आपण प्रथमत: व शेवटपर्यंत या देशाचे नागरिक आहोत असे वाटेल असे केले पाहिजे. त्यांच्या अंत:करणात भारताच्या हितसंबंधाची भावना निर्माण व्हावयास पाहिजे व त्याने पुढे देशाच्या विकासासाठी प्रयत्न केला पाहिजे. पण आम्ही काय पाहात आहोत? बऱ्याच तक्रारी केल्या जात आहेत की, दक्षिण भारतातील लोकांना योग्य संधी मिळत नाही. त्यांची ही तक्रार खरी आहे की नाही हे पाहणे सरकारचे काम आहे. जर तक्रार खरी असेल तर मग सरकारने ती दूर केली पाहिजे. व त्यांचे दु:ख निवारण केले पाहिजे. मी फक्त एकच उदाहरण देतो. गेल्याच आठवड्यात मद्रास राज्यातून निवडून आलेल्या सभासदांबरोबर मी प्रवास केला होता. हे दोघेही कॉंग्रेस पक्षाचे खासदार होते. आपणाला त्यांची तक्रार माहीत आहे कां? या सर्व मद्रासी खासदारांना मागील बाकावर बसावे लागते. याला एकही

अपवाद नाही. हे खरे की खोटे हे मला माहीत नाही. पण यापैकी एक खासदार म्हणाले की, मद्रासचे मुख्यमंत्री ना. कामराज नाडार यांच्याकडे जावे व याबाबतीत त्यांच्याकडे बोलणे करावे अशी ही वागणूक मद्रासी खासदारांना मिळत आहे. ही तक्रार विरोधी पक्षियांची नाही. पण खुद्द काँग्रेस पक्षाच्याच एका लोकसभेच्या सभासदाची ही तक्रार आहे. जर अशी वागणूक या लोकांना द्यावयाची असेल तर त्यांनी स्वतःच्या स्वतंत्र राज्याची मागणी केल्याबद्दल त्यांना दोष कसा देता येईल? महाराज, जर आपणाला राष्ट्रीय ऐक्य साधावयाचे असेल तर मग प्रत्येक राज्याला त्याचा वाटा मिळतो की नाही हे पाहिले पाहिजे. मग तो विकास कार्यक्रमाचा भाग असो किंवा विकास योजनेचा भाग असो, अथवा रेल्वे किंवा इतर सवलतींचा किंवा राजकीय सवलती व राजकीय प्रतिनिधित्वाचा भाग असो.

दुसरी गोष्ट जर दोन राज्यात वाद असेल तर तो कोणत्याही एका विशिष्ट राज्यावर अन्याय न करता तो निपक्षपातीपणाने सोडविला जावा. आपणाला माहीत आहे की बरेच वाद निर्माण झालेले आहेत. महाराष्ट्र, आंध्र, मद्रास, म्हैसूर या राज्यांमध्ये नदीच्या पाण्याच्या वाटपावरून वाद उभे झालेले आहेत.

जर असे वाद असतील तर ते कोणत्याही विशिष्ट राज्याचा पक्षपात न करता हे वाद मिटविले जावेत. पण आपण काय पाहात आहोत? जेव्हा काँग्रेस या वादाचा विचार करते तेव्हा ती या प्रश्नाकडे वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहते कां? महाराष्ट्र राज्याच्या प्रश्नाबद्दल मला मेहरबानीकरून बोलू द्या.

महाराष्ट्र राज्याने सिमेवरील प्रदेशाचा प्रश्न सलोख्याने सुटावा अशी भूमिका घेतली आहे. तो महाराष्ट्र राज्याला परत मिळाला पाहिजे. मद्रास व म्हैसूर राज्यातील वाद मिटविण्यासाठी जे तत्त्व उपयोगी पडले, तेच तत्त्व हा वाद मिटविण्यासाठी वापरावे अशी महाराष्ट्र सरकारची भूमिका आहे. बरीच वर्षे निघून गेली. पण याबाबतीत काहीच घडलेले नाही. १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत बेळगावच्या एकीकरण समितीने ६ जागा लढविल्या. पैकी ५ जागा त्यांना मिळाल्या. याच प्रश्नावर त्यांनी राजीनामाही दिला. पुन्हा त्यांनी निवडणुका लढविल्या व पुन्हा त्यांना त्याच ५ जागा मिळाल्या. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीतही याच गोष्टीची पुनरावृत्ती झाली. पण तरीसुद्धा हा प्रश्न अजूनही सुटलेला नाही.

आपण गोवा स्वतंत्र केला. आणि निसर्गतःच महाराष्ट्रातील सर्व लोक गोवा महाराष्ट्राचा भाग असावा असा दावा मांडीत आहेत. ही भावना खुद्द महाराष्ट्राचे पूर्वी चे गव्हर्नर यांनी व्यक्त केली होती. महाराष्ट्र राज्याच्या दोन्ही सभागृहापुढे बोलतांना गोवा महाराष्ट्राचा आहे व तो महाराष्ट्र राज्याला जोडला गेला पाहिजे असे त्यांनी

म्हटले होते. तेथे त्यांच्या त्या भाषणावर आक्षेप घेण्यात आला. सरकारजवळ याचे काय उत्तर आहे? परराष्ट्र व्यवहार खात्याच्या राज्यमंत्री श्रीमती लक्ष्मी मेनन म्हणाल्या की, कोकणी ही मराठीची बोली नाही. ती एक संपूर्णपणे वेगळीच भाषा आहे. अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई म्हणाले की, जरी महाराष्ट्राने गोव्याबद्दल दावा मांडला असला तरी गोवा महाराष्ट्राला मिळणार नाही. ज्याअर्थी स्वत: राज्यपालांनी महाराष्ट्रीय लोकांच्या भावना व्यक्त केल्या व महाराष्ट्राचा न्याय्य हक्क पुढे मांडला त्याअर्थी अशी भाषा का वापरली जाते?

आता मी एक दुसरे उदाहरण देतो. विरोधी पक्षात नसलेल्या, पण काँग्रेस पक्षात असलेल्या गोव्याच्या एका नागरिकाने लष्करी गव्हर्नरांना विनंती केली की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा गोव्याच्या सचिवालयात उभारला जावा. गोव्याच्या अधिकाऱ्यांकडून दि. ८ जानेवारी ६२च्या आलेल्या पत्रात लष्करी गव्हर्नरने ही विनंती मान्य केल्याचे सूचित केले होते. त्यात लिहिले होते की, लष्करी गव्हर्नरांना सचिवालयात उभारण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा स्विकारण्यास आनंद वाटेल. म्हणून आपण १५ जानेवारीपर्यंत लवकरच पुतळा देण्यासाठी यावे. यावरून लष्करी गव्हर्नरांनी वरील विनंती मान्य केल्याचे दिसत होते. पण त्यानंतर काय घडले हे समजत नाही. दि. २२ फेब्रुवारी १९६२च्या पत्रात म्हटले होते की, परराष्ट्र व्यवहार खात्याला याबद्दल विचारले असता त्यांनी पुतळा स्विकारण्यास मनाई केली. प्रथमत: विनंती मान्य करण्यात आली. व नंतर परराष्ट्र खात्याच्या सल्ल्यावरून ती अमान्य करण्यात आली. अशी कोणती परिस्थिती कारणीभूत झाली की, त्यामुळे ही विनंती शेवटी अमान्य करण्याची पाळी आली. याचे स्पष्टीकरण मला सरकारच्या प्रतिनिधींकडून हवे आहे. पं. नेहरुंनी छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रपुरुष म्हणून मान्य केलेले आहे. आणि जर ते राष्ट्रपुरुष आहेत तर त्यांचा पुतळा गोव्याच्या सचिवालयात उभारण्यात कोणती हरकत आहे? (दि. ९/६/१९६२)

बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या वरील विचारांचा मागोवा घेतला असता त्यांचे विचार किती प्रगल्भ व प्रगत होते, याचे प्रत्यंतर येते.

□□□

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्राचे शिल्पकार योजनेअंतर्गत चरित्रग्रंथ

## मलिकेतील चरित्रग्रंथ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | एस. एम. जोशी | श्री. ग. प्र. प्रधान | रु. ४०/- |
| २) | साने गुरुजी | श्री. राजा मंगळवेढेकर | रु. ४०/- |
| ३) | दादा धर्माधिकारी | श्रीमती तारा धर्माधिकारी | रु. ४०/- |
| ४) | क्रांतिसिंह नाना पाटील | श्री. भारत पाटणकर | रु. ४०/- |
| ५) | डॉ. विठ्ठलराव विखेपाटील | श्री. शिवाजी सावंत | रु. ३५/- |
| ६) | शंकरराव किर्लोस्कर | श्रीमती शांता किर्लोस्कर | रु. ४०/- |
| ७) | मामासाहेब जगदाळे | श्री. व. न. इंगळे | रु. ४५/- |
| ८) | तंट्या भिल्ल | श्री. बाबा भांड | रु. ४५/- |
| ९) | यशवंतराव चव्हाण | श्री. विठ्ठलराव पाटील | रु. ४०/- |
| १०) | दादासाहेब फाळके | श्री. बापू वाटवे | रु. ३५/- |
| ११) | ताराबाई शिंदे | श्री. इंद्रजित भालेराव | रु. २५/- |
| १२) | तेजस्विनी अहिल्याबाई होळकर | सौ. विजया जहागीरदार | रु. ४५/- |
| १३) | तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी | डॉ. अरुंधती खंडकर | रु. ४०/- |
| १४) | स्वातंत्र्यवीर सावरकर | श्री. सुधाकर देशपांडे | रु. ४०/- |

*मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे*

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथविक्रेते

*अधिक माहिती/चौकशीसाठी*

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व),
मुंबई - ४०० ०१४
दूरध्वनी - २४१४४०२१, २४१४६००५



व्ही. डी. मेश्राम यांचा जन्म २९ जुलै १९४० रोजी अमरावती जिल्ह्यातील बडनेरा येथे झाला. नागपूर विद्यापीठातून राज्यशास्त्रात एम. ए. व बी. एड. केले विद्यार्थिदशेपासूनच त्यांचा समाजकारण-राजकारणाकडे ओढा होता. आंबेडकरी चळवळीशी बांधिलकी असून गेल्या चाळीस वर्षांपासून या चळवळीत कार्यरत आहेत. शोषित-दलितांच्या अन्यायाविरुद्ध या कालखंडात मोर्चे, सत्याग्रह, आंदोलने उभारली. अन्याय वेशीवर टांगण्यासाठी १९६९ साली 'प्रजासत्ताक' हे साप्ताहिक सुरू केले. बॅ. राजाभाऊ खोब्रागडे या वर्तमानपत्राचे संस्थापक होते. सामाजिक प्रबोधनाकरिता १९७० ते ७६ पर्यंत महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला आयोजित केल्या. १९७५ साली बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची सुवर्ण जयंती साजरी झाली. त्या समितीचे सरचिटणीस होते. या प्रसंगी प्रकाशित केलेल्या स्मरणिकेचे संपादक होते. चंद्रपूर येथे आयोजित केलेल्या ५३ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे चिटणीस होते. १९८२ साली चंद्रपूर येथे दीक्षाभूमीवर धम्म दीक्षेचा रौप्य महोत्सव ९ दिवस साजरा झाला. या समितीचे ते सरचिटणीस होते. बॅ. खोब्रागडे अध्यक्ष होते. १९८८ साली बॅ. खोब्रागडे स्मारक समितीची संस्थापना करण्यात आली. त्या समितीचे सरचिटणीस आहेत. या समितीमार्फत चंद्रपूर येथे वाचनालय, ग्रंथालय व बालोद्यान सुरू आहे. तसेच चंद्रपूर येथे बॅ. खोब्रागडे यांचा ब्राँझ धातूचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारला. १९९४ साली शासनातर्फे आयोजित केलेल्या सामाजिक समता परिषदेचे ते संयोजक होते. १९९७ साली त्यांना पत्रकारितेचा कर्मवीर पुरस्कार प्राप्त झाला. २००१-२००२ या वर्षाचा 'दलित मित्र' पुरस्कार देऊन शासनाने त्यांचा गौरव केला. शासनाच्या रुग्णालय अभ्यागत समिती, जिल्हा शांतता समिती, जिल्हा विधीसेवा प्राधिकरण, मनोरुग्ण समिती इत्यादी द्वारा जनतेच्या सेवेत कार्यरत आहेत.